ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

जुलै २००९ • मूल्य ४० रुपये

## बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, फिलाडेल्फिया - विशेषांक





## महाराष्ट्राची सोनपावले...




भारतीय प्रज्ञेचे आणि प्रतिभेचे, अटकेपार झेंडे लावणाऱ्या तुम्हा ग्लोबल भारतीयांचा आम्हाला अभिमान आहे.
त्याच बरोबर, मायभूमीपासून दूर राहणाऱ्या तुम्हा साऱ्यांच्या आर्थिक आणि
भावनिक गरजांची आम्हाला पूरेपूर जाण आहे म्हणूनच खास तुमच्यासाठी सादर करीत आहोत आपले भावबंध
‘अर्थ’पूर्ण करणाऱ्या आमच्या या आकर्षक योजना

---

• अनिवासी भारतीय अकाऊंटस् (NRO) • अनिवासी भारतीय बहि:स्थ अकाऊंटस् (NRE)
• परकीय चलन (नॉन रेसिडेंट) अकाऊंटस् (बँक) योजना FCNR (B)
• निवासी परकीय चलन अकाऊंटस् (RFC) • स्वीफ्टद्वारा इनवर्ड रेमिटन्स (SWIFT)
आता कोठेही रहा, कोठेही जा, बँकिंग तुमच्या साथीला !

---

या फक्त योजना नव्हेत
या आहेत आमच्या भावना तुमच्या प्रति...

बँक ऑफ महाराष्ट्र
एक कुटुंब एक बँक

भारत सरकारचा उद्यम | www.bankofmaharashtra.in
अखिल भारतीय टोल फ्री क्रमांक : 1800-222340/1800-220888

**ग्लोबल व्हा... भारतीय रहा !**

Pratisaad.com 09/212


with best compliments from
Viva Homes
VIVA
VIVA HOMES
The Trusted Name
1st floor, Thakur Arcade, Station Road, Virar(W), Thane-401 303.
Tel No.: 0250-3058402 / 2502288, Fax No.: 0250-2511161.

# रुची

## ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या फिलाडेल्फिया
अधिवेशनानिमित्त विशेषांक

**जुलै २००९**
**वर्ष २९ वे, अंक ७ वा, मूल्य ४० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **धनंजय गांगल**

अक्षरजुळणी / मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**वार्षिक वर्गणी**
**संस्थांना १०० रु.**
**व्यक्तींना ६० रु.**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला,
टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर,
ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा,
बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

- **'What is ग्रंथाली'** : धनंजय गांगल/३
- **मराठी साहित्यातले प्रवाह** : अंजली कुलकर्णी/५
- **मराठी बांधवांनो..** : दीपक पवार/१३
- **मूलभूत शैक्षणिक प्रश्न...** : अभिजीत हेगशेट्ये/१९
- **मराठी सिनेमा आणि वास्तव** : अशोक राणे/२३
- **कवितेचं पान**/३०
- **मला सतत नवीन आव्हानं हवीत** : डॉ. श्री ठाणेदार/३१
- **जोगवा** : अशोक राणे/३५
- **मराठी थिएटर** : राजीव जोशी/४३
- **मराठी संगीत सर्वाधिक समृद्ध** : अरुण दाते/५५
- **कथा माझ्या पहिल्या चित्रपटाची** : अशोक राणे/६०
- **'जनसंवाद' कशासाठी?** : सु.गो. तपस्वी/६६

संपादकीय

# "What Is ग्रंथाली"

❖ धनंजय गांगल

'ग्रंथाली प्रकाशन' असा ग्रंथालीचा सहजपणे उल्लेख होतो. परंतु ग्रंथाली पुस्तकं प्रकाशित करते, वितरणही करते, पण रूढ अर्थाने ते 'प्रकाशन' नाही. कधीच नव्हतं आणि नसेल.

पुस्तकांपलीकडेही ग्रंथालीच्या कार्यकक्षेत आणि नावात बरंच काही आहे. ती एक विलक्षण कल्पना आहे आणि सुसंस्कृत समाजाची गरजही! ते समजून घेण्यासाठी आपल्याला ग्रंथालीचा जन्म झाला त्या सत्तरच्या दशकात जायला हवं.

सत्तरचं दशक भारताच्या राजकारणातील हे एक अशांत दशक म्हणून ओळखलं जातं. महाराष्ट्रात तर राजकारणाच्या जोडीनं समाजकारण आणि सांस्कृतिकीरणही ढवळून निघत होते. प्रस्थापित जुने विरुद्ध नवे यांच्यातील संघर्ष वेगवेगळ्या चळवळींच्या अंगानं प्रकट होत होता. युक्रांद, स्त्री-मुक्ती, दलित पँथर, अंधश्रद्धा निर्मूलन, प्रायोगिक नाटक, मुंबई- पुण्यात जी सांस्कृतिक सत्ता एकवटली होती तिलाही उर्वरित महाराष्ट्रातच आव्हान मिळत होतं. अशा अनेक चळवळी आपापली स्पेस व्यापण्यासाठी धडपडत होत्या. साहित्यात त्याचा आविष्कार होण्याचा रेटा जबरदस्त होता, पण प्लॅटफॉर्म मिळत नव्हता. तो ग्रंथालीनं दिला. एक प्रकारे त्यांनीच ग्रंथाली 'घडवली.'

यापलीकडे जाऊन ग्रंथाली एक 'वडाचा पार' होती. येताजाता लोक डोकावत. आसपास काय घडतंय त्याबद्दल त्यांना कुतूहल होतं, जिज्ञासा होती आणि त्यांची काही मतंही होती. ग्रंथाली एक असा स्पंज होता जो हे आसपासचं बाष्प टिपत होता.

कुतूहल, जिज्ञासा, विचार, ज्ञान, चांगुलपणा, संवेदना, सुसंस्कृता- माणूस म्हणून जे जे काही आहे- त्याला व्यापणारं 'जाणिवा' हा छान शब्द आहे, त्या जाणिवा रुंदावण्याच्या कार्यात ग्रंथाली सतत प्रयत्नशील असते.

तीनेक वर्षांपूर्वी संजय लीला भन्साळीचा एक चित्रपट आला होता- ब्लॅक! जन्मतः आंधळी, बहिरी आणि म्हणून मुकी असलेल्या हेलन केलरच्या जीवनावर तो बेतलेला होता. ती भूमिका राणी मुखर्जीनं केली होती. 'बी, एल, ए, सी, के - ब्लॅक असा अमिताभच्या आवाजातल्या प्रोमोत जणू आपल्याही बोटांनी ब्रेल अक्षरं वाचल्याची जाणीव व्हावी. जन्मतः मूक-बधीर-दृष्टिहीन राणीशी माणूस म्हणून कुठलाही व्यवहार अशक्य असतो. माणूस नावाचा तो एक चालता मांसाचा गोळा असतो. तिला 'माणूस' बनवण्यासाठी बोलावलेल्या शिक्षकाचे- अमिताभचेही प्रयत्न फोल होत आहेत हे बघितल्यावर सर्वांच्याच भविष्यातील सोयीच्या दृष्टीनं तिचे जन्मदाते तिला 'विजनवासात' टाकण्याचं ठरवतात. तिचा शिक्षक अमिताभ त्यांना परोपरीनं समजावून सांगत असतो की तिची बुद्धी शाबूत आहे, तिला संवेदना आहेत, तिच्या जाणिवा आपण जागृत करू शकतो; फक्त त्याची भाषा वेगळी आहे. तिच्याबाबतीत ती भाषा आहे, स्पर्शाची! माणसाचं माणूसपण, त्याचं जाणिवांशी असलेलं घट्ट नातं आणि या जाणिवांचं संवादाशी असलेलं नातं त्यात फार मार्मिक आणि सहजपणे सांगितले आहे. माणूसपणाच्या या जाणिवा रुंद करण्यासाठी ग्रंथाली धडपडत असते. संवादाच्या या माध्यमातून. सत्तर-ऐंशीच्या दशकांत ग्रंथाली हेच करत होती.

नव्वद नंतर मात्र आसपासची परिस्थिती बदलली. जागतिकीकरण आणि आर्थिक उदारीकरण टप्प्याटप्प्यानं समाजात मुरलं. चळवळी लयास गेल्या, काही विखुरल्या. त्यांची लहान लहान बेटं बनली. ह्या संस्था त्या त्या ठिकाणी चांगलं विधायक काम करत होत्या, पण त्यांचा भर उर्वरित समाजाबरोबर संवाद टाळण्याकडे होता. गांधीजींच्या स्वयंपूर्ण खेड्याचा अर्थ कदाचित 'इतरांशी काही देणं-घेणं नाही' असा लावला गेला.

दुसरीकडे, आर्थिक उदारीकरणात माणसाचे कामाचे तास वाढले. भारताची गेल्या दोन दशकांतील आर्थिक भरभराट ही 'Innovations' मुळे कमी आणि मुख्यतः जास्त श्रमाची संधी आणि मोबदला मिळाल्यानं झाली आहे. माणसं दिवसाचे आठवरून बारा, चौदा तास काम करू लागली. त्यामुळे उर्वरित वेळ शक्यतो कुटुंबासमवेत घालवण्याकडे कल वाढला. काही व्यक्तिगत काम असल्याशिवाय ग्रंथालीच्या पारावर

सहज डोकावायला माणसं येणं कमी झालं. ग्रंथालीची रचना ही 'लीन' रचना आहे. म्हणजे जवळपास पूर्णवेळ अशा एखाद-दोनच व्यक्ती असतात, पण गरज पडेल तेव्हा हे पारावर ये-जा करणारे मुंग्यांसारखे गोळा होतात आणि पडेल ते काम करून उपक्रम तडीस नेतात. पण बदलत्या काळात असा सहभाग घेणाऱ्या कार्यकर्त्यांचा दुष्काळ पडला.

संस्था आणि कार्यकर्ते सोडून तिसरा एक हुशार, बुद्धिमान लोकांचा गट होता. वेगवेगळ्या क्षेत्रांत छोट्या प्रमाणात का होईना ते समाजाचे Opinion-maker होते. पण वेगवेगळी सरकारी पदांची जादू आणि सतत बदलती राजकीय परिस्थिती यामुळे या नेतृत्वानंही हळुहळू कुंपणावर बसणं पसंत केलं. कुठलीही भूमिका घ्यायची नाही आणि त्यासाठी कुठेही फारसं involve व्हायचं नाही! वेळ आलीच तर 'तुझ्या गळा माझ्या गळा' असं all-inclusive बोलायचं. लिहिण्यात तर अडकायचं नाहीच नाही. Don't express, try to impress अशी धारणा वाढीस लागली.

त्यामुळे गेल्या दशकभरात खोलात जाऊन पाहिलं तर संस्कृती, समाजकारणात गोंगाट खूप पण जीवघेणी शांतता पसरली आहे. 'कानठळ्या बसवणारी शांतता' असं राम पटवर्धनांनी त्याचं वर्णन केलं होतं. अशा परिस्थितीत समाजाची स्पंदनं टिपणारी ग्रंथाली गुदमरून जाणं साहजिक होतं. पण तिनं जिद्द सोडलेली नाही. पडत-धडपडत ती सांस्कृतिकी-करणाची पताका खांद्यावर घेऊन चालत राहील.

गेले वर्षभर आपण सगळे जागतिक आर्थिक अरिष्टाच्या अनामिक भीतीखाली वावरतो आहोत. त्यामुळे आर्थिक प्रगतीची जीवघेणी धाव थांबवून, आपल्याला थोडं मागे वळून बघायला, थोडा विचार करायला वेळ मिळाला आहे. या फुरसतीच्या क्षणातच ग्रंथालीकडे तुमचं लक्ष वेधू इच्छितो. कारण तुम्ही-आम्ही-आपण आणि ग्रंथाली काही वेगळी नाही. तुमच्या सगळ्यांच्या मनातील आर्तच इथे प्रकट होत असतं, प्रकाशत असतं.

जहाज बंदरात सुरक्षित असतं पण त्यासाठी ते बनलेलं नसतं, तद्‌वतच 'प्रकाशक' म्हणून ग्रंथाली आयुष्यभर असेल पण ती काही त्यासाठी बनलेली नाही. त्यासाठी काही तिचा जन्म नाही. त्यापलीकडेही "for a larger cause" तिचं अस्तित्व होतं, आहे आणि असलं पाहिजे.

"Imaginations take us to the worlds that never were but, without that we go no where - carl sagan." यातूनच स्फूर्ती घेऊन एक कल्पना मांडुया, महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची. आधी म्हटलं त्याप्रमाणे भाषेला वेगळं अस्तित्व फारसं नाहीच- ती समाजाच्या व्यवहाराशी आणि जाणिवांशी घट्ट जोडलेली आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासातच मराठी भाषेचा विकास दडलेला आहे. हे खूप व्यापक आणि General वाटत असेल तर जरा वेगळ्या अंगानं याकडे बघुया- अजून सुमारे वीसेक वर्षांत भारत एक महासत्ता असेल असं एक भाकीत आहे. निदान जगातील दहा बलाढ्य देशांत त्याचं नाव असेल. ज्या देशाची आर्थिक सत्ता असते त्या देशाला आपली सांस्कृतिक-सामाजिक सत्ता गाजवायला संधी मिळते. किंबहुना, इतर समाज आपसूक अशा महासत्तेकडे आकृष्ट होतात. या सांस्कृतिक, सामाजिक प्रभावाचं जे अवकाश भारताला मिळेल त्यात मराठीची, महाराष्ट्राची छाप आपण कशी पाडणार?

एकूण महाराष्ट्राचं पुढील दहा-वीस वर्षांचं Vision Statment आणि ते कसं साधायचं याचं Document असणं गरजेचं आहे. त्यासाठी महाराष्ट्राची सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, औद्योगिक, कृषी अशा अनेक अंगांची माहिती जी विखुरलेली आहे तिला गोळा करावी लागेल. त्याला इतिहासाचं परिमाण देऊन भविष्याचा वेध घ्यावा लागेल. त्यातून आपल्या Strengths आणि Weaknesses शोधाव्या लागतील. हे माहितीचं भांडार मॅनेज करायला आणि कार्यान्वित करायला गूगल, Internet सारखी tools लागतील. मुख्य म्हणजे आपल्या सगळ्यांचा एकमेकांशी सतत संवाद लागेल.

आव्हान मोठं आहे. त्यात सरकारचा आणि समाजाचा म्हणजे आपला सहभाग आवश्यक आहे. आर्थिक मदत आणि तीही भरघोस आपण करालच याबद्दल मला खात्री आहे. पण त्यापलीकडेही त्याला प्रत्यक्ष हातभार लावण्याचं आणि दिशा देण्याचं कामही आपण कराल याबद्दल शंका नाही.

या दृष्टीनं एक छोटं पाऊल ग्रंथाली उचलत आहे. चंद्रावर गेलेले नील आर्मस्ट्राँग म्हणाले तसं-

म्हणाले तसं - A small step by a man, a large for humankind.

आपल्या प्रतिक्रिया आणि Suggestions ची अपेक्षा ठेवत आहोत.

---

**- धनंजय गांगल**
dhananjay.gangal@gmail.com

# मराठी साहित्यातले प्रवाह

❖ अंजली कुलकर्णी

महाराष्ट्र राज्य सामाजिक, राजकीय, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतिक जाणिवा विकसित होण्याच्या कामामध्ये नेहमीच अग्रेसर राहिलं आहे. सर्व बाबतीत सुधारणावादी, उदारमतवादी, पुरोगामी दृष्टिकोन स्वीकारल्यामुळे राज्य आणि देश उभारणीच्या कामात महाराष्ट्राचं योगदान महत्त्वाचं राहिलं आहे. या सगळ्याचं प्रतिबिंब महाराष्ट्राच्या साहित्यिक बाजूवर पडलं यात काही आश्चर्य नाही. मराठी साहित्यही समाजात घडणाऱ्या सर्व प्रकारच्या घटनांना कवेत घेत अधिकाधिक समृद्ध होत गेलं.

गेल्या पन्नास वर्षांतल्या मराठी साहित्याकडे एक नजर टाकली तरी लक्षात येतं की मराठी साहित्य आणि राज्यातल्या, देशातल्या विविध चळवळी यांचं एक अतूट नातं आहे. किंबहुना, सामाजिक-राजकीय चळवळी आणि साहित्यिक चळवळी या हातात हात घालूनच आलेल्या आहेत. या परिप्रेक्ष्यातून मराठी साहित्याकडे पाहिलं तर दलित चळवळ, ग्रामीण चळवळ, स्त्रीमुक्ती चळवळ, आदिवासी चळवळ अशा चळवळींनी दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी जाणिवांच्या साहित्याला जन्म दिला आणि ते समृद्ध केलं हे लक्षात येतं!

या दृष्टीनं १९६० हे साल अत्यंत महत्त्वाचं ठरलं. मुख्य म्हणजे महाराष्ट्राची निर्मिती या वर्षी झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यानं महाराष्ट्रीय माणसांना स्वओळख मिळाली. साहित्यात वेगवेगळ्या नव नव्या प्रवाहांचा उगमही याच सुमारास झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखं धगधगतं नेतृत्व १९२७ पासून दलितांमध्ये स्वजाणिवेचं स्फुल्लिंग चेतवत होतं. दलित चळवळीला एखाद्या धारदार शस्त्रासारखं स्वरूप प्राप्त झालेलं होतं. ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा मंत्र देऊन बाबासाहेबांनी दलित माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठीचा मार्गच दाखवून दिला होता. आंबेडकरांनी दाखवलेल्या प्रकाशाच्या मार्गावरून, अज्ञानात वावरत असलेला हा समुदाय वाटचाल करू लागला तेव्हा त्याला जागृतीची नवी दृष्टी आणि आत्मविश्वास प्राप्त झाला. हजारो वर्षांचे जुलूम, अन्याय, अत्याचार, दास्य, दैन्य यांच्या विरोधात तो नव्यानं प्राप्त झालेलं आत्मतेज घेऊन उभा राहिला. नव्यानं लिहू-वाचू लागलेले दलित युवक स्वतः वरील अन्यायाचा प्रखर उद्‌गार साहित्यातून मांडू लागले. क्रांतीचा घोष करू लागले. दलित साहित्याचं हे हत्यार दलित चळवळीला पुढे रेटणारं ठरलं.

दलित लेखकांचा बहुतांश उद्‌गार हा कविता आणि आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारातून उमटला. नामदेव ढसाळ, दया पवार, राजा ढाले, अर्जुन डांगळे, केशव मेश्राम, ज. वि. पवार हे दलित कवितेचे प्रारंभीचे शिलेदार. देशाला स्वातंत्र्य मिळालं पण आमच्या जगापर्यंत यातलं काहीच पोचलं नाही. तिथं फक्त दारिद्र्य, घाण, अज्ञान, रोगराई, अन्याय, अत्याचार आणि अप्रतिष्ठा यांचंच साम्राज्य राहिलं. ही लोकशाही आहे का? हा प्रश्न ढसाळांनी विचारला. ते म्हणतात-

‘लोकशाही डुल्लत डुल्लत जाय
आपुन त्वांड वासून पाहय
ही लोकशाही नाहीये
ही विटंबना सतरा पिढ्यांची’

दलित कवितेचा हा प्रवाह १९८०-९० पर्यंत जोरकसपणानं वाहत राहिला. त्यात सुरेखा भगत, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार या स्त्रिया दलित जाणीव आणि स्त्री जाणीव

अशी दुपदरी दुःखाची जोमदार कविता घेऊन आल्या. त्याशिवाय शिवा इंगोले, सुधाकर गायकवाड, अशोक बनसोडे, अरुण कांबळे, चंद्रकांत वानखेडे, भीमराव शिरवाळे, प्रकाश खरात, प्रसेनजित गायकवाड असे अनेक कवी लिहिते झाले. आजही लहू कानडे (टाचाटिभा), डॉ.सिद्धोधन (पेटत्या पलित्यांचा जुलूस), गणेश मरकळ (वेदनांची फुलं) असे उल्लेखनीय कवी लिहीत आहेत.

या सगळ्या कवींमध्ये वेगळेपणानं उठून दिसणारी कविता लिहिली आहे प्रज्ञा दया पवार यांनी. त्यांचे 'अंतस्थ', 'उत्कट जीवघेण्या धगीवर' आणि 'मी भिडवते समग्राशी डोळा' हे कवितासंग्रह आहेत. अतिशय धारदार शैलीत अभावांच्या जिण्याचं दुःख प्रज्ञानं व्यक्त केलंय. प्रज्ञाची कविता केवळ आक्रोशाच्या पातळीवर न राहता परिस्थितीच्या आकलनाचं योग्य दर्शन घडवते.

या सर्व कवींमध्ये मुकुटमणी म्हणावा असा एक कवी नुकताच काळाच्या पडद्याआड गेला. अरुण काळे हे या कवीचं नाव. त्याचे 'कॅक्टस', 'सायरनचे शहर', 'नंतर आलेले लोक' हे संग्रह प्रकाशित आहेत. अरुण काळे यांनी समकालीन वास्तव यथार्थपणे समजून घेतलं होतं. त्यांच्या कवितेत इतिहासाची जाण आहे. म्हणून त्यांचं समकालीन भानही तितकंच वास्तववादी आहे. आजच्या माणसासमोरील नैतिकतेच्या पेचांना त्यांनी शब्दबद्ध केलंय. भुजंग मेश्राम हादेखील दलित जाणिवेचा एक सशक्त कवी काळाच्या पडद्याआड गेला.

दलित लेखकांना, मराठी साहित्यात आजवर कधी न दिसलेल्या वेगळ्या अनुभवविश्वाचं दर्शन घडवण्यासाठी आत्मचरित्र हे एक उत्तम माध्यम सापडलं. वेगवेगळ्या जातीजमातींमधील या लेखकांचं भयाण दारिद्र्य, दैन्य, अज्ञान, अन्याय, अत्याचार, गुलामी, रोगराई, अंधश्रद्धा यांत खितपत पडलेलं आयुष्य, त्यांना सहन करावं लागलेलं सर्वपरीच्या अभावांचं जिणं यातून गोचर झालं. प्र. ई. सोनकांबळे यांचं 'आठवणींचे पक्षी', दया पवारांचं 'बलुतं', लक्ष्मण माने यांचं 'उपरा'. लक्ष्मण गायकवाड यांचं 'उचल्या', शरदकुमार लिंबाळे यांचं 'अक्करमाशी', किशोर शांताबाई काळे यांचं 'कोल्हाट्याचं पोर' अशी अनेक आत्मचरित्रं आली आणि त्यांनी प्रस्थापित साहित्यविषयक समजुतींना मोठा हादरा दिला.

*आजच्या भोवतालाविषयीचं अचूक भान जेवढं ग्रामीण भागातील लेखक-कवींमध्ये आहे तेवढं ते नागरी, शहरी लेखक-कवींमध्ये दिसत नाही. वास्तवाचा सामना तर दोघंही करत आहेत. दोघांपुढील वास्तवाची प्रत वेगवेगळी आहे. परंतु परिस्थितीच्या आकलनाचं जे दर्शन ग्रामीण लेखनात घडतं तसं नागरी लेखनात घडत नाही.*

नाटकांच्या संदर्भात-रामनाथ चव्हाण (बामनवाडा), दत्ता भगत, सिद्धार्थ तांबे (जाता नाही जात) प्रसेनजित गायकवाड, संजय पवार अशा नाटककारांनी दलित रंगभूमीवर वेगळे आविष्कार घडवले. प्रज्ञा पवार यांचं खैरलांजी हत्याकांडावरील नाटकही गाजलं, ही अगदी अलीकडची म्हणजे २००५ नंतरची घटना.

दलित साहित्याच्या मूल्यमापनासाठी प्रचलित मापदंड पुरेसे नाहीत, त्यासाठी वेगळ्या वाङ्मयीन मूल्यांची गरज आहे असं सर्वप्रथम यशवंत मनोहर यांनी मांडलं. रा. ग. जाधव, यशवंत मनोहर यांनी दलित साहित्यासाठी वेगळ्या सौंदर्यशास्त्राची निर्मिती केली.

मात्र दलित साहित्याचा हा जोरकस प्रवाह नव्वदोत्तरी काळात हळूहळू आटत जाऊन आता थंडावलाय याचं मुख्य कारण म्हणजे भारतात त्या काळात सुरू झालेली उदारीकरण-जागतिकीकरणाची प्रक्रिया. सगळ्याच सामाजिक चळवळी या काळात थंड पडल्या, तशी दलित चळवळही थंड पडली. पर्यायानं दलित साहित्याच्या निर्मितीलाही खीळ बसली.

१९६० च्या सुमारासच मराठीत ग्रामीण साहित्याची

चळवळही फोफावली. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, रा.रं.बोराडे, द. मा. मिरासदार, आनंद यादव, शंकरराव खरात यांसारख्या लेखकांनी ग्रामीण साहित्य विषयीच्या जुन्या कल्पना मोडीत काढून वास्तववादी, खरंखुरं ग्रामीण चित्र आपल्या लेखनात रंगवायला सुरुवात केली.

ऐंशीनंतरच्या काळात कवितेमध्ये ना. धों. महानोर, भालचंद्र लवलेकर, इंद्रजित भालेराव, नारायण सुमंत यांनी शेती, शेतीमधले प्रश्न, शेतकऱ्यांची दुःखं कवितेत मांडली. 'दर साल दर शेकडा' हा वीरधवल परब यांचा कवितासंग्रह त्या दृष्टीनं महत्त्वाचा ठरला. संजय बोरुडे, भारत दौंडकर, कैलास दौंड, विलास वरे, पांढरी पांडे ही आजची मुलं शेतकऱ्यांच्या आत्महत्या, सरकारचं शेतीकडे त्यातील-प्रश्नांकडे झालेलं अक्षम्य दुर्लक्ष यावर तळमळीनं लिहीत आहेत. सदानंद देशमुख, केशव देशमुख, प्रतिमा इंगोले यासारख्या दमदार, सकस लेखक-कवींनी ग्रामीण साहित्याची धुरा आपल्या खांद्यावर पेलून धरली आहे. या संदर्भात जाता जाता पण एक महत्त्वाचा मुद्दा मांडावासा वाटतो. तो म्हणजे, आजच्या भोवतालाविषयीचं अचूक भान जेवढं ग्रामीण भागातील लेखक-कवींमध्ये आहे तेवढं ते नागरी, शहरी लेखक-कवींमध्ये दिसत नाही. वास्तवाचा सामना तर दोघंही करत आहेत. दोघांपुढील वास्तवाची प्रत वेगवेगळी आहे. परंतु परिस्थितीच्या आकलनाचं जे दर्शन ग्रामीण लेखनात घडतं तसं नागरी लेखनात घडत नाही. उद्धव शेळके (धग), अण्णाभाऊ साठे (फकिरा), राम नगरकर (रामनगरी), रस्तुम अचलखांब यांचं 'गावकी' हे सगळे ग्रामजीवनाच्या भूमीवर फुलणारे, ग्रामजीवनाचा संदर्भ असलेले लिखाण आहे. ग्रामीण जीवन, बलुतेदारी, तिथल्या रूढी-परंपरा, राजकारण, समजुती, लोकेतिहास या सगळ्यांचं दर्शन आजही ग्रामीण लेखक घडवत आहेत.

परंतु ग्रामीण साहित्यालाही स्वतःच्या काही मर्यादा पडलेल्या दिसतात. मुख्य म्हणजे ग्रामीण भागातील शेतमजूर, त्यांचे प्रश्न, त्यांचं तीव्र दारिद्र्य, त्यांच्या अस्तित्वाचाच निर्माण झालेला प्रश्न याचं चित्रण मराठी ग्रामीण साहित्यात अभावानं आलं आहे. शंकर पाटील, शंकरराव खरात, व्यंकटेश माडगूळकर, उद्धव शेळके यांच्या काही कथांचा अपवाद सोडला तर ग्रामीण जीवनातील दारिद्र्याचा टचटचीत प्रत्यय किती ठिकाणी येतो असा प्रश्न ग्रामीण कथालेखक आणि समीक्षक नागनाथ कोत्तापल्ले यांनी केला आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे आजचं ग्रामीण साहित्य हे प्रामुख्यानं ग्रामीण मध्यमवर्गीयांभोवती घोटाळतं आहे. लेखकांच्या अनुभव क्षेत्राच्या मर्यादा त्यांच्या लिखाणावरही येत आहेत की काय असं त्यांना वाटतं.

त्याचप्रमाणे, ग्रामीण जीवनातील परिवर्तनाचं प्रतिबिंबही ग्रामीण साहित्यात पूर्णांशानं पडलेलं नाही. साखर कारखाने, यंत्रयुग, हे सगळे बदल ग्रामीण जीवनात झाले. बलुतेदारीचा अस्त झाला. या सगळ्याचा माणसांच्या वृत्ती-प्रवृत्तीवर काय परिणाम झाला, माणसं बदलत कशी गेली याचा शोध ग्रामीण साहित्यानं घ्यायला हवा. ग्रामीण भागातील आर्थिक केंद्र, सत्ताकेंद्रं, व्यवस्था बदलल्या तरी आधी ज्यांच्याकडे होती त्यांच्याकडेच राहिली. पूर्वीचे सरंजामदार होते, त्यांच्याकडेच उत्पादनाची नवी साधनं आली. पूर्वी जे बलुतेदार, फिरस्ते होते तेच आज शेतमजूर आहेत. यावरही ग्रामीण साहित्यिकांनी प्रकाशझोत टाकायला हवा. या सगळ्या अन्यायाविरुद्ध, दारिद्र्याविरूद्ध ग्रामीण साहित्यात विद्रोहाची जाणीव का येत नाही हाही एक विचार करायला लावणारा प्रश्न आहे.

दलित साहित्य, ग्रामीण साहित्य यांच्याबरोबरीनं किंबहुना त्यापेक्षाही अधिक जोमानं उसळून आलेला साहित्यातील आणखी एक प्रवाह म्हणजे स्त्रीवादी साहित्य. सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, म.गांधी, आगरकर, लोकहितवादी, महर्षी धोंडो केशव कर्वे, र.धों. कर्वे, सयाजीराव गायकवाड यांच्या प्रयत्न-प्रेरणेनं स्त्री उद्धार, स्त्री कल्याणाच्या वाटेनं स्त्रिया शिकू लागल्या, लिहूवाचू लागल्या, विचार करू लागल्या, त्यातील काहीजणी अर्थार्जनही करू लागल्या. परंतु १९७५ साली युनोनं आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर केलं आणि संपूर्ण जगभर स्त्रीमुक्तीची लाट उसळली. भारतात, महाराष्ट्रातही ती पोचली यात काही नवल नव्हतं, परंतु या लाटेमुळे १९७५ हे साल पुढच्या पंचवीस-तीस वर्षांसाठी टर्निंग पॉइंट ठरलं. १९७५ चं वर्ष, त्यानंतर १९७५ ते १९८५चं महिला सक्षमी दशक या काळात स्त्रीजीवन आणि समाजजीवन यामध्ये प्रचंड परिवर्तन घडून आलं. जाणिवेच्या पातळीवर नवी युगसंवेदना आली.

Our clients call us

**trusted, insightful**

communications partner

We are even more.

elixirdesigns

involve. innovate. inspire.

Visual Communications
Electronic Communications
Events & Promotions
Print Services

To know more about us please visit,
**www.elixirdesigns.co.in**

2a, 2nd floor, vimal udyog bhavan, mahim (w),
mumbai - 400016, india. tel: 91-22 6590 9100, 6552 6696
mobile: 91-22 9820593880 mail: ganesh@elixirdesigns.com

१९७५ च्या महिला वर्षाचं ज्या उत्साहानं आणि जोमानं स्वागत झालं त्यातून स्त्रीमुक्तीची चळवळ आकाराला आली. स्त्रीवादी विचार मांडला जाऊ लागला. स्त्रियांवरील अन्यायाच्या घटना पुढे ठळकपणे येऊ लागल्या आणि या परिस्थितीतील बदलांसाठी आपणच पुढे आलं पाहिजे, आपले हक्क आणि अधिकार कुणी तुम्हाला हातात आणून देणार नाही, ते तुमचे तुम्हालाच मिळवावे लागतात, त्यासाठी विद्रोह करावा लागतो याविषयीचं भान यातून स्त्रियांना येत गेलं. सभोवती सत्याग्रह, आंदोलनं, मोर्चे, संप, हरताळ हे घडतच होतं. एक प्रकारचं तप्त वातावरण त्यातून निर्माण झालं होतं. त्यातूनही स्त्रीमनाची जडणघडण होत होती.

'Towards Equality' या आयोगाच्या पाहणीतून स्त्रीजीवनातलं वास्तव, स्त्रियांवर होणारे अन्याय-अत्याचार हे ठळकपणे पुढे आलं. त्यातून स्त्रीवर्ष हे केवळ साजरं करण्याचं वर्ष नसून स्त्रीजीवनाची सामाजिक दृष्टीनं पुनर्बांधणी, पुनर्घटना करण्याचं वर्ष आहे याचं भान आलं. त्यातून स्त्रीमुक्ती परिषदेचं आयोजन करण्यात आलं. वेगवेगळ्या शहरांत स्त्रीमुक्ती संघटना स्थापना झाल्या. १९७७ मध्ये 'बायजा' हे द्वैमासिक स्त्रियांसाठी सुरू झालं. सौदामिनी राव यांनी पुण्यात १९७९ साली 'स्त्री मुक्ती आंदोलन समिती' स्थापन केली. विद्या बाळ 'स्त्री' मासिकाचं संपादन करत होत्या. 'स्त्री उवाच','मैत्रीण','नारी समता मंचे' पुणे, स्त्री अन्यायविरोधी मंच औरंगाबाद, 'महिला दक्षता समिती', कोल्हापूर, 'महिला हक्क' नाशिक अशा अनेक स्त्री संघटना स्थापन झाल्या.

स्त्री जाणिवांच्या जागृतीचं काम साहित्य आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांमधून झालं. ज्योती म्हापसेकर यांनी लिहिलेल्या 'मुलगी झाली हो' या नाटकानं समाजात विचारजागृतीचं काम केलं. 'स्त्री मुक्तीची ललकारी'सारखी अनेक गीतं स्त्री चळवळीमध्ये आत्मविश्वास आणि जोश निर्माण करू लागली. स्त्रीमुक्तीची कल्पना मूठभर शहरी-सुशिक्षित स्त्रियांची, त्यांच्यासाठी नसून सर्व स्तरांवरील, सर्व जातिधर्माच्या स्त्रियांसाठी आहे यासाठी स्त्री चळवळीनं जाणीवपूर्वक प्रयत्न केले.

अन्यायग्रस्त महिलांना नैतिक सामर्थ्य पुरवण्याचं आणि त्याद्वारे समाजात स्त्रीमुक्तीविषयक विचार पेरण्याचं काम या स्त्रीसंघटनांनी केलं. मंजुश्री सारडा खटला, शैला लाटकर, शुभांगी साने खून खटला, शहाबानो घटस्फोट खटला, मधुरा बलात्कार प्रकरण, हुंडाबळीच्या अनेक घटना यांविरुद्ध संघटित स्वरूपात आवाज उठवण्याचं महत्त्वाचं काम स्त्रियांनी केलं.

विद्या बाळ, डॉ.नीलम गोऱ्हे, वसुधा सरदार, सौदामिनी राव, छाया दातार, विद्युत भागवत, मालिनी तुळपुळे, रजिया पटेल, मुमताज रहिमतपुरे, शारदा साठे, नीरा आडारकर, साधना दधिच, ज्योती लांजेवार या कार्यकर्त्या स्त्रियांची फळीच्या फळी उभी राहिली.

या सगळ्यातून एक घडले. स्त्रीमुक्तीचा विचार किमान मानसिक पातळीवर सर्व स्तरांवरील स्त्रियांपर्यंत पोचला. या स्त्री संघटनांचा आवाज इतका तीव्र होता की समाजातल्या सर्व घटकांपर्यंत स्त्रीमुक्तीची किमान ढोबळ भूमिका पोचली. त्यातून गावोगावच्या स्त्रियांमध्ये आत्मभान प्राप्त होऊन, त्या स्वतःची अस्वस्थता शब्दांतून प्रकट करू लागल्या. स्त्री साहित्याचा एक मोठाच, जोरकस प्रवाह त्यातून उसळून वर आला. स्त्रिया लिहित्या झाल्या.

सुरुवातीच्या काळात छाया दातार (मी तरुणी, स्त्री-पुरुष, पुरुषकेंद्री) विद्या बाळ (शोध स्वतःचा) 'बायकांचा जन्म' (अनु.शांता किर्लोस्कर), वसुंधरा पटवर्धन (आमचे स्त्री जीवन) भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी (मी बाई आहे म्हणून), सुनीती पुंगलिया (स्त्री आणि कायदा),प्रतिभा रानडे (बुरख्याआडच्या स्त्रिया) अशा अनेकांनी लिहायला सुरुवात केली. शांता गोखले, कमल देसाई यांसारख्या ज्येष्ठ लेखिका लिहीत होत्याच. मंगला गोडबोले (वयात येताना, कुंपण आणि आकाश), विद्युत भागवत (स्त्री प्रश्नांची वाटचाल) यांनीही स्त्रीप्रश्नांवर विपुल लिहिलं.

स्त्रियांच्या जाणिवांचा पहिला उत्स्फूर्त आविष्कार त्यांच्या कवितांमधून झाला. कुठे ना कुठे व्यक्तिगत आयुष्यात काळजाला ठेच लागलेल्या स्त्रिया कवितांमधून स्वतःला व्यक्त करू लागल्या. १९७५ ते आजपर्यंत अव्याहतपणे स्त्रीकवितेचा प्रवाह एखादी जखम वाहावी त्याप्रमाणे वाहताना दिसतो. या काळात उदंड स्त्री कविता लिहिली गेली. त्यात विशेषत्वानं पुढे आलेल्या कवयित्रींमध्ये अश्विनी धोंगडे (स्त्रीसूक्त), मलिका अमरशेख (वाळूचा प्रियकर), रजनी परुळेकर (काही कविता), अनुराधा पाटील, प्रभा गणोरकर (विवर्त), नीरजा (वेणा, स्त्रीगणेशा), प्रज्ञा पवार (उत्कट

जीवघेण्या धगीवर, मी भिडवते समग्राशी डोळा), आसावरी काकडे (स्त्री असण्याचा अर्थ), सुजाता महाजन, कविता महाजन (तत्पुरुष), सुनंदा भोसेकर, ज्योती लांजेवार, हिरा बनसोडे, सुरेखा भगत अशा अनेक कवयित्रींनी धारदार जाणिवा व्यक्त करणारी कविता लिहिली.

कथा-कादंबरी लेखनात गौरी देशपांडे हे नाव अतिशय वेगळेपणानं गाजलं. 'एकेक पान गळावया', 'दुस्तर हा घाट', 'गोफ','उत्खनन','तेरुओ आणि काही दूरपर्यंत', 'चंद्रिके गं सारिके गं' या त्यांच्या कादंबऱ्यांमधून त्यांनी स्त्री-पुरुष नात्याचा वेगवेगळ्या स्तरांवरचा, वेगवेगळ्या दृष्टिकोनातून, वेगवेगळ्या परिस्थितीत घेतलेला शोध सापडतो. जगभर विखुरलेल्या त्यांच्या पात्रांमुळे, स्थलवैविध्यामुळे या लेखनाला एका अर्थानं आंतरराष्ट्रीयताच प्राप्त झालीय. गौरी देशपांडे यांनी रंगवलेली स्त्री पूर्णपणे नैसर्गिक, मोकळी आणि स्वयंभू अशा टाइपची आहे. स्वतःच्या अतिशय मोकळ्या, धीट, बिनधास्त शैलीमुळे गौरी देशपांडे यांच्या सांगण्यात जो सरळ थेटपणा आला आहे तो स्त्रीलेखनातच काय एकंदरीतच साहित्यात अभूतपूर्व असाच म्हणता येईल.

मेघना पेठे या ८० नंतरच्या काळातल्या एक प्रॉमिसिंग लेखिका. 'हंस अकेला', 'आंधळ्याच्या गायी' हे कथासंग्रह आणि 'नातिचरामि' या कादंबरीमुळे त्या समाजासमोर आल्या. मेघना पेठे यांनीही आपल्या लिखाणात स्त्रीपुरुष संबंधांविषयी मोकळेपणानं लिहिलं. स्त्री-पुरुष नातं, ते नातं टिकवण्यातली वेदना, तुटल्यातली जखम, तिची वेदना या सगळ्याची उलटसुलट तपासणी करताना मेघना पेठेंचं लिखाण तत्त्वज्ञानाच्या, दार्शनिकतेच्या पातळीवर जातं. उंची गाठणारी जीवनभाष्यं त्यांनी आपल्या लेखनात केलेली आहेत. तीव्र संवेदनशीलतेच्या पोटी येणारी अस्वस्थता, तगमग, निराशा व्यक्त करताना मेघना पेठेंचं लिखाण काव्यात्म पातळीवर जाऊन पोचतं. मराठीतील आजच्या काळाची एक सशक्त लेखिका म्हणून मेघनाचा उल्लेख करता येईल.

अगदी अलीकडच्या काळात कविता महाजन या लेखिकेच्या 'ब्र' आणि 'भिन्न' या दोन कादंबऱ्या पुष्कळ गाजल्या. या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये कविता महाजन यांनी वेगळ्या प्रकारचे विषय हाताळले आहेत. 'ब्र'मध्ये आदिवासी स्त्रियांविषयी तर 'भिन्न' या कादंबरीत एड्सग्रस्त स्त्रियांविषयी त्यांनी लिहिलं आहे. परंतु या दोन्ही कादंबऱ्या कादंबरी या संज्ञेपर्यंत पोचत नाहीत. एक प्रकारच्या रिपोर्ताज किंवा सर्व्हेचं स्वरूप असलेल्या या कादंबऱ्या ललित साहित्य म्हणून श्रेष्ठ नसल्या तरी त्यातील डॉक्युमेंटेशन महत्त्वाचं आहे.

याखेरीज, गेली अनेक वर्षं सानिया, आशा बगे यांनी स्त्रीजाणिवेचं प्रगल्भ लिखाण केलं आहे. मनस्विनी लता रवींद्र, प्रज्ञा पवार यांच्या रूपानं मराठीमध्ये स्त्री नाटककारांची उणीवही भरून निघाली आहे.

साहित्याच्या या विविध प्रवाहांबरोबरच आदिवासी साहित्य, विज्ञानवादी साहित्य, माहितीपर साहित्य या प्रवाहांचा उगमही मराठीमध्ये झाला. विज्ञाननिष्ठ साहित्यामध्ये ज्येष्ठ संशोधक जयंत नारळीकर, सुबोध जावडेकर, निरंजन घाटे, दीपक शिकारपूर, विजय भटकर, लक्ष्मण लोंढे, अच्युत गोडबोले यांचा समावेश करावा लागेल. माधुरी शानभाग या स्त्री लेखिकेनंही उत्तम विज्ञाननिष्ठ साहित्याची निर्मिती केली. निरंजन घाटे, दीपक शिकारपूर, विजय भटकर, अच्युत गोडबोले यांनी विशेषत्वानं विज्ञाननिष्ठ माहितीपर लिखाण करून नव्या जगाशी वाचकांचा सातत्यानं परिचय करून दिला. त्यातही अच्युत गोडबोले आणि निरंजन घाटे यांचं नाव विशेषत्वानं घ्यावं लागतं. अच्युत गोडबोले यांनी कॉम्प्युटरपासून अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, साहित्य आणि संगीतापर्यंत अनेक विषयांवर सोप्या भाषेत मूलगामी असं लिखाण केलं.

१९७५ नंतर देशाच्या, राज्याच्या पातळीवर अनेक घटना वेगवान पद्धतीनं घडत गेल्या. आणीबाणी, उदारीकरणाची प्रक्रिया, दूरदर्शनचा झपाट्यानं प्रसार, अनेक खाजगी वाहिन्यांचा उगम, बाबरी मशिदीवरून उद्‌भवलेला वाद आणि मशीद पाडण्यात झालेली परिणती, हिंदूमुस्लिम देशांतर्गत चिघळलेली परिस्थिती, कारगिल युद्ध, शेजारी राष्ट्रांशी बदललेले संबंध, युनायटेड स्टेट्स ऑफ रशियाचे तुकडे, कम्युनिझमचा पराभव, देशातलं आघाड्यांचं राजकारण, दहशतवादाचा फोफावलेला भस्मासुर, नियंत्रणाबाहेर चाललेल्या नागरी समस्या, गुंडगिरी, भ्रष्टाचार, हिंसाचार, गुन्हेगारी यांना देशभर आलेला ऊत, संगणकाचं आगमन आणि आयटीचं निर्माण झालेलं प्रस्थ, मोबाईल क्रांती, माध्यमांचा वाढता उपद्रव, शेतकऱ्यांच्या आत्महत्या अशा अनेकानेक घटनांनी देश-राज्य गजबजून गेलं, माहितीचा

मारा एवढा वाढला की त्यातलं काय स्वीकारायचं-काय नाही, काय खरं काय खोटं, काय उचित काय अनुचित याबाबत सामान्य माणसाचा गोंधळ उडू लागला. जगात, देशात, सभोवताली जे काही घडतं आहे त्याचा नक्की अर्थ काय आहे हे कुणीतरी समजावून सांगण्याची त्याला गरज भासू लागली. भोवतालच्या समकालीन वास्तवाचं अचूक आकलन करून लिहिणाऱ्या विचारवंतांचं लेखन वाचकांना महत्त्वाचं वाटू लागलं. १९९० नंतरच्या काळात ते निळू दामले, सुहास पळशीकर, डॉ. कुमार सप्तर्षी, भानू काळे, यशवंत सुमंत, विजय तेंडुलकर, पुष्पा भावे यांसारख्या विचारवंतांनी केलं.

'समकालीन साहित्य' हा देखील एक मर्यादित स्वरूपाचा परंतु महत्त्वाचा असा प्रवाह नव्वदोत्तरी काळामध्ये साहित्यात अवतरला. या समकालीन लेखक कवींनी प्रस्थापित मधल्या सर्व साहित्याचे दोर कापून तुकारामांच्या जातकुळीशी आपलं नातं सांगितलं. स्वतःला समकालीन जाणिवेशी जोडून घेताना आजच्या काळातले मानवी संबंध, माणसाच्या जगण्याला येत चाललेली यंत्रवत, कृत्रिम अवस्था, व्यवस्थेच्या भिंतीमध्ये घुसमटणारं त्यांचं अस्तित्व आणि भोवतालाची कोंडी फोडण्यासाठी त्यानं चालवलेली खटपट याचं दर्शन घडवलं. अभिधानंतर (हेमंत दिवटे), नव्यांची अक्षर चळवळ (अरुण म्हात्रे) अशा नियतकालिकांमधून समकालीन वेदनेला वाट मिळू लागली. खेळ, दर्शन, परिवर्तनाचा वाटसरू, अशी अनेक नियतकालिकं सुरू झाली. यातून रमेश इंगळे-उत्रादकर, मंगेश काळे, प्रवीण बांदेकर, वीरधवल परब, गणेश वसईकर, संतोष पवार, प्रफुल्ल शिलेदार, बलवंत जेऊरकर, नितीन वाघ, श्रीधर नांदेडकर, गणेश विसपुते, श्रीधर तिळवे, राजन लाखे असे अनेक लेखक-कवी उदयाला आले.

आजच्या घडीला कोणते महत्त्वाचे गद्यलेखक लेखन करत आहेत हे पाहिलं तर लक्षात येतं की भालचंद्र नेमाडे, दि. पु. चित्रे, अरुण कोलटकर यांच्याशी ज्यांची नाळ जोडली गेली आहे असे अनेक लेखक आज सौष्ठव- पूर्ण लेखन करत आहेत. त्यामध्ये मिलिंद बोकील (उदकाचिया आर्ती), राजन गवस (तणकट, ताम्रपट), रंगनाथ पठारे (टोकदार सावलीचे वर्तमान, भर चौकातील अरण्यरुदन), भारत सासणे (शुभवर्तमान), पंकज कुरुलकर (जंगल) राजन खान (सतनागत) आणि मेघना पेठे (नातिचरामि), कविता महाजन (ब्र, भिन्न), संजय जोशी यांची नावं घ्यावी लागतील. यापैकी पंकज कुरुलकर यांचं नवं लिखाण एवढ्यात आलेलं नाही. कविता महाजन यांना कादंबरीचं प्राणतत्त्व अजून गवसलेलं नाही, तर राजन खान उदंड निर्मिती करून बटबटीत वास्तवाचा कलाहीन पसारा मांडण्यातच गर्क झालेले आहेत. मात्र रंगनाथ पठारे, मिलिंद बोकील, मेघना पेठे आणि भारत सासणे, राजन गवस हे गंभरापणानं, अनुभवाच्या गाभ्याला कलात्मकपणे हात घालत आजच्या जगाची गुंतागुंत उकलून दाखवत मराठी कथा-कादंबरीच्या वैभवात भर घालत आहेत.

गेल्या तीस-पस्तीस वर्षांमधला हा साहित्यिक आलेख अर्थातच परिपूर्ण नाही कारण आज रोज नवी पंचवीस पुस्तकं साहित्याच्या दालनात दाखल होत आहेत. संगणकामुळे छपाईची प्रक्रिया इतकी सोपी झाली आहे की स्वतःचे पैसे घालून, स्वतःची सवंग पुस्तकं स्वतः काढण्याची घाई लेखक-कवींना झाली आहे. त्यामुळे मराठी साहित्यात भरताडाची मोठ्या प्रमाणावर भरती होते आहे. दुसऱ्या बाजूला वाचकांनी पुस्तकांकडे जवळजवळ पाठ फिरवली आहे. प्रकाशन व्यवहार हा भोंगळ आणि धूर्त माणसांच्या ताब्यात जात चालला आहे. खपाऊ आणि दर्जेदार पुस्तकं यामधलं अंतर झपाट्यानं वाढत चाललं आहे. तरीदेखील राजहंस, पॉप्युलर, मौज, ग्रंथाली, लोकवाङ्मय गृह यांसारख्या प्रकाशन संस्था आजही नवं, ताजं आणि दर्जेदार देण्याचा प्रयत्न करत आहेत. वाचन संस्कृतीच्या प्रसाराचं काम व्यवहारातील नैतिकता सांभाळून करत आहेत. 'अनुभव', 'अंतर्नाद', 'मिळून साऱ्या जणी', 'सत्याग्रही', 'प्रतिष्ठान' यांसारखी नियतकालिकं वाचकांच्या मनांची मशागत करून समाजाची निकोप वाढ व्हावी यासाठी प्रयत्नशील आहेत.

महाराष्ट्राचं आजचं साहित्यिक चित्र असं संमिश्र, विविध रंगांत रंगलेलं आहे.

---

**- अजंली कुलकर्णी**
३, विघ्नहर अपार्टमेंट, जयवर्धमान सोसायटी
बिबवेवाडी रस्ता, पुणे-४११०३७
भ्रमणध्वनी - ९९२२०७२१५८


FOUNTAIN
फाऊंटन म्युझिक कं. प्रस्तुत
सुमधुर संगीताचा अनमोल नजराना
मनमोर
तुला पाहताना
गुरुचीये व्दारी
चित्रपट, नाट्य संगीत, नाटक, भक्तीगीत, भावगीत, लोकगीत, कोळीगीत,
एनिमेशन आणि इतर बऱ्याच दर्जेदार गीत/संगीताचा खजीना
।। गीतरामायण ।।
For Video Streaming Log on to : rajshri.com · bigflix.com · mypopkorn.com · For Audio Streaming Log on to: in.com
Visit us at : fountainmusiccompany.com E-mail : fountainmusic@yahoo.com Customer care No. 020-24491670
BRANCH OFFICE : 3, DREAMLAND THEATRE BUILDING,1st FLOOR, TRIBHUVAN ROAD, MUMBAI - 400 004. TEL : 022 - 23887039 / 23889440

# मराठी बांधवांनो,

❖ दीपक पवार

परदेशस्थ मराठी माणसांशी मराठीच्या प्रश्नांबद्दल बोलताना काही प्रश्न मनात आहेत. महाराष्ट्रातल्या आणि बाहेरच्या मराठी माणसांचं मराठी भाषेच्या प्रश्नांचं आकलन मूलतः भिन्न असतं. परदेशात तुम्हाला मराठीबद्दलच्या प्रश्नांचं भान असणं पुरेसं ठरू शकतं. महाराष्ट्रात मात्र तेवढं पुरेसं ठरत नाही, कारण मराठी भाषा, समाज आणि संस्कृतीचं जे काही बरं-वाईट व्हायचंय, ते प्रामुख्यांनं महाराष्ट्रातच व्हायचंय. बृहन्महाराष्ट्रातले मराठी लोक त्यात साथ देऊ शकतात, पण विकसित राष्ट्रांतल्या सुसंधी आणि सुबत्ता त्यागून महाराष्ट्र घडवण्यासाठी हे लोक वेळ देऊ शकतील का हा प्रश्न आहे. याचा अर्थ त्याबद्दल विचार होतच नसेल असं नाही. पण इंटरनेटवरच्या चर्चा आणि परदेशांतली साहित्य संमेलनं हा काही मराठीची काळजी घेण्याचा निर्णायक पुरावा नव्हे. त्यामुळे बृहन्महाराष्ट्रातल्या मंडळींनी भाषेचे प्रश्न म्हणजे साहित्याचे प्रश्न या मर्यादित वर्तुळातून बाहेर पडल्यावरच मराठीसाठी काहीतरी करता येईल.

मराठीच्या प्रश्नांचा अनुशेष इतका मोठा आहे की नवख्या माणसाला कुठून सुरुवात करावी हेच कळत नाही. त्यातही गमतीचा भाग म्हणजे मराठीसाठी जाहीरपणे बोलणारे दोन पक्ष राज्यात आहेत आणि उरलेलेसुद्धा जाहीरपणे मराठीविरोधी बोलत नाहीत. प्रश्न कुठलेही असोत, मराठी भाषा आणि मराठी माणसाला काहीच कमी पडू देणार नाही अस राज्यकर्ते सतत म्हणत असतात. सर्व प्रकारच्या साहित्यसंमेलनांमध्ये मराठीबद्दलची काळजी आणि उपाययोजना असतात. त्यामुळे प्रत्यक्षात कामाशी संपर्क न आलेल्या माणसाला मराठीचं काही भीषण वाईट चाललंय यावर विश्वासच बसणार नाही. पण ते चाललंय हे मी तुम्हाला माझ्या आणि इतरांच्या अनुभवांवरून खात्रीपूर्वक सांगतो.

**हे अनुभव नेमके काय आहेत?**

दुकानांवरच्या पाट्या मराठीत असाव्यात यासाठी राजकीय पक्षांना राज्याच्या स्थापनेनंतर ४९ वर्षांनी आंदोलनं करावी लागतात. मराठीतल्या नावांचा आकार इंग्रजीतल्या नावांच्या तुलनेत दुर्लक्षणीय राहील असा प्रयत्न अमराठी दुकानदार करतात. ‘दुकाने आणि आस्थापने कायद्या’ची काटेकोर अंमलबजावणी झाली तरी याला चाप बसू शकतो, पण चिरीमिरी घेऊन खोटे अहवाल देणाऱ्या बहुतांश मराठी कर्मचाऱ्यांमुळेच ते घडू शकलेलं नाही. दुकानांच्या पाट्या मराठीत येणं हे प्रतीकात्मकच आहे. पण सर्व चळवळींना एका विशिष्ट टप्प्यापर्यंत तरी प्रतीकं लागतातच. मराठीतून पाट्या लावणं म्हणजे धंदा कमी करणं असे युक्तिवाद करणारे आणि विशेषतः इंग्रजी माध्यमांमधून त्यांचं समर्थन करणारे भाकड विचारवंत आजही राज्यकर्त्यांना दखलपात्र वाटतात.

महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात संगणकतज्ज्ञ निर्माण झाले म्हणून आपण आपली पाठ थोपटून घेतो. तरीही संगणक व्यवहारात मराठी अपवादानं दिसते. युनिकोडसारखी देशी भाषांमधला संगणकीय व्यवहार प्रमाणित करण्यास साहाय्यभूत ठरणारी व्यवस्था आपल्यापर्यंत पोचायला दहा वर्षं लागतात. केंद्र सरकारनं युनिकोड आणि इन्स्क्रिप्टचा कळफलक सर्व राज्यशासनांसाठी अनिवार्य केला असला तरी महाराष्ट्र राज्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागाला त्याचा पत्ताच नसतो! तिथल्या अमराठी सचिव आणि संचालकांकडे, शासनाचं कामकाज युनिकोड वापरून मराठीतून व्हावं असा आदेश देणारं परिपत्रक काढायला वेळ नसतो. चार महिने प्रयत्न केल्यावर चार ओळींचं परिपत्रक निघतं. पुढे कारवाई

शून्य. तरीही शासनाचं मुखपत्र असलेल्या 'लोकराज्य'मध्ये मुख्यमंत्री अशोक चव्हाणांचा संगणकाकडे कौतुकभरल्या नजरेनं पाहणारा फोटो येतो आणि महाराष्ट्रात आय. टी. कल्चर रुजू लागलंय अशी हमीही मिळते. चळवळ करणाऱ्यांचा संताप होईल अशीच ही स्थिती आहे. तरीही शासन नावाच्या अजस्र यंत्रणेला हलवण्यासाठी पुन्हा मंत्रालयात खेटे मारावेच लागतात. जणू काही हे आम्हा कार्यकर्त्यांचंच काम आहे आणि शासन आमच्या पत्रांना पोच देऊन किंवा त्यावर कारवाई करून आमच्यावर उपकार करतंय.

शिक्षणाचं माध्यम म्हणून मराठीचा अजिबात विकास होऊ द्यायचा नाही, किंबहुना, चुकून जर मराठी शाळांचं बरं चाललं तर त्याला टाळं लावायचं असा धोरणात्मक निर्णय घेतल्यासारखी शासनाची पावलं पडताहेत. नगरसेवकांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत आणि तलाठ्यापासून सचिवांपर्यंत सत्तेतल्या/विरोधातल्या सर्वांनीच मराठीत शिकून आपलं काही भलं होणार नाही हे आपल्या वागणुकीतून सांगायला सुरुवात केलीय. हजारो विनाअनुदानित– त्यातही इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे प्रस्ताव शासनदरबारी मंजूर होताहेत. महापालिका, जिल्हापरिषदांच्या मराठी शाळा चालवणं ही कुणाचीच जबाबदारी राहिलेली नाही. आयसीएसई, सीबीएसई, आयबी यांसारख्या बोर्डांच्या महागड्या शाळांमध्ये जाणाऱ्या मूठभर उच्चभ्रूंच्या सोयीसाठी सरकार धोरणं बदलतं. अमराठी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी शिकवण्याचा 'जुलूम' होऊ नये म्हणून अमराठी सचिव नाना युक्त्या योजतात. मराठीसाठी बोलणाऱ्यांची मुलंही कॉन्व्हेंटमध्येच जातात. अशा वातावरणात मराठी शाळा टिकल्याशिवाय ती ज्ञानभाषा होणार नाही, मराठीचे इतर सगळे लढे अयशस्वी होतील हे कुणाला सांगणार? मानसशास्त्रज्ञ आणि शिक्षणशास्त्रज्ञांनी मातृभाषेतून शिक्षण घेण्याचं सांगितलेलं महत्त्व साहित्यिक, विचारवंतांना कळत नाही, तिथे सर्वसामान्य माणसाला काय समजावून सांगणार? बहुजनांच्या नावानं चालणाऱ्या राज्यात बहुजनांच्या भाषेची ही अवस्था आहे.

मराठीचं बरं व्हावं म्हणून सरकारनं अगणित यंत्रणा निर्माण केल्या आहेत. राज्य मराठी विकास संस्था, भाषा

---

# 'मराठी अभ्यास केंद्रा'ची भूमिका

मराठी अभ्यास केंद्र ही मराठी भाषा, समाज आणि संस्कृतीच्या प्रश्नांवर विधायक पद्धतीनं काम करणारी संघटना आहे.

भाषेचा विकास ही समाज आणि शासन यांची सामूहिक जबाबदारी आहे असं अभ्यास केंद्राला वाटतं. भाषावार प्रांतरचनेनंतर मराठी भाषकांचे राज्य निर्माण होऊन जवळपास पन्नास वर्षं होत आली तरीही मराठी भाषेच्या मूलभूत प्रश्नाबाबतही शासनपातळीवर असंवेदनशीलता जाणवते. जागतिकीकरणामुळे तर देशी भाषा डावलण्याला प्रतिष्ठा मिळू लागली आहे. त्याची कारणं शोधणं आणि कृतिलक्ष्यी कार्यक्रम आखणं हे मराठी अभ्यास केंद्राचं उद्दिष्ट आहे.

भाषिक प्रश्नांचा अभ्यास करून, त्यावर समाजातील संबंधित गटांना एकत्र आणून या प्रश्नांवर उपाय शोधण्याची सकारात्मक भूमिका मराठी अभ्यास केंद्राची आहे. वैचारिक आणि विवेकी भूमिका, विविध विषयांचा सखोल अभ्यास करून मांडलेल्या उपाययोजना आणि त्या उपाययोजनांवर आधारित कृतिलक्ष्यी चळवळ ही मराठी अभ्यास केंद्राच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्यं आहेत.

भाषा, समाज आणि संस्कृतीच्या प्रश्नांमागे जनमताचा रेटा निर्माण करणारं 'मराठीकारण' हे मराठी अभ्यास केंद्राचं अंतिम उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रातल्या सर्व राजकीय पक्षांना मराठीच्या प्रश्नांवर भूमिका घ्यायला भाग पाडणं, केंद्र-राज्य शासनांच्या मराठीविरोधी धोरणांत संसदीय, बिगरसंसदीय मार्गांनी बदल घडवून आणण्यासाठी जनमत उभारणं हा अभ्यासाचा चळवळीचा पाया म्हणून सर्वदूर वापर करणं आम्हाला आवश्यक वाटतं. असं करताना कुठल्याही परभाषेचा विरोध न करता मराठी भाषा, समाज आणि संस्कृतीचं सक्षमीकरण करण्यावर अभ्यास केंद्राचा भर राहील. सर्वच भाषिक संस्कृतींमध्ये आज दिसून येणारी भाषिक अनास्था हा चिंतेचा विषय आहे. या व्यापक भूमिकेतून मराठी अभ्यास केंद्र भाषिक प्रश्नांकडे पाहते.

अभ्यास केंद्राची रचना कृतिगटांवर आधारित आहे. प्रत्येक कृतिगट त्या त्या विषयावरच्या प्रश्नांचा सखोल अभ्यास करून त्यांवरील शक्य असलेल्या उपायांची मांडणी समाजातील संबंधित गटांपुढे करत असतो. समाजात विविध स्तरांवर चर्चा घडवून एक व्यापक कृतिआराखडा तयार करण्यावर भर असतो. त्या कृतिआराखड्याप्रमाणे प्रश्न विशिष्ट कालमर्यादेत निर्णायकपणे सोडवण्यासाठी विविध सामाजिक, राजकीय, प्रशासकीय स्तरांवर पाठपुरावा करणं हे एक महत्त्वाचं कार्य असतं.

संचालनालय, विश्वकोश निर्मिती मंडळ ही  त्यांपैकी काही आहेत. रा. म. वि. संस्थेची नुसती उद्दिष्टं वाचली तरी मराठीचा सुवर्णकाळ आता आलाच असं वाटायला लागतं. पण जरा खरवडून पाहिलं की या महान संस्थेचं प्रकाशन संस्थेत झालेलं रूपांतर दिसायला लागतं. इतर राज्यांमध्ये स्वतंत्र भाषिक विद्यापीठं आहेत, राज्यभाषेच्या जतन, संवर्धनासाठी स्वतंत्र खाती आहेत. आपल्याकडे मात्र रा. म. वि. संस्थेचं घर उन्हात बांधलंय. चारदोन कोटी रुपयांवर त्यांची बोळवण होते. भाषानियोजन, भाषाविकासाचं काम या संस्थेकडून व्हायला हवं असेल तर तिचं रूप पूर्ण पालटलं पाहिजे. पण सुवर्णमहोत्सव साजरा करणाऱ्या राज्यकर्त्यांना हा विचार करायला फुरसत नाही.

विश्वकोश हा एक मोठा विनोदच झाला आहे. एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिकाच्या दरवर्षी नव्या आवृत्त्या निघत असताना, मराठी विश्वकोशाचे आजवर १८ खंड प्रसिद्ध करता करता मंडळाला घाम फुटलाय. गावोगाव विश्वकोशाच्या स्पर्धा घेऊन मुलांच्या आत्मविश्वासाचा साक्षात्कार झालेल्या अध्यक्षा स्वतःचीच पाठ थोपटून घेत आहेत. वाईच्या विश्वकोश निर्मिती मंडळाच्या कार्यालयात गेलात की अद्ययावत तंत्रज्ञानाच्या अभावाचं दर्शन तुम्हाला घडेल. विश्वकोशाच्या आधीच्या खंडांचं अद्ययावतीकरण करून ते लोकांना उपलब्ध करून देणं हा युगायुगांचा कार्यक्रम होऊ शकेल! हे सगळे कोश शासनाच्या संकेतस्थळावर तरी असायला नकोत का? पण त्यासाठी शासनाचं संकेतस्थळ मराठीतही हवं. पण सगळ्या जगाशी जोडायचं तर मराठीकडे लक्ष देऊन कसं चालेल? मग लोकलज्जेस्तव किमान माहिती कोंबलेलं एक संकेतस्थळ बनवायचं, लोकांनी ओरड केली की ते दुरुस्त करतो म्हणायचं. अशा ढिसाळ व्यवहाराला सरावलेल्या शासनाकडून मराठीसाठी परिपूर्ण रचनात्मक काम करण्याची अपेक्षा बाळगणं हा वेडेपणा ठरतो.

भाषा संचालनालयाची अवस्था  हे सगळं छान वाटावं अशी आहे. शासनव्यवहारात मराठीचा वापर वाढावा आणि विविध विषयांतल्या परिभाषेची निर्मिती व्हावी यासाठी निर्माण झालेल्या भाषा संचालनालयाचं आता 'भाषांतरालय' झालंय.

---

मराठी अभ्यास केंद्रानं एका वर्षाच्या कालावधीत यशस्वीपणे राबवलेले कार्यक्रम –

१. युनिकोड वापरून संगणकावर मराठीतून व्यवहार व्हावा यासाठी महाराष्ट्र शासन, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याशी संपर्क साधून अंमलबजावणीसाठी पाठपुरावा.

२. मराठी शाळांच्या सक्षमीकरणासाठी कृतिआराखडा तयार करून शासनाकडे पाठपुरावा.

३. पदवी आणि पदव्युत्तर पातळीवरच्या मराठीच्या शिक्षणाचं विस्तारीकरण व्हावं यासाठी महाराष्ट्रातल्या विविध विद्यापीठांकडे प्रस्ताव सादर. काही विद्यापीठांमध्ये अंमलबजावणीला सुरुवात.

४. जिल्हा व तालुका पातळीवरच्या न्यायालयांचं मराठीकरण यशस्वी व्हावं यासाठी संगणकीकरण व इतर आघाड्यांवर पाठपुरावा.

५. घटनेच्या कलम ३४८(२) प्रमाणे मराठी ही मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा व्हावी यासाठी शासन व मुंबई उच्च न्यायालयाकडे पत्रव्यवहार.

६. माहितीच्या अधिकाराचा वापर करून केंद्र शासनाची कार्यालयं, बँका व इतर संस्थांमध्ये मराठीच्या वापरासंबंधी पत्रव्यवहार. मिळालेल्या माहितीच्या आधारे संबंधित यंत्रणांना मराठीचा वापर करण्यास भाग पाडणं.

७. विद्यापीठं व संलग्न महाविद्यालयांमध्ये मराठी भाषा आणि वाङ्मय मंडळं अनिवार्य होऊन, त्यांना स्थायी निधी उपलब्ध व्हावा यासाठी यशस्वी पाठपुरावा.

८. विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या मराठीकरणासाठी विद्यापीठं व शासनाकडे पाठपुरावा.

९. मराठीसाठी इन्स्क्रिप्टचा कळफलक सर्वमान्य व्हावा, एम.एस.सी. आय.टी.च्या अभ्यासक्रमात युनिकोडचा अनिवार्य–पणे समावेश व्हावा यासाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकडे पाठपुरावा.

**संपर्क :**

अध्यक्ष : **प्रा. दीपक पवार**
९८२०४३७६६५ | santhadeep@gmail.com
उपाध्यक्ष : **डॉ. प्रकाश परब**
९८९२८१६२४० | parabprakash8@gmail.com
कोषाध्यक्ष : **शरद गोखले**
९८६९४४४७५७ | sharadgokhale@hotmail.com
चिटणीस : **प्रा. राममोहन खानापूरकर**
९८२००४००६६ | ram.research@gmail.com

'मराठी अभ्यास केंद्रा'ला साहाय्य करण्यासाठी धनादेश **'मराठी अभ्यास केंद्र'** या नावाने काढावा.

महाराष्ट्राच्या शासनव्यवहाराची भाषा मराठी आहे असा तुमचा समज असेल तर तो इथे येऊन दूर होईल. अर्थसंकल्प, सर्व विधेयकं आधी इंग्रजीत येतात, मग भाषासंचालनालय त्यांचा अनुवाद करतं. नरीमन पॉइंटच्या नवीन प्रशासकीय भवनातून शासनाला नकोसा झालेला हा विभाग पार अडगळीत (वांद्र्याला) फेकला गेलाय. अर्थसंकल्पाची गडबड असेल तेव्हा कंत्राटी कामगारांना बोलावल्यासारखं भाषा संचालनालयातले लोक मंत्रालयात बोलावले जातात. वर्षानुवर्षं इथल्या अनुवादकांच्या जागा भरल्या जात नाहीत. सात वर्षांहून अधिक काळ संचालक नाही. जवळपास तितकाच काळ भाषा सल्लागार मंडळ नाही. कुठेतरी जोडायचं म्हणून संचालनालय सामान्य प्रशासन विभागाला जोडलंय. (तसं ते कुक्कुटपालन किंवा सामाजिक वनीकरण विभागाला जोडलं असतं तरी चाललं असतं.) सामान्य प्रशासन विभागाचे अधिकारी सहा-सहा महिने प्रभारी संचालक म्हणून काम पाहतात. तेवढीच त्यांना शासनाची गाडी उडवायला मिळते. आपल्या कामाच्या पाच टक्के वेळही त्यांना भाषा संचालनालयाला देता येत नाही. परिभाषा निर्मितीचं काम ठप्प झालंय. शासनपुरस्कृत गावकुसाबाहेरचे लोक कसे असतात हे पाहायचं असेल तर भाषा संचालनालयाला जरूर भेट द्यायला हवी. 'दारिद्र्य पर्यटना'चे कार्यक्रम धारावीत लोक करतात, तेच मॉडेल भाषा संचालनालयात वापरून सरकारला महसूलही मिळवता येईल!

गेले वर्षभर मुंबई विद्यापीठाच्या बॅचलर ऑफ मास मीडिया या अभ्यासक्रमाचं मराठीकरण करण्यासाठी आम्ही झगडतोय. लोकांना एखाद्या विषयाचं महत्त्व पटवून देणं, संबंधित यंत्रणांना उत्तरदायी बनवणं, त्यासाठी माध्यमसंपर्काचा योग्य वापर करणं, मराठीला छुपा, उघड विरोध करणाऱ्यांचे युक्तिवाद उधळून लावण्यासाठी अभ्यास आणि आखणी करणं- हे सर्व करण्यात खूप ऊर्जा जाते. विद्यापीठावर दगडफेक करूनही या प्रश्नाकडे लक्ष वेधणं शक्य होतं, पण त्यामुळे सुरुवातीला घाबरलेले विरोधक संघटित होऊन मराठीकरणाचे प्रयत्न हाणून पाडतात असा अनुभव आहे. त्यामुळे प्रत्येक टप्प्याला सजग राहावं लागतं. ज्यांना थेट विरोध शक्य होत नाही ते नियम, उपनियमांचा कोलदांडा घालून मराठीकरणाचं काम पुढे ढकलू पाहतात. अशांचा शोध घेऊन त्यांची नाकेबंदी करणं हे चिवटपणानं करायचं काम आहे. एकेका अभ्यासक्रमासाठी जर इतकं झटावं लागत असेल तर सर्व महत्त्वाच्या अभ्यासक्रमांमध्ये मराठीचा शिरकाव व्हावा यासाठी युगं लोटतील. विद्यापीठांनी ठरवलं तर त्यांना त्यांचे खजिने यासाठी वापरता येतील, पण एखाद्या इमारतीला मराठी लेखक, कवीचं नाव देऊन भागत असेल तर मराठीसाठी भरीव काही करण्याचे कष्ट आडनावाने मराठी राहिलेले उच्चभ्रू शासक, प्रशासक कशाला घेतील?

बऱ्याच वर्षांच्या लढ्यानंतर मुंबई उच्च न्यायालयानं डिसेंबर २००५ मध्ये जिल्हा आणि तालुका पातळीवरच्या न्यायलयांचं कामकाज मराठीतून व्हावं असा आदेश दिला. मात्र न्यायालयांमध्ये वापरलं जाणारं केस इन्फर्मेशन सिस्टिम हे सॉफ्टवेअर अजूनही मराठीत नाही. रग्गड पैसे घेऊन ही सॉफ्टवेअर बनवणाऱ्या नॅशनल इन्फर्मेटिक्स सेंटरला त्याची गरज वाटली नाही आणि न्यायालयांनाही. गेले काही महिने आम्ही त्यासाठी फिरतोय. घटनेच्या कलम ३४८(२) प्रमाणे तमिळ ही चेन्नई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा व्हावी यासाठी लागणाऱ्या सर्व पायाभूत सुविधा पुरवण्याची तामिळनाडू शासनानं तयारी दर्शवली. त्यासाठी ३०० कोटी रुपयांची तरतूद केली. महाराष्ट्रात मात्र जिल्हा आणि तालुका पातळीवरच्या न्यायालयांमध्ये लघुलेखक, टंकलेखक पुरवण्याची गरज शासनाला वाटत नाही. शासन आणि उच्च न्यायालय तांत्रिक करामती करत परस्परांकडे गोष्टी टोलवत राहतात. साधा, 'बॉम्बे हायकोर्टा'चं 'मुंबई उच्च न्यायालय' असा बदल करण्याची धमक सरकारमध्ये नाही. उद्या एखाद्या गटानं चिडून बॉम्बे हायकोर्ट या पाटीला डांबर पुसलं तर न्यायव्यवस्थेचे रक्षक चिडतील. बहुसंख्य मराठी न्यायाधीश आणि मराठी वकील जिथे काम करतात त्या मुंबई उच्च न्यायालयात मराठीचं एवढं वावडं का असा प्रश्न विचारला की न्यायालयाची बेअदबी होते का? माहीत नाही. पण न्यायालयांना तरी लोकभावनेचा आदर स्वतःहून करण्याची बुद्धी व्हावी असं वाटतं.

वर नोंदलेली निरीक्षणं गेल्या काही वर्षांच्या आमच्या कामातून आलेली आहेत. मी आणि माझे सहकारी मराठी अभ्यास केंद्र नावाची मराठी भाषा, समाज आणि संस्कृतीसाठी काम करणारी संस्था चालवतो. मराठीकारण (मराठीकरण नव्हे) ही आमची भूमिका आहे. आजवर भाषेसाठी झालेल्या

चळवळी नकारात्मक, प्रतिक्रियात्मक, प्रतीकात्मक आणि तात्कालिक परिणाम करणाऱ्या होत्या. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यानंतर मराठी राज्य निर्माण करण्याचं स्वप्न अपूर्ण राहिलं. शिवसेनेसारखा मराठीच्या नावावर ४० वर्षं जगणारा पक्ष असताना मराठीचे ढीगभर प्रश्न अनुत्तरित राहतात एवढी एकच गोष्ट आजवरच्या मराठीकेंद्री राजकारणाची मर्यादा स्पष्ट करायला पुरेशी आहे. आज मनसे शिवसेनेची जागा घेण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र जागतिकीकरण, शहरीकरणानं देश, राज्यांच्या सीमा पुसल्या जाण्याच्या काळात भाषिक चळवळीचं रूप बदलतंय याची जाणीव हळूहळू का होईना समाजात, राजकीय पक्षांमध्ये येऊ लागलीय. त्यामुळे न्यूनगंडावर आधारित नसलेलं, रचनात्मक मराठीकारण करण्याचा अवकाश निर्माण झाला आहे. हीच मराठी अभ्यास केंद्राच्या कामाची दिशा आहे.

भाषेचे प्रश्न हे मूलतः राजकीय असल्यानं राजकीय प्रक्रियेत सहभागी झाल्याशिवाय ते सुटू शकणार नाहीत. उपलब्ध राजकीय पर्यायांचा मराठीचा अजेंडा बदलून व्यापक करणं किंवा आपला समग्र कार्यक्रम लोकांपुढे ठेवून नवा पर्याय निर्माण करणं असे दोन पर्याय सध्या मराठीच्या चळवळी करणाऱ्या लोकांपुढे आहेत. यापैकी मराठी आणि हिंदुत्वाची सांगड घालणारा पर्याय दोन्हीतल्या वैचारिक विसंगतीमुळे कुचकामी ठरल्याचं आपण अनुभवतो आहोत. केवळ परप्रांतीयांना विरोध या निकषावर मराठीची लढाई फार यशस्वी होऊ शकणार नाही. त्यामुळे मराठी भाषेचा आणि मराठी माणसांचा शक्य तिथवर सनदशीर मार्गानं विकास ही भूमिका घ्यावी लागेल. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात सहभागी असलेल्या पुरोगाम्यांना नंतरही हे करणं शक्य होतं. पण संघटना आणि अस्मिता दोन्हीचं वावडं असलेल्या पुरोगाम्यांनी हातची संधी घालवली. आज पुन्हा भाषा आणि विकास या दोन ध्रुवांना जोडण्याची संधी चालून आली आहे. ती कशी वापरली जाते यावर मराठी भाषा, समाज आणि संस्कृतीचं भवितव्य अवलंबून आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर बृहन्महाराष्ट्रातले मराठी लोक म्हणून आपण काय करू शकाल?

१. आपण ज्या क्षेत्रात काम करताय, त्यातलं नवं ज्ञान मराठीत आणण्यासाठी, ते इंटरनेटद्वारे सर्वांपर्यंत पोचवण्यासाठी कसून प्रयत्न.

२. भाषा, भाषिक राज्यं, संघराज्यं, स्थलांतर या आणि अशा विषयांवरचं नवनवीन लेखन जगभरात येत असतं. त्याचे संदर्भ महाराष्ट्रातल्या भाषिक चळवळींतल्या कार्यकर्त्यांना पुरवणं किंवा स्वतः त्यावर लिहिणं.

३. आपण ज्या प्रांतात आहात तिथल्या विद्यापीठांमध्ये मराठीच्या भाषावैज्ञानिक, समाजभाषावैज्ञानिक अभ्यासाचं अध्यासन निर्माण व्हावं यासाठी निधी उपलब्ध करून देणं. हेच महाराष्ट्रातलं एखादं विद्यापीठ निवडूनही करता येईल.

४. आपण जर वर्षांतले काही महिने महाराष्ट्रात येऊन राहत असाल, तर त्या काळात इथल्या भाषिक चळवळींशी सक्रियपणे जोडून घेणं. (मराठीसाठी माहितीचा अधिकार वापरण्याचं काम आमचा एक कृतिगट करतो. हे काम इतर सगळी व्यवधानं सांभाळून करता येण्यासारखं आहे.)

५. मराठीसाठी काही करायचं म्हणून तुम्ही जर महाराष्ट्रात परत येत असाल तर तुमचं स्वागत आहे. अनेकांना आयुष्यभर पुरून उरतील इतकी कामं तुमची वाट पाहताहेत. मराठी शाळा, संगणकावर मराठी, अभ्यासक्रमांचं मराठीकरण, भाषानियोजन व भाषाविकासासाठी पायाभूत काम...कामांची यादी वाढवत नेता येईल. यातल्या कशासाठी वेळ द्यायचा हा ज्याचा त्याचा निर्णय असेल. मराठीच्या कामाला खूप पैसे लागणार आहेत. पण त्याहीपेक्षा स्वतःचा वेळ आणि ऊर्जा सातत्यानं पणाला लावणारे कार्यकर्ते हवे आहेत. सभागृहांतल्या किंवा इंटरनेटवरच्या चर्चांनी हा प्रश्न सुटणार नाही. सतत अभ्यास करून, वेळ पडेल तिथे रस्त्यावर उतरून हा संघर्ष करावा लागणार आहे. अशी जिगर दाखवणाऱ्यांच्या मागे समाज नेहमीच उभा राहतो. त्यासाठी आघाडीवरून लढणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी महाराष्ट्रात उभी राहते आहे. तुम्ही त्यात भर घालू शकाल.

हे सगळं करत असताना एकदोन पथ्यं पाळली पाहिजेत. अमेरिका किंवा इतर विकसित देशांत शासन जनतेला जास्त उत्तरदायी असतं. नियम, कायद्यांची अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे करण्याकडे कल असतो. त्यामुळे परदेशस्थ मराठी माणसांना कायद्यात तरतूद असूनही शासन मराठीसंबंधी धोरणांची अंमलबजावणी करत नाही याचं आश्चर्य वाटतं. आम्हाला ते वाटत नाही, कारण सरकारला तसं वागण्यासाठी

भाग पाडणारा समर्थ दबाव गट तयार झालेला नाही आणि उपलब्ध दबावगटांची अज्ञान आणि आळसामुळे त्याचा पाठपुरावा करण्याची क्षमता क्षीण झालेली आहे, हे आम्हाला अनुभवानं दिसत असतं. त्यामुळे इथे काम करायचं तर सुरुवातीला तरी, सरकार आणि इतर यंत्रणा मराठीचं काम करून आपल्यावर उपकार करताहेत हा त्यांचा तोरा सहन करावा लागतो. सौजन्य आणि सहनशीलतेची पराकाष्ठा करावी लागते. त्यानं तुम्ही निराश झालात की संपलंच. अशा वैफल्यग्रस्त होऊन धारातीर्थी पडलेल्या कार्यकर्त्यांकडून आपण शिकायचं ते इतकंच की लढाई अजून संपलेली नाही, त्यामुळे यशस्वी व्हायचं असेल तर आपल्याला निराश होण्याचा अधिकार नाही. दुसरं पथ्य म्हणजे राजकारण हे भाषिक लढ्यांच्या केंद्रस्थानी होतं आणि आहे हे मान्य करणं. आधि संस्कृतिकारण, मग राजकारण ही मध्यमवर्गीय मनाला सुखावणारी गोष्ट आहे. प्रत्यक्षात तसं होत नाही. दोन्ही गोष्टी एकाच वेळी कराव्या लागतात. त्यामुळे भाषेचं काम करताना एका मर्यादेपलीकडे सोवळेपणा ठेवून चालत नाही. डावे-उजवे सगळ्यांशीच बोलावं लागतं. ते भान नसेल तर कामांची आधी बेटं आणि मग डबकी होतात. त्यामुळे मराठीचे प्रश्न फक्त नागरी समाजाच्या, बिगरराजकीय पातळीवर सुटतील असं कुणाला वाटत असेल तर त्यांनी या गैरसमजुतीतून  आधी बाहेर पडलं पाहिजे.

फक्त लेख लिहून समाज बदलत नाही. कामासाठी कामच करावं लागतं. त्या कामाचं वैचारिक अधिष्ठान व्यापक करावं लागतं. तसं काम करण्याचा प्रयत्न आम्ही करतोय. जितके लोक सोबत येतील तितके हवेच आहेत. जग जवळ आलंय असं आपण म्हणतो, मराठीचं जग किती जवळ आलंय हे येणारा काळच ठरवील.

**– दीपक पवार**
अध्यक्ष, मराठी अभ्यास केंद्र
भ्रमणध्वनी : ९८२० ४३७ ६६५
deepak@marathivikas.org

*With Best Compliments From*

**FAIR ENGINEERING CO.**

13/14, Tirupati Ind. Estate No. 3,
Ground Floor, Navghar, Vasai Road (E.), 401 210
Dist. Thane, Maharashtra - India

Ph.: 91250 - 239 27 64 / Telefax : 239 26 62
E-mail : fair@vsnl.com

# मूलभूत शैक्षणिक प्रश्न अनुत्तरित

❖ अभिजित हेगशेट्ये

दहावी-बारावीचा निकाल जाहीर झाला की पहिली चर्चा सुरू होते ती लाखो विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या प्रवेशाची आणि त्यापाठोपाठ शहरी भागापासून ग्रामीण भागातील शिक्षण, त्याच्या सुविधा, त्यापासून वंचित होणारा विद्यार्थी आणि त्या अनुषंगाने उपस्थित होणाऱ्या प्रश्नांची. मात्र या चर्चा पावसाळी छत्रीप्रमाणे काही महिन्यांच्याच. त्यांच्या मूलभूत बदलाचा प्रयत्न होत नाही. जे जे नवे धोरण येते ते ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला उच्च शिक्षणापासून वंचित करणारे आणि शहरी भागातील सधन विद्यार्थ्याला उच्च शिक्षणाच्या नवनव्या संधी उपलब्ध करून देणारे. महिलांच्या शिक्षणाचा पाया रचणाऱ्या सावित्रीबाई फुले, शाहू-फुले-आंबेडकरांची परंपरा सांगणाऱ्या राज्यात आजही तळागाळापर्यंत उच्च शिक्षणाची संधी नाकारली जात आहे. शिक्षण पद्धतीच्या एकूणच ढाच्याचा पुनर्विचार नव्याने करणे ही खरी काळाची गरज असून, त्यासाठी प्राधान्य, अनुदानाचे धोरण आणि त्याबाबत आर्थिक तरतूद या महत्त्वाच्या बाबी आहेत.

गेल्या वर्षी पर्सेंटाईलचा प्रश्न उपस्थित करत अकरावीच्या प्रवेशाचा घोळ घालण्यात आला. अखेर, पालक-विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरावे लागले. आता शिक्षणमंत्री विखे-पाटील यांनी नव्वद टक्के कोटा महाराष्ट्र बोर्डाच्या मुलांसाठी राखीव ठेवला आहे. यातून हा प्रवेशाचा प्रश्न सुटणार आहे का? पुन्हा महाराष्ट्र बोर्ड आणि दिल्ली बोर्ड, पर्यायाने उच्च उत्पन्न गटातील विद्यार्थी आणि अल्प-मध्यम उत्पन्न गटातील मराठी माध्यमाचे विद्यार्थी यांच्यात हा प्रवेशाचा नवा वाद पेटणार आहे आणि पुन्हा विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी फरफट होणार आहे.

आज ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत शिक्षणातील विषमता प्राथमिकतेपासूनच वेगाने वाढत आहे. शासनाच्या जिल्हापरिषदेपासून महापालिकेपर्यंतच्या प्राथमिक शाळांतून आवश्यक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नाहीत. शिक्षकांना पाचवा-सहावा वेतन आयोग मिळतो. त्यांच्या पगाराचा स्तर प्रचंड वाढला, मात्र त्यांच्या शिक्षणाचा स्तर घटत गेला आहे. पगाराव्यतिरिक्त शाळेतून विद्यार्थ्यांना अन्य सुविधा द्याव्या लागतात. पुस्तकी शिक्षणाबरोबर अन्य अनेक उपक्रम शाळेतून राबवले जाणे आवश्यक आहे याचे भान शिक्षकांना नाही व शासनामार्फतही त्याबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात नाहीत. परिणामी, अनेक शाळांतून शिक्षक आहेत पण विद्यार्थी नाहीत अशी परिस्थिती आहे आणि खाजगी शाळांकडे प्रवेश घेण्याचा कल वाढत आहे. एका बाजूला ग्रामीण भागातून, दुर्गम डोंगराळ भागात एकशिक्षकी शाळा आहेत. येथे विद्यार्थ्यांच्या तिसरी ते पाचवी या वर्गांना शिकवण्यासाठी एक शिक्षक असतो. शाळा डोंगरी भागात असल्याने तो शिक्षकही आठवड्यातून एक-दोन दिवसच येतो. मुले काय शिकतात याच्याशी त्याचे देणे-घेणे नाही. त्यावर अंकुश ठेवायला शासकीय यंत्रणाही तेथे पोचू शकत नाही. त्याचवेळी, तालुक्याच्या ठिकाणांपासून मोठ्या शहरापर्यंत नगरपालिका आणि महापालिकांच्या शाळांतून शैक्षणिक सुविधांचा अभाव, शिक्षकांची एकूण बेफिकिरी आणि इंग्रजी माध्यमाचे वाढते आकर्षण आणि गरज याचा परिणाम खाजगी शाळांतून मोठ्या-मोठ्या फी भरून विद्यार्थी पाठवण्याकडे पालकांचा कल दिसू लागला आहे. याचा परिणाम येथील शासकीय शाळा विद्यार्थ्यांविना ओस पडू लागल्या आहेत आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांतून प्रवेशासाठी पहाटेपासून रांगा असे

परस्पर विरोधाभासाचे चित्र दिसत आहे. शिक्षणाच्या प्राथमिक पातळीवरच घसरणारा मराठीचा टक्का वाचवण्याचा प्रयत्न कोणी करत असल्याचे दिसत नाही. याउलट, वास्तवात चित्र असे आहे, सामाजिक कार्यकर्ता, शिक्षक, नेता, मराठीच्या प्रश्नावर आंदोलन करणारे राजकीय नेते-राज्यकर्ते आपल्या मुलाला प्रवेश घेताना इंग्रजी माध्यम आणि दिल्ली बोर्डाचाच आग्रह करताना दिसतात. याबाबत त्यांचे उत्तर असते, आपल्या मुलाचे नुकसान करण्याचा नैतिक अधिकार आम्हाला नाही! मग हाच निकष सर्वसामान्यापर्यंत कधी पोचणार? येथेच प्राथमिक शिक्षणातील टोकाच्या विषमतेची बिजे पेरली जात आहेत.

नव्या जगाच्या चेहऱ्याचे प्रतिबिंब शहरातील अद्ययावत महागड्या शाळांतून उमटू लागले आहे. एका बाजूला वर्षाला एक लाख रुपये फी भरून प्राथमिक शिक्षण घेणारा विद्यार्थी आणि त्याच वेळी एकशिक्षकी शाळेत शिकलेला विद्यार्थी, या दोघांनी उच्च शिक्षणाच्या स्पर्धेत समान निकषावर उतरायचे, हा कोणता न्याय? त्यासाठी प्रथम प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारणे गरजेचे आहे. प्राथमिक शिक्षकाचा शिक्षकेतर कामांचा बोजा वाढवल्याचा सततचा आक्षेप आहे. ह्या शिक्षकेतर कामांपेक्षा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व-विकासासाठी आवश्यक विविध उपक्रमांद्वारे नव्या शिक्षण पद्धतीची जोड देऊन एकूणच प्राथमिक शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल गरजेचा आहे. जो मराठी टक्का टिकवेलच आणि शिक्षणातील प्रचंड वाढलेली विषमताही कमी करेल.

**नापासांचा प्रश्न**

संपूर्ण शैक्षणिक यंत्रणेत प्राथमिक स्तरापासून नापासांचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. सलग चांगल्या मार्कांनी पास होणारा विद्यार्थी हा गुणवान आहे म्हणून त्याचे कौतुक होणे आवश्यक आहे. मात्र त्याच वेळी नापास होणाऱ्या विद्यार्थ्यां-बाबत, तो जीवनात काहीच करू शकत नाही ही जी भावना आणि वातावरण शालेय, महाविद्यालयीन पातळीवर आहे ते विद्यार्थ्याला नाउमेद करणारे आहे. अशा नापास विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देणारे सुलभ अभ्यासक्रम आणि गणिताला पर्याय, यांचा विचार अभ्यासक्रमात करणे गरजेचे आहे. आज खाजगी शाळांतून स्पर्धा प्रचंड वाढली आहे. आपला शंभर टक्के निकाल राखण्यासाठी दहावीतील विद्यार्थ्याला परीक्षेला बसण्याची संधी नाकारण्याचे व १७ क्रमांकाचा फॉर्म भरून बाहेरून विद्यार्थी बसवण्याचे प्रमाण वाढत आहे.

**उच्च शिक्षणाचे आर्थिक गणित सोपे करा!**

दरवर्षी राज्यात पंधरा ते सोळा लाख विद्यार्थी दहावी व बारावी पास होतात. या विद्यार्थ्यांना ईप्सित उच्च शिक्षणाची संधी सहजपणे उपलब्ध होत नाही. बारावीला चांगले मार्क असूनही सीईटी/एआयइइ आदी स्वतंत्र स्पर्धा परीक्षांतून ग्रामीण विद्यार्थ्यांचा टिकाव लागत नाही. त्यातही उरलेल्या मॅनेजमेंट जागा धनिकांसाठी वाटलेल्या असतात. या साऱ्यावर मात करत ग्रामीण भागातील विद्यार्थी पुढे सरकला, तर त्याची स्कॉलरशिप त्याला त्यावर्षी मिळणे कठीण जाते. ह्यावर्षी ओबीसीची स्कॉलरशिप शैक्षणिक वर्ष संपले तरी आलेली नाही! अशा परिस्थितीत विद्यार्थ्याने शिक्षण कसे घ्यायचे? ‘शिक्षणासाठी कर्ज सहज उपलब्ध’ अशा बँकांच्या मोठमोठ्या जाहिराती असतात, मात्र त्यांची कागदपत्रे पूर्ण करण्यात हा ग्रामीण विद्यार्थी टिकत नाही व त्याला टिकूही दिले जात नाही. यासाठी हे कर्ज, स्कॉलरशीप यांची योग्य तरतूद करून त्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात अडथळा येणार नाही असे नियोजन होणे गरजेचे आहे.

मेडिकल, इंजिनीयरिंगचे शिक्षण हे फक्त लाखो रुपये खर्च करू शकणाऱ्या पालकांच्या मुलांनी घ्यावे अशी यंत्रणा करण्यात आली आहे. शासकीय इंजिनीयरिंग महाविद्यालये मर्यादित आहेत. खाजगी महाविद्यालयाची फी आणि सोबतचा खर्च हा सर्वसामान्य आणि गरीब पालकांना परवडणारा नसतो. मेडिकलच्या शिक्षणाचा तर सर्वसामान्यांनी विचारही करायचा नाही अशीच एकूण परिस्थिती आहे. यात ज्यांची बौद्धिक क्षमता आहे अशी मुले आर्थिक क्षमता नसल्याने या उच्च शिक्षणापासून वंचित राहत आहेत. आर्थिक दृष्ट्या भक्कम असणारे कितीही कमी मार्कांना मेडिकलमध्ये प्रवेश घेत आपल्या मुलांना डॉक्टर, इंजिनिअर बनवताना आढळत आहेत. सर्वसामान्य गरीब विद्यार्थ्याला त्याच्या शिक्षणाचा अधिकार नाकारला जात आहे. त्याचवेळी आज स्वस्त शिक्षण म्हणून ऑस्ट्रेलिया आणि रशियाला अनेक विद्यार्थी मेडिकल शिक्षण घेताना आढळतात. मग या देशात मेडिकल,

इंजिनीयरिंग शिक्षण इतके महाग कशासाठी? शिक्षणाचे सार्वत्रीकरण आणि अखेरच्या घटकाला उच्च शिक्षण हा उपक्रम देशात राबवायचा असेल तर प्रत्येक जिल्ह्यात किमान एक मेडिकल आणि इंजिनीयरिंग महाविद्यालय सुरू करून विनाअनुदानित शाळा, महाविद्यालये यांना अनुदानाच्या प्रवाहात आणणे गरजेचे आहे. तरच उच्च शिक्षणाचे गणित सर्वसामान्यांना खऱ्या अर्थाने सोपे जाईल.

**उच्च शिक्षणाच्या संकल्पना व्यापक करणे गरजेचे**

नियोजनाचा अभाव हा आपल्या शिक्षण पद्धतीतील फार मोठा दोष आहे. एका बाजूला आर्ट्स, कॉमर्स, सायन्स आणि दुसऱ्या बाजूला इंजिनीयरिंग, मेडिकल हीच पुढील शिक्षणाची क्षेत्रे परिचित आहेत. त्यातही ग्रामीण भागातून आर्ट्स, कॉमर्स, सायन्स व्यतिरिक्त अन्य शाखांची माहितीही नसते. पदवी प्राप्त करणे हाच महाविद्यालयीन शिक्षणाचा उद्देश झाला असून, महाविद्यालयीन शिक्षण हे पदवी संपादन करण्यापुरते मर्यादित राहिले आहे. आपण घेतलेल्या पदवीचा उपयोग कोठे होणार याचा विचारही प्रवेश घेताना नसतो. विद्यार्थी-पालक यांचा याबाबत गांभीर्याचा अभाव असतो. परिणामी, गुणवत्तेच्या निकषावर पदवी प्राप्त होऊनही वास्तव जगात फेलचा शिक्का बसतो. त्याचबरोबर पदवी अभ्यासक्रम पुरा करताना त्या विषयातील परिपूर्णता येत नाही. त्यासाठी सोबत काही कोर्सेस करावे लागतात. उदाहरणार्थ, बी.कॉम. पास झाल्यास टॅली-९ हा संगणकीय प्रोग्राम येणे आवश्यक असते. अशा अनेक संलग्न बाबी असतात की ज्यामुळे ती पदवी प्रत्यक्ष काम करताना अपूर्ण राहते. यासाठी विद्यापीठांनी अभ्यासक्रम तयार करताना बदलत्या गरजेप्रमाणे हे बदल करून घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर व्यावसायिक शिक्षणाचा व्यापक संस्थात्मक पाया त्या-त्या भागातील मूलभूत उत्पादित घटकांचा विचार करून उभारणे गरजेचे आहे.

**बदलत्या रोजगाराच्या संधी आणि शैक्षणिक सुविधा**

गेल्या पंचवीस वर्षांत तंत्रज्ञान वेगाने बदलले आहे. औद्योगिकीकरणाचा वेग वाढला असून शहरीकरणाकडे एकूणच ग्रामीण भागाचा कल वाढल्याने जिल्हा, तालुका, शहरे वेगाने वाढत आहेत. या गतिमानतेच्या परिणामी विविध





मूल्य ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये

**ग्रंथालीचे ताजे प्रकाशन**

# वारस होऊ अभिमन्यूचे

**अनुराधा गोरे**

देशासाठी तारुण्याचा होम करणाऱ्या अभिमन्यूंच्या या कथा. त्या केवळ 'युद्धाच्या रम्य कथा' नाहीत. त्यांपैकी एकाच्या वीरमातेनं मांडलेला, त्यांच्या धैर्याचा आणि त्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा हा पट आहे. लष्करी गणवेश अंगावर चढवण्याचा ध्यास आणि बलिदानाची आस ठेवून हे वीर सैन्यात दाखल होतात, पण त्यांच्या वीरमरणावर उत्स्फूर्त आणि मनोभावे असला तरी व्यक्त झालेला आदर-अभिमान तात्कालिक ठरतो हे सामाजिक सत्य विचारप्रवृत्त करणारं आहे. ज्यांच्या जिवावर आपण सुरक्षित जगतो त्यांच्याबद्दलच्या उदासीनतेला यात आव्हान आहे, तसंच नागरिक म्हणून आपल्या आणि देशाच्या रक्षणाचा विचार आपणही करायला हवा हे आवाहन त्यात आहे.

क्षेत्रांत रोजगाराच्या संधी वाढत आहेत. अनेक अनपेक्षित अंगभूत कलांना व्यावसायिक संधी प्राप्त झाली आहे. औद्योगिक क्षेत्रात संपर्क पद्धती (कम्युनिकेशन स्कील), सादरीकरण (प्रेझेंटेशन) आणि जाहिरात या घटकांना प्रचंड महत्त्व प्राप्त झाल्याने पदवीचा वर्ग आणि मार्कांच्या चढत्या श्रेणीपेक्षा तुम्ही कसे राहता, कसे बोलता, कसे चालता, कसे वागता, तुमचा संपर्क, तुमचे व्यवस्थापनकौशल्य या घटकांना अभूतपूर्व महत्त्व प्राप्त झाले आहे. या विविध कला शास्त्रीय पातळीवर विकसित झाल्या असून त्याचे काही विद्यापीठांनी अभ्यासक्रमही तयार केले आहेत. मात्र त्याचा लाभ आजही काही ठरावीक शहरांपलीकडे गेलेला नाही.

शिक्षणाचे नियोजन करताना पुढील पन्नास-शंभर वर्षांचा विचार होणे गरजेचे आहे. येणारे औद्योगिकीकरण, बदलते पर्यावरण, प्रदुषणाचे प्रश्न, बदलती खाद्य संस्कृती, पर्यटन क्षेत्रातील वेगाने बदल, फॅशनच्या दुनियेतील नवे प्रवाह, बदलती लाइफ स्टाईल, आरोग्याबाबत जागरूकता, जागतिकरणाचा थेट ग्रामीण भागापर्यंत होणारा परिणाम याचा विचार शिक्षणाच्या सुविधांचा ढाचा तयार करताना होणे गरजेचे आहे. राज्याचा विचार केल्यास कोकण, विदर्भ, मराठवाडा या अविकसित भागांत मोठ्या प्रमाणावर औद्योगिक प्रकल्पांचे मोठे नियोजन सध्या केले जात आहेत. हजारो हेक्टर जमीन येथील भूमिपुत्राची या प्रकल्पांसाठी घेतली जात आहे. या उद्योगांचे नियोजन करताना येथे विस्थापित होणारा भूमिपुत्र, त्याच्या रोजगाराचा विचार करताना तो अकुशल धरूनच विचार होतो. मात्र पुढील चार-पाच वर्षांत निर्माण होणाऱ्या कुशल रोजगाराचा विचार केल्यास त्याप्रमाणे प्रशिक्षण आवश्यक शैक्षणिक सुविधांचे नियोजन प्रकल्पाच्या उभारणीपूर्वी होणे गरजेचे आहे.

कोकण रेल्वे हा महत्त्वाकांक्षी, चार राज्यांना जोडणारा प्रकल्प सुरू झाला त्यावेळी महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ राज्यातील हजारो हेक्टर जमीन या प्रकल्पासाठी जनतेने उत्स्फूर्तपणे दिली. या प्रकल्पाचे नियोजन उत्तमपणे त्यावेळचे रेल्वेमंत्री मधु दंडवते, जॉर्ज फर्नांडिस, चेअरमन श्रीधरन यांनी केले. मात्र रेल्वेच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या विविध रोजगारांचा विचार करून प्रकल्प सुरू होतानाच या भागात प्रशिक्षणसुविधा निर्माण केल्या असत्या तर ह्या भूमिपुत्रांना मोठ्या प्रमाणावर कुशल, प्रशिक्षित रोजगार याच भागात निर्माण झाला असता.

महाराष्ट्रात तर शिक्षणाबाबत शासनाची फार उदासीनता आढळते. शासकीय पातळीवर नवे शैक्षणिक कोर्सेस, वर्ग सुरू करण्याची कोणतेच नियोजन नाही आणि इच्छाही नाही. खाजगी संस्थांनीच शिक्षणाचा भार सांभाळावा आणि हे करताना या संस्थांना अनुदान देण्याचेही धोरण नाही. ग्रामीण भागातील शाळा सुरू करण्यासाठी मान्यताही देण्यात येत नाहीत. विद्यार्थ्यांच्या वाढीव तुकडीला मान्यता देतानाही विनाअनुदानाच्या कात्रीत पकडले जाते. येथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी आमचा काही संबंध नाही, ज्यांच्यापाशी पैसा असेल त्यांनी फी भरा आणि शिक्षण घ्या अशीच उपरेपणाची शासनाची भूमिका आहे. त्यामुळे पारंपरिक शिक्षणाच्या बाहेर नव्या संधीपासून सर्वसामान्य विद्यार्थी वंचित राहत आहे.

विविध योजनांवर कोट्यवधींचे बजेट करणाऱ्या शासनाने शिक्षणातील खर्चावरील टक्का वाढवणे गरजेचे आहे. सर्वसामान्याला हक्काचे शिक्षण देणे ही शासनाची जबाबदारी आहे. याबाबत गोवा हे आदर्श राज्य आहे. येथे शासनाकडून शिक्षणासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. येथील शासनाने बारावी पास होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी फक्त पाचशे रुपये भरून त्याच्या घरात कॉम्प्युटर बसवण्याची योजना अमलात आणत प्रत्येक तरुणाला नव्या जगाशी जोडले आहे. तसेच, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात फार मोठी गुंतवणूक केली असून मेडिकल, इंजिनीयरिंग आणि अन्य क्षेत्रांतील शिक्षणाच्या सोयी शासकीय अद्ययावत महा-विद्यालयांतून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत. महाराष्ट्र शासनाची शिक्षणाबाबतची उदासीनता दूर होणे गरजेचे आहे. शिक्षणाला अर्थसंकल्पात प्राधान्य मिळणे गरजेचे असून बदलत्या जागतीकरणाचा आणि सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा विचार करून शिक्षणाच्या मूलभूत प्रश्नांचा प्राधान्याने विचार होणे गरजेचे आहे.

**– अभिजित हेगशेट्ये**
abhijithegshetye@yahoo.com

# मराठी सिनेमा आणि वास्तव

❖ अशोक राणे

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. तो काळ मराठी चित्रपटांच्या संदर्भात दर्जाच्या पातळीवर भरभराटीचा होता. आधीच्या दशकात ज्यांनी खऱ्या अर्थाने आपली कारकीर्द गाजवायला सुरुवात केली होती ते राजा परांजपे, ग. दि. माडगूळकर आणि सुधीर फडके ६० नंतरही आपल्या अलौकिक प्रतिभेचा आविष्कार घडवत होते. याशिवाय, त्यांच्याही आधी किंवा आसपास आपली कारकीर्द सुरू करणारे गजानन जहागीरदार, दत्ता धर्माधिकारी, माधव शिंदे, अनंत माने, दिनकर द. पाटील आदी मंडळीदेखील कार्यरत होती. या प्रत्येकाची प्रकृती भिन्न होती. प्रत्येकाची स्वतःची अशी खास वैशिष्ट्ये होती आणि ती सारी त्यांच्या चित्रपटांतून स्पष्टपणे दिसून यायची. राज्य अस्तित्वात यायच्या आदल्याच वर्षी अनंत माने यांचा 'सांगत्ये ऐका' प्रदर्शित झाला होता आणि पुण्याच्या 'आर्यन' चित्रगृहात १३१ आठवडे मुक्काम ठोकून त्याने बॉक्स ऑफिसवर अभूतपूर्व विक्रम प्रस्थापित केला होता. त्यातल्या 'बुगडी माझी सांडली ग'ने अवघ्या महाराष्ट्राला वेडे केले होते. वसंत पवारांचे संगीत असलेल्या या चित्रपटातील राम कदम यांनी स्वरबद्ध केलेली ही लावणी आणि तीवरची जयश्री गडकर यांची अदाकारी अजरामर ठरली. याच सुमारास माधव शिंदे यांच्या 'शिकलेली बायको'मधील 'आली हासत पहिली रात' आणि 'प्रेमा काय देऊ तुला' ही संगीतकार वसंत प्रभू यांचे संगीत लाभलेली, पी. सावळारामरचित गीते, तसेच सुधीर फडके यांची 'जगाच्या पाठीवर'मधील 'नाही खर्चिली कवडी-दमडी', 'नाच नाचुनी अती मी दमले' किंवा त्यांचेच संगीत लाभलेले आणि माणिक वर्मा यांनी गायिलेले 'उमज पडेल तर'मधील 'घननीळा लडिवाळा', वसंत प्रभूंची 'कन्यादान'-मधील 'लेक लाडकी या घरची','कोकिळ कुहू कुहू बोले','मानसीचा चित्रकार तो', अनंत मानेंच्या 'मानिनी'मधील वसंत पवारांनी स्वरबद्ध केलेल्या बहिणाबाईच्या रचना 'अरे खोप्यामधी खोपा', 'अरे संसार संसार', गदिमांचे 'मानभंग हाचि झाला मंडपी आहेर', 'प्रपंच'मधील 'पोटापुरता पसा पाहिजे', 'बैल तुझे हरिणावानी' अशा विविध प्रकारच्या चित्रपटगीतांनी महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतरचा हा काळ अक्षरशः गाजवला होता. विलक्षण वैविध्य असलेली ही आणि अल्याड-पल्याडची, या प्रतिभावंतांनी जन्माला घातलेली इतर अनेक गीते म्हणजे मराठी चित्रपटसंगीतातील अपूर्व लेणी आहेत. तो जमाना होता रेडिओचा आणि लाउडस्पीकरचा. या दोन्ही ठिकाणी ही गाणी सतत वाजत राहायची आणि मुख्य म्हणजे हाच हिंदी सिनेमाचाही सुवर्णकाळ होता. हिंदी गीतांनी असाच तमाम चित्रपटप्रेमींची ताबा घेतला होता. त्या सदाबहार हिंदी गीतांचा आस्वाद घेणारा मराठी रसिक आपल्या या मराठी मेव्याचा तेवढाच भरपेट आस्वाद घेत होता. गीतकार, संगीतकार, गायक, गायिका आणि त्यांनी दिलेल्या या अजरामर गीतांचा उल्लेख करताना तत्कालीन दिग्दर्शक, लेखक, कलावंत, तंत्रज्ञ यांचे महत्त्व नाकारण्याचा अजिबात हेतू नाही; ते तसे नाकारताच येणार नाही. तो काळच मुळी चित्रपटांच्या दृष्टीने महाराष्ट्रात, देशात आणि जगातही सिनेमाचा सुवर्णकाळ होता. चित्रपटनिर्मितीत सहभागी झालेल्या प्रत्येक घटकाचे त्यात भरभक्कम योगदान होते. यातल्या प्रत्येकाच्या अव्यभिचारी प्रतिभेचा आविष्कार उत्तुंग होता. लेखाचा आरंभ करताना अजरामर गीतांचा उल्लेख केला कारण हा मजकूर वाचताना, यातले गाण्यांचे मुखडे वाचताना प्रत्येकजण

लगेच गायलाच लागणार आहे. हीच नव्हे तर याच्या आसपासची जी इतर अनेक गीते, ज्यांचा जागेअभावी इथे उल्लेख केला नाही, तीही सहजपणे आठवून गाऊ लागतील आणि नकळत ६० सालातल्या या सुमधुर गीत-संगीताने भारलेल्या वातावरणात जाऊन पोचतील. गेल्या ५० वर्षांचा मराठी चित्रपटांचा लेखाजोखा मांडताना इथून सुरुवात करणे म्हणूनच मला अधिक श्रेयस्कर वाटते...वाटले.

आधी म्हटल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले ते वर्ष गाजवले ते मुख्यतः गजानन जहागीरदार (उमाजी नाईक), दत्ता धर्माधिकारी (लग्नाला जातो मी), राजा परांजपे (जगाच्या पाठीवर) यांनी आणि पन्नासच्या दशकात ज्यांचा उदय झाला आणि प्रथमपासूनच ज्यांचा ठसा उमटला त्या माधव शिंदे (अंतरीचा दिवा, शिकलेली बायको, कन्यादान), अनंत माने (अवघाची संसार), दिनकर द पाटील (उमज पडेल तर, भैरवी) यांनी. त्या वर्षी एकूण पंधरा चित्रपट आले. वैविध्यपूर्ण कथानके, त्यांची तितकीच वैविध्यपूर्ण मांडणी, सुमधुर गीत-संगीताची लयलूट आणि कलावंतांचा प्रभावी अभिनय यांमुळे हे सारे चित्रपट विशेष लक्षणीय ठरले. वैविध्य असे, की ज्या अनंत माने यांच्या 'सांगत्ये ऐका'ने आदल्याच वर्षी महाराष्ट्रभर धुमाकूळ घातला होता त्यांचाच पुढचा चित्रपट 'अवघाची संसार' हा 'सांगत्ये ऐका'च्या वाटेने गेला नाही. तो एक हलकाफुलका कौटुंबिक चित्रपट होता. पुढच्याच वर्षी त्यांनी या दोन्हीपेक्षा अतिशय भिन्न प्रकृतीचा 'मानिनी' हा चित्रपट दिला. एकीकडे, 'सांगत्ये ऐका'सारखा अतिशय नाट्यपूर्ण तमाशापट, तर दुसरीकडे थेट मध्यमवर्गीय वळणाचा 'मानिनी'. 'सांगत्ये ऐका'मध्ये 'बुगडी माझी सांडली ग'वर दिलखेचक लावणी सादर करणाऱ्या जयश्री गडकर यांना माने यांनी 'मानिनी'मध्ये ब्राह्मण कुटुंबातील मालती केले आणि हे घडले अवघ्या तीन वर्षांत.


या दिग्दर्शकांबरोबर तेवढ्याच ताकदीची कामगिरी होती सिद्धहस्त लेखक-गीतकार ग. दि. माडगूळकर आणि संगीतकार सुधीर फडके, वसंत प्रभू, वसंत पवार, वसंत देसाई, आनंदघन (लता मंगेशकर), दत्ता डावजेकर यांची. संगीतकार म्हणून लताबाईंनी आनंदघन या नावाने 'मोहित्यांची मंजुळा', 'मराठा तितुका मेळवावा' आणि 'साधी माणसं' हे तीनच चित्रपट या काळात केले. 'साधी माणसं' हा प्रयोगशीलतेच्या आणि साधेपणाच्या पातळीवर कायम वरच्या स्थानावर राहिला. दुसरीकडे, राजा परांजपे यांचे 'आधी कळस मग पाया', 'हा माझा मार्ग एकला', 'पाठलाग', 'पडछाया', मधुकर पाठक यांचा 'प्रपंच' आणि नुकतीच आपली कारकीर्द सुरू करणारे राजा ठाकूर यांचे 'पुत्र व्हावा ऐसा', 'रंगल्या रात्री अशा', 'पाहू रे किती वाट' हे चित्रपट आले. ठाकूरांच्या रुपात एक अतिशय सर्जनशील, प्रयोगशील आणि माध्यमावर उत्तम पकड असलेला आणखी एक दिग्दर्शक मराठी चित्रपटसृष्टीला लाभला. राजा ठाकूरांनी यानंतर 'एकटी', 'घरकुल', 'मुंबईचा जावई', 'बाजीरावाचा बेटा', 'जावई विकत घेणे आहे' असे भिन्न प्रकृतीचे चित्रपट दिले. याचदरम्यान राजा परांजपे यांचे शिष्य राजदत्त यांचे 'मधुचंद्र'द्वारा आगमन झाले. नंतरच्या काळात 'धाकटी बहीण', 'अष्टविनायक', 'अरे संसार संसार', 'शापित', 'पुढचं पाऊल' असे अनेक आशयघन चित्रपट त्यांनी दिले.

या संपूर्ण काळात, थेट राजदत्तांपर्यंत आधी उल्लेख केलेली तमाम दिग्गज मंडळी एकीकडे दर्जेदार चित्रपट देत होती, तरी बहुतांश मराठी चित्रपट एका विशिष्ट चाकोरीत सापडला होता. ही चाकोरी मुख्यतः तमाशापटांनी व्यापलेली होती. १९६२ मध्ये शासनाने मराठी नाटकांना करमुक्त केल्यामुळे रंगभूमीला नवजीवन लाभू लागले होते. रंगभूमीवर दर्जेदार नाटकांची सुगी सुरू झाली होती. त्यामुळे सुशिक्षित मध्यमवर्ग नाटकाकडे वळू लागला होता. त्याला चित्रपटापासून दूर लोटण्याचे काम तमाशापटांच्या अतिरेकाने केले होते. चित्रपट व्यवसाय आर्थिकदृष्ट्या चांगलाच अडचणीत आला होता. मात्र या तमाशापटांनी मराठी चित्रपटसृष्टीला निळू फुले यांच्यासारख्या अभिनेत्याची दिलेली देणगी आवर्जून नमूद केल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. शासनाने १९६२ मध्येच मराठी चित्रपटांना राज्य पुरस्कार द्यायला सुरुवात केली होती. त्याचा काही प्रमाणात चित्रपटसृष्टीला फायदा झाला, तरीही व्यवसाय म्हणून १९७० च्या आसपास मराठी सिनेमा ढेपाळलाच. अशा अवस्थेत अधूनमधून सापडणाऱ्या मराठी चित्रपटाला धुगधुगी देण्याचे काम मधूनच एखादा चित्रपट करत असतो. याचवेळी दादा कोंडके यांचा 'सोंगाड्या' हा वेगळ्या प्रकृतीचा म्हणूनच ताजा टवटवीत

वाटेल असा ग्रामीण विनोदपट आला. आजवरच्या मराठीतल्या तमाशापटांच्या आणि विनोदाच्याही बाजाला दादांनी एक वेगळेच वळण दिले. ग्रामीण निरागसता आणि इरसालपणा यांचा खुबीदार मेळ त्यांनी 'सोंगाड्या'मध्ये पेश केला आणि वैशिष्ट्य म्हणजे या चित्रपटाने ग्रामीण प्रेक्षकाबरोबरच शहरी प्रेक्षकही मिळवला. किंबहुना, तमाशाप्रधान बाजाच्या अतिरेकापायी दूर गेलेला शहरी प्रेक्षक 'सोंगाड्या'मुळे मराठी चित्रपटाकडे पुन्हा परतला, 'सोंगाड्या'त तमाशा असूनही. इथून पुढे संपूर्ण १९७० चे दशक हे दादा कोंडकेंचे दशक होते. मराठी चित्रपटाच्या व्यावसायिक यशाचा नवा साक्षात्कारच दादा कोंडकेंच्या चित्रपटांनी घडवला. पुढे पुढे मात्र दादांनी आपल्या विनोदाच्या शैलीला आणखी मोकाट सोडले आणि मग उत्तरोत्तर त्यांच्या चित्रपटातला विनोद 'ग्रामीण'कडून 'ग्राम्यते'कडे वेगाने जाऊ लागला. शैलीची पुनरुक्ती होऊ लागली. 'सोंगाड्या'ने जशी एक नवसंजीवनी मराठी चित्रपटाला दिली, तशीच ती बुजुर्ग दिग्दर्शक व्ही.शांताराम यांनी आपल्या 'पिंजरा'द्वारे दिली. ब्लॅक अँड व्हाइट गरीब बापुड्या मराठी चित्रटात 'पिंजरा'ने अक्षरशः रंग भरले. मराठीत रंगांचे युग सुरू करून दिले. त्यातून मराठीला थोडी धुगधुगी आली खरी परंतु व्यवसाय म्हणून तो काही फार बऱ्या अवस्थेत नव्हता. म्हणून मग शांतारामबापूंनी शासनाला साकडे घालून, मराठी चित्रपट व्यवसायाला खऱ्या अर्थाने संजीवनी प्राप्त करून देईल अशी करपरतीची योजना सुरू करण्यास उद्युक्त केले. याचा फायदा निर्मात्यांना आणि पर्यायाने एकूण व्यवसायाला झाला.

याच सुमारास उदय झाला सचिन आणि महेश कोठारे यांच्या मराठी चित्रपटांचा. सचिन आणि महेश हे दोघेही वाढले होते हिंदी चित्रपटांच्या परिसरात. त्यांच्यापुढे आदर्श होता तो हिंदी चित्रपटाच्याच बाजाचा. त्यामुळे त्यांनी विनोद आणि रोमान्स यांचा मेळ घालत आणि हिंदी चित्रपटाचा तोंडवळा देत आपला मराठी चित्रपट आणला. साहजिक, त्यांच्या 'अशी ही बनवाबनवी', 'नवरी मिळे नवऱ्याला', आणि 'दे दणादण', 'धडाकेबाज' वगैरे चित्रपटांचा चेहराही बराचसा शहरी होता. दादा कोंडके शैलीच्या कमरेखालच्या विनोदाला कंटाळलेला शहरी आणि मध्यमवर्गीय प्रेक्षक काही प्रमाणात तरी या ताज्या मराठी चित्रपटाकडे वळला.






आर्थिक-सामाजिक कारणांपायी गावांकडून शहरांकडे आणि त्यामुळे ग्रामीण संस्कृतीकडून शहरातल्या बहुसांस्कृतिक परिसराकडे लोकांच्या वाहणाऱ्या ओघाला एव्हाना वेग आला होता. तो वेग दिवसेंदिवस वाढतच जाणार होता. या परिस्थितीत हिंदी तोंडवळ्याच्या पण मराठी असलेल्या विनोदी रोमँटिक चित्रपटांचे महाराष्ट्राच्या नगरा-महानगरांत मराठी प्रेक्षकांमध्ये स्वागत झाले. मराठी चित्रपट मरगळ झटकून पुन्हा ताज्या दमाने उभा राहतो आहे, असे काहीसे चित्र या काळात सचिन आणि महेश कोठारे यांच्या या चित्रपटांनी रंगवले, यात शंका नाही. मात्र हा चित्रपट आणि पर्यायाने एकूणच मराठी चित्रपट आता व्यावसायिकदृष्ट्या हिंदी चित्रपटाला समर्थ पर्याय म्हणून उभा राहिला, हिंदी चित्रपटाच्या व्यवसायाशी थेट स्पर्धा करू लागला असे म्हणता येणार नाही. निर्मितीसाठीचे अर्थकारण, प्रेक्षकवर्ग, सांस्कृतिक परिसर आणि भाषिक परिसर अशा अनेक बाबतींत हिंदी चित्रपटाच्या तुलनेत मराठी चित्रपटाला मर्यादा पडत होत्या, आजही पडत असतात. मुंबईसारख्या बहुसांस्कृतिक महानगरांमध्ये तर मराठी चित्रपटांना सिनेमागृह मिळणे ही मोठी समस्या ठरत राहिली आहे.

८० च्या दशकानंतर ते आतापर्यंत अनेक तरुण दिग्दर्शक, तंत्रज्ञ, लेखक, कलावंत पुढे आले आणि त्यामुळेही एकप्रकारचा ताजेपणा मराठी चित्रपटात आला. सुमित्रा भावे-सुनील सुकथनकर, गगनविहारी बोराटे, सतीश रणदिवे, संजीव नाईक, पुरुषोत्तम बेर्डे, कांचन नायक, संजय सूरकर, स्मिता तळवळकर, श्रावणी देवधर, संदीप सावंत, चित्रा पालेकर, राजीव पाटील, निशिकांत कामत, राजेश देशपांडे, शेखर नाईक, सतीश मनवर, सचिन कुंडलकर, परेश मोकाशी, आदी दिग्दर्शक, विजय कुवळेकर, संजय पवार, संजय पाटील आदी लेखक, देबू देवधर, चारुदत्त दुखंडे, समीर आठल्ये, संजय मेमाणे, संजय जाधव, अमलेंदु चौधरी आदी छायाचित्रकार आणि रंगभूमीवरून आलेला कलावंतांचा भला मोठा ताफा यांनी मराठी चित्रपटासृष्टीत आपले योगदान दिले आहे. याच काळात विजय तेंडुलकर, सत्यदेव दुबे, जब्बार पटेल, अमोल पालेकर, नचिकेत-जयू पटवर्धन, डॉ. श्रीराम लागू ही रंगभूमीवर अत्युच्च दर्जाची कामगिरी करणारी मंडळी चित्रपटात आली आणि त्यांनी मराठी चित्रपटाला एक नवे परिमाण मिळवून दिले. मराठी जगताच्या बाहेर मराठीचा झेंडा फडकवला.

महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने गेल्या पन्नास वर्षाचा मराठी चित्रपटाच्या प्रवासाची नोंद या अशा सुखद आठवणी काढत घेताना एक निरीक्षण नमूद करावेसे वाटते. साठपूर्वीचा किंवा साठ सालानंतरचा हा एकूण प्रवास पाहताना अप्रिय वाटली तरी एक गोष्ट सांगावीशी वाटते, ती म्हणजे मराठी चित्रपटसृष्टीचे व्यावसायिक रूप कायम कनिष्ठ मध्यमवर्गीयासारखे राहिलेय. कसाबसा आपला संसार चालवत मेटाकुटीला येणारा हा माणूस जसा अधूनमधून बोनस किंवा चुकुन हातात पडलेला वाढलेल्या पगाराचा ॲरियर यावर चार दिवस मजेत घालवतो आणि पुन्हा ये रे माझ्या मागल्या या न्यायाने हलाखीत दिवस काढतो तशीच बहुतांश मराठी चित्रपटाची स्थिती कायम राहिली आहे. गेली तीन-चार वर्षे जी तथाकथित भरभराट दिसते आहे ती लक्षात घेतली तरी या विधानात फारसा फरक पडत नाही. परंतु हातातोंडाशी मेळ घालत, हलाखीच्या परिस्थितीत ही मराठी चित्रपटांनी बऱ्याच अंशी सातत्याने गौरवशाली कामगिरी बजावली आहे. त्यातला बराचसा वाटा साठपूर्वीच्या आणि साठनंतरच्या नजिकच्या काळाचा आहे. त्यानंतरही मराठी चित्रपटाला गौरव प्राप्त करून देणाऱ्या मोजक्या का होईना गोष्टी घडल्या.

मराठी चित्रपटाच्या या गौरवशाली वाटचालीचे चार महत्त्वाचे टप्पे इथे नोंदायला हवेत. 'संत तुमाराम' या प्रभात फिल्म कंपनीच्या दामले-फत्तेलाल दिग्दर्शित अनुपम कलाकृतीचा व्हेनिस आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात झालेला सन्मान, पहिल्या राष्ट्रपती पुरस्कारात सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे पहिले पारितोषिक आचार्य अत्रे दिग्दर्शित 'श्यामची आई'ने पटकावणे, 'पिंजरा'द्वारा शांतारामबापूंनी रंगांचे युग आणणे आणि चार दशकानंतर संदीप सावंत यांच्या 'श्वास'ने पुन्हा एकदा राष्ट्रीय पुरस्काराचा (पूर्वी हाच राष्ट्रपती पुरस्कार म्हणून ओळखला जात असे) सर्वोच्च सन्मान प्राप्त करणे.

या प्रवासातील आणखी एक महत्त्वाची गोष्ट नोंदायला हवी आणि ती म्हणजे 'सामना' या चित्रपटापासून डॉ.जब्बार पटेल यांच्यापासून ते आजच्या सतीश मनवर या तरुण रंगकर्मीपर्यंत रंगभूमीवरून आलेल्या दिग्दर्शकांचे योगदान!


महत्त्वाचे म्हणजे 'सामना' हा एका रंगकर्मीने केलेला पहिलाच चित्रपट बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी निवडला गेला तर अगदी अलिकडचा सतीश मनवरचा 'गाभ्रीचा पाऊस' यंदाच्या रोटॅरडॅम आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दाखवला गेला. अधेमधे अनेक रंगकर्मींनी चाकोरीबाहेरचे विषय हाताळणारे आणि नव्या वळणाचे अनेक चित्रपट केले. त्यांचेही देशात-परदेशात यथोचित कौतुक झाले. ज्या काळात आजच्यासारखी सब-टायटलिंगची सोय नव्हती त्या काळात 'संत तुकाराम' (१९३६) केवळ पारदर्शी आणि प्रभावी चित्रपट भाषेमुळे व्हेनिसला आलेल्या जगभरच्या चित्रपटकर्त्यांना आणि रसिकांना विनासायास कळला. हॉलिवूडचे दिग्दर्शक फ्रँक काप्रा यांनी तर 'अमेरिकन सिनेमाटोग्राफ'मधे असे लिहून ठेवले आहे की, ' भारतासारख्या देशात, ज्याला खऱ्या अर्थाने 'सिनेमा' म्हणावा असा चित्रपट निर्माण होऊ शकतो याचं आश्चर्य आणि आनंदही वाटतो.'

या चार घटनांच्या आसपास आणखीही काही घडले, अभिमानाने उर भरून आले. परंतु व्यवसाय म्हणून मराठी चित्रपट किती मजबूत आहे, स्वतःच्या पायावर उभा आहे का? असा प्रश्न विचारला की उत्तर फारसे काही चांगले हाताला लागत नाही. 'जयमल्हार' (१९४७) ने सुरू करून दिलेली तमाशापटांची, ग्रामीणपटांची परंपरा 'सांगत्ये ऐका'च्या अभूतपूर्व यशामुळे एक ट्रेंड सेट होण्यात झाली. पुढे पुढे उबग येण्यापर्यंत हा तमाशापटांचा सिलसिला चालला. परंतु या ट्रेंडवर एकूण चित्रपटसृष्टी किती तगली? किती भरभराटीला आली? किती प्रमाणात स्वतःच्या पायावर उभी राहण्याइतपत तगडी झाली? या परंपरेने काही उल्लेखनीय, संस्मरणीय चित्रपट दिले हे मान्य, परंतु व्यवसाय म्हणून ते इंडस्ट्रीला फारसे तारू शकले नाहीत. वर उल्लेख केलेल्या कनिष्ठ मध्यमवर्गीय माणसाच्या संसारासारखी मराठी चित्रपटसृष्टी आपला संसार रेटत राहिली. याच अर्थाने असे विधान नक्कीच करता येईल की 'माहेरची साडी' आणि आजच्या 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय'चे व्यावसायिक यश हे केवळ त्या त्या निर्मात्याचे आहे, एकूण मराठी चित्रपटसृष्टीचे नाही. या पराक्रमी यश प्राप्त करणाऱ्या चित्रपटांच्या आसपास इतरही काही मोजक्या चित्रपटांनी व्यावसायिक यश प्राप्त केले, परंतु वर म्हटल्याप्रमाणे कनिष्ठ मध्यमवर्गीय माणसाला मधूनच मिळणाऱ्या अतिरिक्त उत्पन्नासारखे हे आहे. त्याच्या उत्पन्नात सातत्य नसल्यामुळे त्याच्या परिस्थितीत फार मोठा फरक घडून येत नाही. सणासुदीला गोडधोड खावे आणि मग कोरड्या भाकरीवर त्याने यावे अशी कायम अवस्था मराठी चित्रपटसृष्टीची झाली आहे.

व्यवसायाच्या आघाडीवर दादा कोंडके आणि सचिन-महेश कोठारे यांनी एक काळ गाजवला. परंतु ते यश केवळ त्यांच्या पातळीवरच राहिले. मराठी चित्रपटसृष्टीला धुगधुगी आली असे जे अधूनमधून म्हणण्याची पद्धत आहे तेवढेच या तिघांच्या चित्रपटांचे कतृत्व! या साऱ्या विवरणावरून एक अस्वस्थ करणारे वास्तव हाती लागते आणि ते म्हणजे व्यवसाय म्हणून मराठी चित्रपट फार मोठी कामगिरी करू शकलेला नाही. मराठी चित्रपटाच्या इतिहासात एक वर्ष असे ही गेले की त्यावर्षी (१९४५) एकाही चित्रपटाची निर्मिती झाली नाही आणि गेली दोन-तीन वर्षे चित्रपटांची संख्या कधी नव्हे इतकी वाढते आहे. जी पूर्वी वीसच्या आसपास असायची ती आता शंभराच्यावर गेली आहे. परंतु पुन्हा आरंभी म्हटल्याप्रमाणे ही भरभराट तथाकथित स्वरूपाची आहे. यातल्या किती चित्रपटांनी घातलेले भांडवल तरी परत मिळवले? ज्यांच्या खिशात अमर्याद, अतिरिक्त पैसा खेळतो आहे आणि चित्रपटमाध्यमाची, व्यवसायाची ज्याला अजिबात समज नाही असा निर्माता शासनाच्या तीस लाखाच्या अनुदानाच्या जोरावर चित्रपट करत सुटलाय. आणि म्हणून ही संख्यावाढ...! याचीही चित्रपटसृष्टी सुदृढ व्हायला किती मदत होईल याविषयी अवघ्या चित्रपटसृष्टीलाच संशय आहे. मध्यंतरी मला एक 'निर्माते' भेटले. त्यांचा व्यवसाय बिल्डरचा, मी त्यांना सहज विचारलं की, तुम्हाला सिनेमा का काढावासा वाटला? तर ते म्हणाले, 'साठ-सत्तर लाखांचा खेळ सगळा. समजा, नाहीच काही लागलं हाताला तर म्हणेन की माझे दोन फ्लॅट नाही विकले गेले...!'

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने हा आढावा घेताना मी हे कटू वास्तव का मांडतो आहे असे तुम्हाला वाटणे स्वाभाविक आहे परंतु यातच या पन्नास आणि त्याही आधीच्या मराठी चित्रपटाचे मर्म दडले आहे. मराठी चित्रपटाने या सबंध काळात पराक्रम केले. ते सर्वांनी







डोक्यावर देखील घेतले. परंतु व्यवसाय म्हणून तो सशक्तपणे स्थिरावू शकला नाही हे सत्य उरतेच आणि त्याला दोन घटक जबाबदार आहेत. एक म्हणजे खुद्द चित्रपटसृष्टी आणि दुसरा म्हणजे प्रेक्षक! मराठी चित्रपट ही मराठी प्रेक्षकांचा कधीच पहिला अग्रक्रम-फर्स्ट प्रायोरिटी राहिली नाही. एके काळी मध्यमवर्गीय वळणाच्या चित्रपटाला मुख्यतः मध्यमवर्गीय प्रेक्षक गर्दी करायचा, ग्रामीण किंवा तमाशापटांना मुख्यत: ग्रामीण प्रेक्षक यायचा, तर सासर-माहेर-कुंकू टाईप रडक्या चित्रपटांना केवळ बायका जमायच्या असा प्रकार होता. म्हणजे थोड्या मोठ्या प्रमाणात प्रेक्षक मिळण्याचे हे तीन प्रमुख प्रकार होते. याशिवाय फार मोठी परंपरा असलेल्या विनोदी चित्रपटांचा एक बऱ्यापैकी सर्वसमावेशक प्रेक्षक होता, आजही आहे. या विनोदी परंपरेतच दादा कोंडके आणि सचिन-महेश कोठारे यांनी आपापल्या शैलीचे वैशिष्ट्यपूर्ण चित्रपट काही काळ सातत्याने करून फार मोठा प्रेक्षकवर्ग मिळवला. प्रथमच त्यांनी आणि त्यातही विशेषतः दादा कोंडके यांनी बिगर मराठी प्रेक्षक आपल्या चित्रपटाकडे आणला. एकूण मराठीकडे नव्हे. ती व्यक्तीशः त्यांची कमाई होती. त्यांनी निर्माण केलेले ट्रेंड त्यांच्यापुरतेच मर्यादित राहिले. आणखी एक गर्दी खेचणारा चित्रपट प्रकार मराठीत अस्तित्वात आहे आणि तो म्हणजे देवीदेवतांच्या संबंधीच्या भाबड्या समजुतींना खतपाणी घालणारा, अंधश्रध्देच्या वाटेने जाणारा. याचा एक फार मोठा प्रेक्षक विविध ठिकाणच्या जत्रेत आढळतो. त्याची म्हणून अशी समांतर व्यवस्था अस्तित्वात आहे. हा चित्रपट जत्रेतच मुख्यतः चालतो. मुंबई-पुणे सोडाच परंतु तालुक्याच्या शहरातही त्याला फारसा प्रेक्षकवर्ग हाताला लागत नाही. या पठडीतल्या 'काळुबाईच्या नावानं चांगभलं' या अलिकडच्या चित्रपटानं असाच जत्रेतून तुफान धंदा केला. याच ओघात आणखी एक थोडी (गमतीदारच) नोंद करायला हवी. स्वातंत्र्यवीर सावरकर आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील चित्रपटांना अनुक्रमे ब्राह्मणांनी आणि दलितानीच मुख्यतः गर्दी केली. तमाम मराठी प्रेक्षकांना काही ते आपले चित्रपट वाटले नाहीत. ही पुरोगामी महाराष्ट्राची एक वेगळीच शोकांतिका! मात्र तात्पर्य काय केवळ त्या त्या प्रकारातल्या त्या त्या काळच्या वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटांना, चित्रपटशैलीला

त्या त्या वेळी तुलनेने मोठा प्रेक्षक लाभला. मराठी चित्रपट पाहणे हा मराठी प्रेक्षकाचा अग्रक्रम कधीच राहिला नाही.

याचा फार मोठा फटका मराठी चित्रपटाला कायमचा बसत आला. दादा कोंडके आणि सचिन-महेश कोठारे यांच्या यशस्वी कारकिर्दीची सुरुवात होईतो मराठी चित्रपटापुरता महाराष्ट्राचा नकाशा मुंबई आणि पुणे ते कोल्हापुर एवढाच मुख्यतः होता. रायगड जिल्ह्यातील दोनचार थिएटर वगळता कोकणात तर जवळपास थिएटरच नव्हती. मराठवाडा, विदर्भ इथे या त्रिकुटाने मराठी चित्रपट नेला. त्याआधी या परिसरात काही निर्माते आपले चित्रपट न्यायचे. किंवा मुंबई, पुणे ते कोल्हापूर या ठिकाणी बऱ्यापैकी चाललेले चित्रपट तिकडचे वितरक किंवा प्रदर्शक आणि त्यातही जत्रेतल्या तंबू थिएटरांचे मालक घेऊन जायचे. निर्मात्यांना त्यातून थोडीफार कमाई व्हायची. परंतु तरीही एक गोष्ट नजरेआड करता येत नाही आणि ती म्हणजे, चांद्यापासून बांद्यापर्यंत पसरलेला उभाआडवा महाराष्ट्र आताआतापर्यंत मराठी चित्रपटांची एकजिनसी टेरेटरी कधीच नव्हता. म्हणजे जिथे मुळात संख्येने प्रेक्षक कमी आणि त्यात पुन्हा मराठी सिनेमा पाहणे हा त्याचा अग्रक्रम नाही अशा ठिकाणी व्यवसाय म्हणून मराठी चित्रपट उभा राहणार कसा?

आठ-दहा वर्षांपूर्वीची गोष्ट! 'मी पाहिलेले जग-चित्रपटातलं आणि चित्रपटाबाहेरचं' या विषयावर माझे पुण्यात व्याख्यान होते. सुरुवातीलाच अगदी मुद्दामच मी एक अट घातली की मला व्याख्यानानंतर हवे तेवढे प्रश्न विचारा, परंतु मराठी चित्रपटाविषयी विचारू नका. माझे व्याख्यान संपताच एक गृहस्थ उभे राहिले आणि म्हणाले, तुम्ही अट घालुनसुद्धा मी तुम्हाला विचारतो आहे की मराठीत दर्जेदार चित्रपट का निघत नाहीत? मी म्हटले, या प्रश्नाचे उत्तर म्हणून मी एक प्रश्न विचारतो. त्याचे उत्तर तुम्ही सर्वांनी मिळून द्या. मी गेल्या दहा वर्षांत आलेल्या दहा दर्जेदार मराठी चित्रपटांची नावे घेतो. ज्यांनी ती पाहिली असतील त्यांनी हात वर करा. मी नावे घेत गेलो. लोक हात वर करत गेले. मग मी म्हणालो, इथे जमलेल्या पाचसहाशे लोकांपैकी जर जास्तीत जास्त तीस-चाळीस लोकांनीच हे दर्जेदार चित्रपट पाहिले असतील तर ते बनवायचे कशाला? आणि ही जर पुण्यातली परिस्थिती असेल तर उर्वरित महाराष्ट्राबद्दल बोलाच कशाला? मुंबईचा विलेपार्ले पूर्व विभाग ही मराठी सांस्कृतिक वातावरणाने भारलेली मुख्यतः मराठी मध्यमवर्गाची वसाहत. तिथे सुध्दा महेश सातोस्कर दिग्दर्शित आणि अरुणा जोगळेकर लिखित, ग्रेस आणि आरती प्रभूंची गीते (त्यांच्या मूळच्या कविता) असलेला, हृदयनाथ मंगेशकरांचे संगीत लाभलेला, नाटकाच्या वेडापायी झालेली एका कुटुंबाची वाताहत असे वास्तववादी कथानक असलेला आणि मुख्य लोकेशन म्हणून नाट्यमंच आणि कोकण यांचा अतिशय कल्पक आणि प्रभावी वापर केलेला चित्रपट तिसऱ्या दिवशी थिएटरमधून काढावा लागला! अशीच गत अनेक वेगळ्या मराठी चित्रपटांची झाली. किती नावे घ्यावीत? पन्नास वर्षांतील मराठी चित्रपटाची बरी-वाईट वाटचाल एका छोट्या लेखात मांडणे केवळ अशक्य. या प्रयत्नात काही उल्लेख राहून जाणे स्वाभाविक आहे. ते बिनमहत्त्वाचे मानले असा त्याचा अर्थ होत नाही. पण एकूण जे चित्र दिसते आहे ते याच प्रकारचे आहे.

**- अशोक राणे**

इ-मेल : ashma52@yahoo.com



व्यवस्थापन शास्त्रामधला
भारतीय प्रयोग

# सुरवंटाचे फुलपाखरू

**डॉ. लक्ष्मण नारायण गोडबोले**

मूल्य १२० रुपये । सवलतीत ७० रुपये
घरपोच ९० रुपये

# कवितेचं पान

## अफगाणिस्तानानंतर इराक

झाकोळले आभाळ
अवघा निनादला किनारा
विस्तीर्ण क्षितिजापलीकडे
युद्धभग्न शहरावर
विमानांचा सक्त पहारा.
बुब्बुळे लोंबली
झाल्या डोळ्यांच्या खाचा
खोबणीतून मस्तकात जाई
पांढराफटक अंधार.
रक्तामांसाचा खच
हृदयद्रावक किंकाळ्या
विमानांच्या डरकाळ्या
सुरुंगाच्या आरोळ्या
अमेरिकन सैनिकाचा बायोडाटा
अफगाणिस्तानंतर इराक...

तिला घाई आहे रॅंपवर जाण्याची
आजची संध्याकाळ युद्धपोशाखात मिरवण्याची.
एकापाठोपाठ एक मॉडेलांचे रॅंपवर थिरकणे
कॅटवॉक करीत युद्धपोशाख सजविणे.
भाजलेल्या मांसाचा गंध आभाळभर पसरलाय.
वाहून वाहून त्याला वारादेखील शिसारलाय.
घुसमट वाढलीय तिची
कॅटवॉक, युद्धपोशाख, गंध, पेंगुळलेले प्रेक्षक
नि त्यांचा तोच तो प्रतिसाद.
अमेरिकन सैनिकाचा बायोडाटा
अफगाणिस्तानानंतर इराक
अफगाणिस्तानानंतर इराक...

**– डॉ. संजय अपरांती**
जलगर्जन, राजभवन,
मलबार हिल, वाळकेश्वर रोड,
मुंबई – ४०० ०३५

## माणसांच्या कलेवरांवर...

माणसांच्या कत्तलीचे
माणसांचे कारखाने
शूरवीरासारखे
मिरविती ते गौरवाने

बोलणाऱ्याच्या घरावर
शूळ घेऊन धावलेले
लाजही वाटू नये
एवढे निर्ढावलेले

रक्षणासाठी तयांच्या
सज्ज त्यांचा पक्ष आहे
सिंहासनाच्या अश्वमेधी
माणूस त्यांचे भक्ष्य आहे

माणसांच्या कलेवरांवर
राज्य करण्याची तयारी
अर्थ उरतो काय मग
कोण जिंकी, कोण हारी?

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**
कृष्णकुंज,
खरे टाऊन, धरमपेठ,
नागपूर – ४४० ०१०

# ‘मला सतत नवीन आव्हानं हवीत!’

❖ **डॉ. श्री ठाणेदार**

मुलाखत : सुनील कर्णिक

‘ही ‘श्री’ची इच्छा !’ हे श्री ठाणेदारांचं आत्मचरित्र सध्या चर्चेत आहे. अवघ्या चार वर्षांत त्याच्या पंचवीस आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत आणि लाखावर वाचकांनी ते वाचलं आहे. एका नव्या लेखकाच्या पहिल्याच पुस्तकाला एवढं यश कसं मिळालं? आता मागे वळून पाहताना ठाणेदारांना काय वाटतं? या पुस्तकानिमित्तानं त्यांच्याशी साधलेला संवाद–

*अवघ्या चार वर्षांत पंचवीस आवृत्त्या! मराठी प्रकाशन व्यवसायात हे यश अद्‌भुत आहे. ते तुम्ही कसं जमवलंत?*

मुळात मी हे पुस्तक लिहायला घेतलं तेव्हा ते ‘बेस्ट सेलर’ होईल असं वाटलं नव्हतं. आपले अनुभव स्वतःसाठीच नोंदवून ठेवावेत अशा विचारानं त्याची सुरुवात झाली. मला माझ्या आतल्या दुःखाचा निचरा करायचा होता आणि ते इतरांनाही सांगायचं होतं. म्हणून मी माझ्या पहिल्या पत्नीच्या आत्महत्येपासून सुरुवात केली. अशा प्रसंगात नवऱ्यावर ठपका ठेवला जातो, पण मला काही लपवायचं नव्हतं. माझ्या मनात अपराधाची भावना नव्हती. मी सगळं सरळपणे सांगितलं आणि त्याचा योग्य परिणाम झाला. माझी मुलं, इतर नातेवाईक यांना वस्तुस्थिती समजली. आता तो विषय निघाला तरी डोळ्यांतून पाणी येत नाही.

या पुस्तकातल्या सर्व आठवणी मी पारदर्शकपणे, प्रामाणिकपणे सांगितल्या आहेत. माझी फजिती जशी सांगितली आहे तसं यशही सांगितलं आहे. पण यात बढाई मारण्याचा उद्देश नाही. मी कोणी जेफर्सन नाही, बिल क्लिंटन नाही की महात्मा गांधी नाही हे मला ठाऊक आहे. त्यामुळे मी पुस्तक आटोपशीर केलं. आपण मित्राला जशा आठवणी सांगू तसं साधं निवेदन केलं. आपण संकटात असताना जी झुंज देतो ती धडपड आयुष्यात महत्त्वाची असते. ते जसंच्या तसं लोकांपुढे ठेवलं तर एक प्रकारे उपयोगाचं ठरेल असं मला वाटलं आणि वाचकांनी माझ्या अपेक्षेपेक्षाही मोठा प्रतिसाद दिला. गेल्या चार वर्षांत या पुस्तकाच्या एक लाख प्रती संपल्या आहेत. अनेक वाचकांनी मला असं कळवलं आहे की ‘मी जेव्हा निराश होतो तेव्हा तुमचं पुस्तक वाचतो.’




**डॉ. श्री ठाणेदार**

*पुस्तकाच्या या भरघोस यशात तुमचा स्वतःचा वाटा किती, तुमच्या मूळ प्रकाशकांचा किती? आणि तुमच्या मार्केटिंग स्ट्रॅटेजीला तुम्ही या यशाचं किती श्रेय द्याल?*

मला असं वाटतं की या यशाचं मुख्य श्रेय पुस्तकामधल्या जीवनकहाणीला आणि ती ज्या प्रामाणिकपणे सांगितली आहे त्याला द्यावं लागेल.

अर्थात, त्यात मार्केटिंगचाही वाटा आहे. मराठी माणसाला वाटतं की ‘मार्केटिंग’ हा वाईट शब्द आहे. पण मी एक उद्योजक आहे आणि माझं उत्पादन पूर्ण सक्षमतेनं ग्राहकापर्यंत नेणं हे माझं काम आहे. आता उत्पादनच चांगलं नसेल तर फार काळ तुम्ही वाचकाला ‘गिऱ्हाईक’




One Stop Banking Solution for
NRIs
CANADA
UNITED STATES
BRAZIL
Benefits of NRI Banking with Saraswat Bank
• Cheque Book mailing facility (on request)
• Any Branch banking
• Portfolio Investment Scheme and Demat Account for NRIs
• Life Insurance facilities in co-ordination with HDFC Life Insurance
• Remittance facilities
• Advisory services for Mutual Funds and Insurance.
• Visa International debit cum ATM card - usable at over 2461 ATM centers (Member of BANCs network)
• Utility Bill payment facility
Savings Accounts
NRO Savings Account
If you are an Indian resident outside India, you can open and operate NRO account for bonafide transactions in Rupees on account of money originating in India. Indian Tax laws are applicable. Repatriation up to USD 1 million per financial year for bonafide reasons subject to certain formalities.
NRE Savings Account
Non-resident Indians can open this account. NRI can hold and maintain foreign earnings in Indian Rupees. Funds held in this account are fully repatriable and enjoys tax benefits in India.
Term Deposit Accounts
- NRO Deposit Account
- NRE Deposit Account
FCNR Deposit Account
Invest in 5 major foreign currencies and enjoy fully repatriable interest benefit. Interest earned is free from Income Tax
Portfolio Investment Service (PIS)
Under portfolio investment service (PIS) you can invest in securities of Indian Companies through secondary market on Repatriable and Non Repatraible basis.
Remittances
You can send money to your near and dear ones using our Remittance facilities.
SWIFT
Our bank is a member of SWIFT, which is a highly secure and fast means of remitting your funds across the globe
Tie-up with Correspondent Banks
We have tie up with Banks across the world to facilitate quick remittances.
Asia's No.1 Urban Co-operative Bank
Saraswat Bank
0% Net NPA Bank
The Saraswat Co-operative Bank Ltd. (A Scheduled Bank)
Corporate Office: Mittal Court, 'A' Wing, 1st Floor, Vidhan Bhavan Marg, Nariman Point, Mumbai 400021. Tel.: 24671134/35/36/37/38
Please Contact: Customer Service Centre: Dial: 022 - 26464013 / 26464019 / 26464022
visit us at www.saraswatbank.com

करू शकणार नाही हे उघड आहे. चार वर्षांनंतरही या पुस्तकाला चांगली मागणी आहे, त्यावरून त्याचा कस चांगला असावा असं म्हणायला हरकत नाही.

*अलीकडे अनेक भारतीय तरुण अमेरिकेत जातात आणि कर्तबगारी गाजवतात. परंतु त्यांच्यापैकी कोणालाही आत्मचरित्र लिहावसं वाटत नाही. तुम्हाला स्वतःविषयी पुस्तक का लिहावसं वाटलं?*

याचं मूळ माझ्या बालपणात असावं. आमच्या बेळगावात एक सरकारी ग्रंथालय होतं. ते संध्याकाळी पाच ते रात्री दहा या वेळात उघडं असायचं. तो सर्व वेळ मी त्या ग्रंथालयात घालवायचो. दुर्गा भागवत, वि.स.खांडेकर, ना.सी.फडके, रणजीत देसाई, जयवंत दळवी, ग.वा.बेहेरे हे माझे आवडते लेखक होते. तुम्हाला जेव्हा वाचनाची एवढी आवड असते तेव्हा कधी ना कधी, काही ना काही लिहून पाहावसं वाटतं, यातूनच नकळत हे पुस्तक आकाराला आलं असावं.



*एक असामान्य उद्योजक म्हणून तुमचा गौरव भारताच्या पंतप्रधानांनी केला आहे आणि अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनीही केला आहे. या अफाट यशामागचं नेमकं गुपित काय?*

माझ्यापेक्षा मोठे उद्योजक अनेक आहेत. मी काही बिल गेट्स किंवा अंबानी नाही. पण माझं धाडस, माझा आत्मविश्वास यांतून मिळालेलं हे यश आहे.

मी जरा वेगळा विचार करतो. माझ्याकडे पैसे किती येतात यावर मी माझं यश मोजत नाही. माझ्याकडे मोकळा वेळ किती आहे आणि त्याचा आनंद मला मनासारखा घेता येतो की नाही यात माझं यश सामावलेलं आहे. गेले बारा दिवस मी भारतात आहे आणि अमेरिकेतल्या माझ्या कचेऱ्यांमधून मला एकही फोन आलेला नाही. इथे मी नव्या पुस्तकाच्या लेखनाचा विचार करतोय, चित्रपट-निर्मितीचा विचार करतोय. या माझ्या आनंदाचा मला अभिमान आहे.

*उद्योगधंद्यामध्ये नवे धोके पत्करावे लागतात आणि ते पेलवले नाहीत तर माणूस संपून जातो. तुम्ही अमेरिकेत 'केमिर' कंपनी विकत घेण्यासाठी डोक्यावर मोठ्या कर्जाचा बोजा घेतलात आणि एकदम वेगळ्या उंचीवर गेलात. तुम्हाला अपयशाची भीती वाटली नाही का?*

नाही वाटली. मी कधीही 'ब्लाइंड रिस्क' घेत नाही. त्यापूर्वी मी अनेक अंगांनी विचार करतो आणि मग 'कॅल्क्युलेटेड रिस्क' घेतो. पाणी कुठे मुरतंय हे मला चांगलं ठाऊक असतं. पण अनेकदा, कंपनी ताब्यात घेतल्यानंतर दीर्घकाळ मी तिथे फिरकतही नाही.

पहिली कंपनी विकत घेण्याचा विचार मी माझ्या सासूबाईंना फोनवरून कळवला तेव्हा त्या एकदम गप्प झाल्या. पण मी अयशस्वी होऊ शकत नाही याची मला खात्री होती.

पुढे मी आठ कंपन्या विकत घेतल्या त्यांतली एक कंपनी अपयशी ठरली खरी, पण त्यामुळे माझ्यावर फार विपरीत परिणाम झाला नाही. अखेरीस कुठलीही गोष्ट शंभर टक्के 'फुल प्रूफ' नसतेच. तरीही आधी होमवर्क करणं आवश्यक असतं .

*तुमच्या आयुष्यात अचानक प्रचंड संकटं उभी ठाकली-उदाहरणार्थ, तुमच्या पहिल्या पत्नीची आत्महत्या. तसंच तुम्हाला भव्य यशाचाही लाभ झाला. अशा दोन्ही टोकांच्या प्रसंगी तुम्हाला कुटुंबीय, स्नेही, सहकारी, अशा कोणाचीच फारशी साथ मिळालेली दिसत नाही. तरी तुम्ही या सर्व अग्निदिव्यातून तावून-सुलाखून बाहेर पडलात. तुमच्यामधलं हे विलक्षण रसायन आयुष्यभर कसं टिकून राहिलं?*

माझ्या संकटांच्या वेळी माझ्या कुटुंबानं मला फार मोठी साथ दिली. माझ्या आईनं वयाच्या सत्तरीत अमेरिकेत येऊन मला आधार दिला, तो मी कधी विसरणार नाही. माझ्या बहिणी, मित्र, सहकारी यांचीही मदत झाली. अशा बिकट परिस्थितीतच खऱ्या आप्तेष्टांची परीक्षा होत असते असं म्हणतात, ते काही खोटं नाही.

*तुमच्या पहिल्या पत्नीची आत्महत्या ही तुमच्या सर्वांत जिव्हारी लागलेली घटना आहे. पण पुस्तकात तिच्या मृत्यूचं गूढ कायम राहतं आणि तुमच्या निवेदनातून वाचकांना पुरेसं*

*समाधान मिळत नाही. ही अधुरी कहाणी तुम्ही आता विस्तारानं सांगाल का?*

मला ते करायचं आहे. खरं तर, 'तिची गोष्ट' नावाचं एक पुस्तक मी लिहिलंही आहे. मला ती जशी दिसली तशी शब्दांत टिपली आहे. प्रत्येक प्रकरणाचं नाव आहे 'श्री' किंवा 'श्यामल'. त्यात आम्ही आपापलं मनोगत व्यक्त करतो आहोत अशी कल्पना केलेली आहे. तिची वेडी-वाकडी पत्रंही दिली आहेत. आता यातूनही काही नवे प्रश्न निर्माण होतील, पण मला त्याची चिंता नाही.

पत्नीच्या मृत्यूनंतर मी मानसिक आजारांविषयी बरंच जाणून घेतलं, वाचन केलं. डॉ.आनंद नाडकर्णींनाही भेटलो. आत्महत्येविषयी मी एक कादंबरीही लिहिली आहे.

*पहिल्या पुस्तकात तुमची चार रूपं आम्हाला दिसतात. तुम्ही बेळगावकर आहात आणि तुमचा अर्धा जीव बेळगावमध्ये गुंतलेला आहे. त्याचप्रमाणे तुम्ही कुटुंबप्रमुख आहात, शास्त्रज्ञ आहात आणि आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवलेले उद्योजकही आहात. पण या सगळ्यांचं मिळून एकजीव झालेलं जे श्रीनिवास ठाणेदार नावाचं व्यक्तिमत्त्व आहे ते नेमकं कसं आहे?*

माझ्या मते, आयुष्य म्हणजे वेगवेगळ्या अनुभवांचं कोलाज आहे. आपण वेगवेगळे अनुभव घेत असतो. मला आनंद मिळतो तो या नवनवीन अनुभवांचा. एवढा बँकबॅलन्स जमला, एवढ्या गाड्या घेतल्या, ठीक आहे... आता पुढे काय? व्हॉट नेक्स्ट! नेहमी स्वप्नं रंगवायची आणि ती साकार करायची. मग आणखी स्वप्नं...जो आनंद आहे तो या अनुभवांचा आनंद आहे. आयुष्य खूप थोडं आहे. अनुभव जेवढे घेता येतील तेवढं आयुष्य समृद्ध होईल. लाईफ इज जस्ट अ कलेक्शन ऑफ एक्स्पिरिअन्सेस. पैशांनी ते मोजता येत नाही.

*तुम्ही बऱ्याच वर्षांपूर्वी बेळगावातून बाहेर पाऊल ठेवलंत आणि मग अधिकाधिक यशस्वी होत पुन्हा पुन्हा बेळगावकडे येत राहिलात. तेव्हा बेळगावानं तुमचं स्वागत कसं केलं?*

माझं बेळगाव म्हणजे माझं कुटुंब, माझे मित्र आणि माझी शाळा. त्यांना माझा खूप अभिमान आहे आणि काही बाबतीत मी पूर्वीसारखाच आहे. आमच्या घराचा तो माळा, जिथे मी स्वतःसाठी छोटीशी जागा केली होती. तिथे मी आजही रमतो. माझ्याशी बोलताना या सर्वांचं नातं बदललं नाही, कारण मी बदललो नाही. माझं यश आमच्या आड येत नाही. हे मला खूप महत्त्वाचं वाटतं.

*वैज्ञानिक उद्योजक म्हणून तुम्ही मोठं नाव कमावलंत. या बाबतीत भारतीय व अमेरिकन वैज्ञानिकांकडून तुम्हाला कोणत्या प्रतिक्रिया मिळाल्या?*

त्यांच्याकडून असा अभिप्राय व्यक्त होत असतो की विज्ञान उच्च दर्जाचं असतं आणि उद्योगधंदा हलक्या प्रतीचा असतो, तेव्हा वैज्ञानिकानं त्या वाटेला न गेलेलं बरं. मात्र मला तसं वाटत नाही. शिवाय, डॉ.नारळीकर, डॉ.माशेलकर यांच्यासारख्यांनी प्रत्यक्ष भेटीत माझं मनापासून अभिनंदन केलेलं आहे हेही मी विसरू शकत नाही.

*उद्योग-व्यवसायाची कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना तुम्ही मोठी कर्तबगारी गाजवलीत. आता तुमच्या सान्निध्यात लहानाची मोठी झालेली तुमची मुलं त्यांनी निवडलेल्या क्षेत्रात मोठी झेप घेतील अशी चिन्हं दिसताहेत का?*

नक्कीच. माझ्या मुलांमध्ये माझी धडपड नसेल तर माझ्या यशानं मी त्यांना कमकुवत केलं असा अर्थ होईल. सुदैवानं, माझ्या दोन्ही मुलांमध्ये ती धडपड आहे.

मी जेव्हा जगातली सर्वांत महागडी 'रोल्स रॉइस' गाडी घेतली तेव्हा मुलानं मला सांगितलं की ती गाडी घेऊन तुम्ही आमच्या शाळेत येऊ नका. ते मला फार बोलकं वाटलं. वडिलांचे पैसे त्यांनी गृहीत धरलेले नाहीत.

माझ्या धाकट्या मुलानं एकदा मला विचारलं. की, 'बाबा, आपण श्रीमंत आहोत का? माझ्या शाळेतली मुलं तसं बोलतात.' तेव्हा मी त्याला म्हटलं की, ''तुझे वडील श्रीमंत आहेत, तू श्रीमंत नाहीस. तुला तुझी श्रीमंती अजून मिळवायचीय.''

तेव्हा त्यांना स्वतःला यश मिळवायचंय, माझ्यापेक्षाही चांगलं काम करायचंय, अशा नम्र वृत्तीनंच माझी मुलं वागत असतात.

*आजवरचं तुमचं आयुष्य तुमच्या व्यक्तिगत हितासाठी होतं. आता मात्र तुम्ही सामाजिक कामात लक्ष घालायचं ठरवलं आहे. या कामाचं नेमकं स्वरूप कसं असेल?*

*(पान वर)*

# जोगवा

❖ अशोक राणे

मनात रानात गेलं गं
पानापानात गेलं गं
मन चिंचेच्या झाडात
आंब्याच्या पाडात गेलं गं...

सुली (मुक्ता बर्वे) मुक्तपणे रानभर उंडारत गात असते. तिचं षोडषवर्षीय वय, त्या वयाची निरागसता, सारी बंधनं झुगारून देऊन मुक्तपणे मनातलं गाणं गाण्याची तारुण्यसुलभ अनावर ओढ तिच्या मनसोक्त बागडण्यात ओसंडून वाहत असते. सुली, ते रान आणि तिचं ते रानभर गेलेलं गाणं आपल्याला काहीतरी वेगळं पाहायला मिळणार याचा विश्वास देत गुंतवत नेतं. खरं तर, हे गुंतवणं त्याआधीच सुरू झालेलं असतं. पहिल्या दृश्यापासूनच...!

रांडपुनवेच्या विधीला जोगतिणी आणि जोगते जमलेले. मुख्य विधी बांगड्या वाढवणं, बांगड्यांचे तुकडे चितेत टाकणं आणि आक्रोश करणं. हे सारं यथासांग चाललेलं. कसल्या कसल्या अनाकलनीय, कालबाह्य रुढीपरंपरेत अडकलेला अशिक्षित खेडवळ समाज... त्यांच्या एकूण जगण्याचा झालेला गुंता... आणि मग दिसतं आडवं पसरलेलं, अक्राळविक्राळ वाढत गेलेलं झाड आणि त्याच्या अवतीभवती वाढलेली इतर झाडं. एकमेकांना विळखा घातल्यासारखी. गुंता निर्माण केल्यासारखी. 'जोगवा'मधली ही फ्रेम नजरेत भरते. त्यावर उमटवणारी शीर्षकं पाहतानाही ते सारं नजरेत भरत राहतं. काहीतरी सुचवत राहतं. दिसतं त्याच्या अल्याडपल्याडचं दाखवत राहतं. कॅमेरा इज अ कॉंजीटो ऑफ सिनेमा, या विधानाची प्रचिती देतं. याचा अर्थ असा की कॅमेरा केवळ एखादी वस्तू किंवा व्यक्ती दाखवत नाही तर ती वस्तू किंवा व्यक्ती तिच्या साऱ्या संदर्भांसकट दाखवतो. इंटरप्रिट करायला लावतो. इथे दिसणारी ही झाडं स्पष्टपणे मनाशी कसल्यातरी विळख्याची, गुंत्याची आठवण करून देतात. अर्थबोध होत जातो. एका भयानक रुढी-परंपरेच्या विळख्यात सापडलेला आणि आजच्या आधुनिक जगातही त्यांच्या जगण्याचा न सुटलेला गुंता, असं सारं उलगडत जातं. विषयाचा परिचय आणि त्यातलं गांभीर्य नेमकं या दृश्यातून दृगोचर होतं. आणि यानंतर दिसते ती रानावनात मनःपूत बागडणारी सुली...! ती तिच्या जगात छान खुललेली...बहरलेली...! आणि मग छान डवरून आलेलं लोभसवाणं फूल कुणीतरी निर्दयपणे खुडावं आणि पायदळी तुडवावं तसं रुढी, परंपरांनी वेढलेला समाज आता कुठे फुलू पाहणाऱ्या निरागस, निष्पाप सुलीचं करून टाकतो. निमित्त होतं केसात आढळलेली एक जट. मुलींच्या केसात जट व्हायचं कारण तसं साधं आहे. पाण्याची प्रचंड टंचाई असलेला हा सारा प्रदेश. दिवसच्या दिवस आंघोळ नाही. केस धुणं नाही. केसाला तेल नाही. त्याची कसलीच निगा नाही. परिणामी, होणारच नं जटा! पण तेवढा विचार सुचतोय कुणाला? त्यात जट येणं म्हणजे यल्लमाआईची पोरीवर नजर गेल्याची समजूत. कुणी थोडंसं धाडस करून, केसावर पाणी टाकून जटा सुट्या करायच्या म्हटलं की रुढीप्रिय समाजात केवढा हाहाकार आणि अमूकतमूकानं जटेला हात लावण्याचा प्रयत्न केला तर त्याचं असं वाटोळं झालं अन् तसं वाटोळं झाल्याचे घाबरवून टाकणारे असंख्य दाखले. अंधश्रध्देचा पगडाच असा भन्नाट असतो की शिकली-सवरली माणसंदेखील त्यातून सुटू शकत नाहीत. ही तर खेड्यापाड्यात राहणारी साधीभोळी, अडाणी, अशिक्षित माणसं! सुलीची आई बायजा (विद्या करंजीकर) त्यातलीच एक. ती तडक शेवंता जोगतिणीच्या (प्रिया बेर्डे) कानावर हे घालते. तिच्याकडे उत्तर तयारच असतं... यल्लमाआईचं प्रसाद आहे...यल्लमाआईचं बोलावणं आहे...

सुलीचा बाप सुभाना (प्रमोद पवार) विरोध करण्याचा प्रयत्न करतो, परंतु जट आली म्हणजे मुलीला यल्लमाच्या


Supreme Puts In Its Very Best Effort To Achieve Its
Of Impeccable Quality & Undisputed
Excellence. It Is Truly From Such Efforts That
Our Credentials Of Leadership Have Sprung.
Industrial Moulded Products
Cross Laminated Films
Plastic Piping Systems
Moulded Furniture
Packaging Films
Material Handling Products

स्वाधीन करायचं, जोगतीण करायचं हा समज समाजात इतका दृढ आणि खोलवर पसरलेला, की सुभान्याचा विरोध हाणून पाडला जातो. त्याची बायको, सुलीची आईदेखील त्यात सामील झालेली असते. सुलीला काही ठरवण्याचा अधिकारच नसतो. तिला यल्लमादेवीला सोडण्याचा विधीवत कार्यक्रम सुरू होतो...

...याचवेळी तायप्पा (उपेंद्र लिमये) या तरुणालाही जोगत्या केलं जातं. त्याच्या लघवीतून रक्त जात असतं. डॉक्टरी उपाय करून देखील त्याच्या प्रकृतीत सुधार होत नाही. म्हणून मग एकच उपाय...त्याला यल्लमादेवीच्या पायावर घाला. जोगत्या करा. त्याच्या धुमसत्या मनाची, त्याच्या असहाय प्रतिकाराची पर्वा न करता.

सुली जोगतीण होते आणी तायप्पा जोगत्या. आणि मग सुरू होते त्यांच्या जगण्याची इतर अनेकांप्रमाणे एक अपरिहार्य परवड... फरफट...! सुली आणि तायप्पाला हे नको असतं. आतून कुठूनतरी त्यांनी ते नाकारलेलं असतं. परंतु रुढीप्रिय समाजानं ते त्यांच्यावर लादलेलं असतं. ते जोखड या दोन निष्पाप जीवांना मानेवर घ्यावंच लागतं. पिढ्यान्‌पिढ्या असंच ते असंख्यानी भोगलं. तेच आपलं भागधेय म्हणून स्वीकारलं...आणि अवघं जगणं नासवलं. एकविसाव्या शतकात सुली आणि तायप्पा त्याच नरकाच्या दिशेनं निघालेत...या साऱ्या जुलमाविषयीचा त्यांच्या मनातला लुळापांगळा नकार तसाच शिदोरीसारखा सोबत घेऊन...

बालपणापासून जिच्याबरोबर सुली रानावनात यथेच्छ बागडली होती त्या सुलीच्या मैत्रिणीचं लग्न ठरलेलं असतं. सुलीच्याही लग्नाचा विषय घरी निघालेला असतो आणि त्यात ही जट आड येते. सगळं होत्याचं नव्हतं होऊन जातं. लग्नात नवरीच्या रूपातल्या मैत्रिणीला पाहताना कातर झालेली सुली पाहताना 'पाथेर पांचाली'तील अशाच प्रसंगातील दुर्गा आठवते आणि अधिक कालवाकालव होते.

सुली आणि तायप्पानं एकीकडे अचानकपणे बदललेलं वास्तव कसंबसं स्वीकारलंय, परंतु त्यांच्या मनातला तो लुळापांगळा नकार त्यांना इतर अनेक जोगतिणी आणि जोगत्यांसारखा पूर्णतः रुढीशरण होऊ देत नाही. ती ठसठस कुठेतरी त्यांच्यातल्या निरागसपणाला, निष्पाप मनाला जागं ठेवत असते. आणि म्हणूनच जोगत्या म्हणजे गावातल्या




उनाड, वाह्यात पोरांना मौज मारायची गोष्ट वाटते तेव्हा साडीतला तायप्पा त्याच्या मूळच्या पुरुषी स्वभावानुसार त्यांच्या अंगावर जसा धावून जातो तसाच तो सुलीला पाहिल्या क्षणापासून तिच्याकडे तारुण्यसुलभ ओढीनं आकर्षित होतो. चोरट्या नजरेनं तिला पाहत राहतो. त्याच्या नजरेत तिच्याविषयीचं विशेष आकर्षण असतं. विशेष काही वाटणं असतं. परंतु साडीतल्या जोगत्याच्या आड कोंबलेल्या त्याच्यातल्या तरुणाला एरवीच्या सहजपणे सुलीकडे आपल्या भावना व्यक्त करता येत नाहीत. सुलीला मात्र त्याच्याबद्दल तसं वाटत नाही, कारण तिच्या लेखी तो जोगत्या असतो. साडीचोळीत त्याच्यातला झाकलेला पुरुष तिला कसा दिसणार...? इतर जोगतिणी, तसाच तोही एक जोगत्या! ती आकर्षित होते मेळ्याच्या मालकाबरोबर-राजूबरोबर(दीपक करंजीकर) असणाऱ्या तरण्या, फिल्मी हिरोसारख्या दिसणाऱ्या आण्णूकडे (प्रशांत पाटील), ती त्याच्या चक्क प्रेमातच पडते. त्याला भेटते. संधी मिळेल तेव्हा त्याच्याबरोबर भटकते. तो मात्र या सगळ्यात त्याला हवा तसा तिचा वापर

*(पान वर)*

*With Best Compliments From*

# G D Mundra

## Goldenlife Financial Services Pvt Ltd

125 Mittal Court B wing,
Nariman Point, Mumbai 400 021.
Phone : 22880080 / 22881180 I Fax : 22826680

*(पान वरून)*

करून घेतो. जोगतिणी म्हणजे कुणीही यावं आणि मौज मारून जावं या न्यायानं तिचा फायदा घेतो. सुली मात्र पहिल्या प्रेमाच्या निरागसपणात पार हरवलेली. हरखून गेलेली. तायप्पा हे सारं दुरून पाहत राहतो. आपल्या मनातलं मनातच ठेवून व्यथित होत राहतो. यातलं कारुण्य नेमकं अधोरेखित केलं जातं.

एक दिवस व्हायचं तेच होतं. आण्णू तिला सर्वांसमोर बेधडक नाकारतो. ती त्याला त्यांच्या प्रेमाची आठवण करून देते. दिवस गेल्याचं सांगते. तो तरीही बधत नाही. ज्या समाजानं आणि रुढीनं सुलीच्या वाट्याला हे जोगतिणीचं जिणं दिलं त्याच समाजानं, रुढीनं जोगतिणी म्हणजे कामांध पुरुषांसाठी केलेली सोय अशीच समजूत करून दिलेली. जणू हीदेखील एक रुढीच. आण्णू पळून जातो. सुलीवर तिच्या इच्छेविरुद्ध पुन्हा बळजबरी केली जाते. तिचा गर्भपात केला जातो. ती उद्ध्वस्त होते. अवतीभवतीच्या जोगतिणी तिच्यावर तोंडसुख घेतात. तिची आई देखील तिला समजून घेत नाही. तिच्यावर तिच्या नकळत मुकं प्रेम करणारा तायप्पा तिच्या सोबतीला येतो. एकाकी, असहाय सुली तायप्पाला जाऊन बिलगते. दोन समदुखी जीव आता एकत्र येतात. प्रेमाराधन सुरू होतं...आणि मग नवीनच वादळं निर्माण होतात...

'जोगवा'मध्ये जोगतिणी आणि जोगते यांच्या पिढ्यान् पिढ्यांच्या दुर्दैवी जगण्याची कथा सांगण्यात आली आहे. कथा सांगण्यात आली आहे म्हणण्यापेक्षा एका सामाजिक वास्तवाचा सखोल दस्ताऐवज मांडण्यात आला आहे. तोच मांडायचा आहे परंतु तो एका प्रवाही कथनातून सांगण्यात आला आहे. याआधी जोगतिणींवर काही चित्रपट आलेत. परंतु 'जोगवा'मध्ये दिग्दर्शक राजीव पाटील यांनी अस्वस्थ करणारं हे वास्तव प्रेमकथेतून आपल्यासमोर ठेवलं आहे आणि तेही अतिशय प्रभावीपणे आणि एक आगळी परिणामकारकता साधत. प्रेमकथा आणि तीही चित्रपटाच्या माध्यमातली म्हटलं की तिचे काही आडाखे ठरलेले आहेत. काहीशी हूरहूर लावणारी असली तरी मुळात ती गोडधोड असावी, प्रसन्न असावी. 'लैला-मजनू','हीर-रांझा','शिरीन-



**मुक्ता बर्वे आणि उपेंद्र लिमये**

फरहाद' यांसारख्या अजरामर प्रेमकथांमध्ये दोन प्रेमव्याकुळ जीवांची ताटातूट असा सारा गाभा आहे. इथे तसलं काही नाही. एका आदीम कारुण्याशी नातं सांगणारी कथा आहे. सुली आणि तायप्पा त्याअर्थानं प्रेमपात्रं नव्हेत. ती दोघंही एका अपरिहार्यतेचे बळी आहेत. तायप्पाला प्रथमपासून तिच्याबद्दलचं जे वाटणं आहे ते जितकं स्वाभाविकपणे एका तरुणाचं आहे त्याहून अधिक ते त्याला नाकारण्यात आलेल्या पुरुषीपणातून आलेलं आहे आणि ते सारं फारच करुण आहे. जन्मदाती आई, रुढीच्या विळख्यात अडकलेला भोवतालचा समाज आणि कुटुंब म्हणून लाभलेल्या अवतीभवतीच्या जोगतिणी आणि जोगते यांच्याकडून केवळ अवहेलना, जीवाचा आकांत करणारा कोंडमारा पदरात पडलेल्या सुलीचं तायप्पाच्या कुशीत शिरणं तितकंच करुण आहे. हे सारं चित्रपटात इतक्या परिणामकारपणे आणण्याचं राजीव पाटील यांचं दिग्दर्शकीय कौशल्य जितकं स्तुतीस पात्र आहे तितकंच ते पटकथा-संवाद लेखक-गीतकार संजय पाटील यांचं लेखनदेखील कौतुकास्पद आहे. या दोघांइतकाच यातला वाटा कलाकारांचा आहे. संजय जाधव या छायात्रिकाराचा आहे. संकलक राजेश राव यांचा आहे. संगतीकार अजय-अतुल यांचा आहे. एकूण टीमचा आहे.

पटकथा उत्तम जमलेली असली, मूळ कथेतील साऱ्या व्यक्तिरेखा त्यांच्या तमाम संदर्भांसकट, अंगभूत नाट्यासह आल्या असल्या आणि दिग्दर्शक जर त्यापुढे जाऊन ती

पटकथा इंटरप्रिट करण्याच्या क्षमतेचा असेल तर किती उत्तम चित्रपट निर्माण होऊ शकतो, त्याचं 'जोगवा' हे अलिकडचं एक चांगलं उदाहरण आहे. उत्तम जमलेली पटकथा, ज्याला 'ऑथर बेक्ड कॅरेक्टर्स' म्हणतात त्या निर्माण करतात आणि अशी कॅरेक्टर जर गुणी, समजदार, संवेदनाशील कलावंतांच्या वाट्याला आली तर चित्रपटाची परिणामकारकता इतकी वाढते की आपण चित्रपट पाहतोय याचं भान सुटतं आणि डोळ्यांसमोर खरंखुरं जग उलगडतंय असं वाटतं. मुक्ता बर्वे आणि उपेंद्र लिमये या दोघांनी आपापल्या प्रमुख भूमिका इतक्या बारकाईनं आणि संवेदनशीलतेनं रेखाटल्या आहेत की त्यांचं कौतुक करावं तेवढं थोडंच. राष्ट्रीय पुरस्कारात बाजी मारू शकतील अशी अपवादात्मक पातळीवर मराठी चित्रपटात घडणारी कामगिरी या दोघांनी केली आहे. मनातलं सारं काही नेमकं डोळ्यांतून व्यक्त करण्याचं दोघांचं कसब अफाट आहे. मुक्ता आणि उपेंद्र यांच्याइतकंच कौतुक सर्व लहानमोठ्या भूमिका करणाऱ्या कलावंतांचं करायला हवं. विशेषतः अदिती देशपांडे, किशोर कदम, विनय आपटे, प्रिया बेर्डे, प्रमोद पवार, विद्या करंजीकर, शर्वणी पिल्ले, दीपक करंजीकर, अमिता खोपकर यांचं!

'जोगवा'साठी डॉ राजन गवस यांच्या 'चौंडकं' आणि 'भंडारभोग' या कादंबऱ्या आणि चारुता सागर यांची 'दर्शन'ही कथा असा भरभक्कम आधार घेतला आहे. एरवी एकाच लेखकाच्या कलाकृतीवरून पटकथा-संवाद लिहिताना पटकथाकाराला आपलं सारं कसब पणाला लावावं लागतं. मूळ कथेचा आशय, गाभा घ्यायचा, त्यातले प्रसंग घ्यायचे, व्यक्तिरेखा घ्यायच्या, सामाजिक-राजकीय-आर्थिक-सांस्कृतिक पर्यावरण घ्यायचं, नाट्य घ्यायचं आणि या सर्व ऐवजातूनच मूळ कथेशी नातं राखत चित्रपटाची कथा निर्माण करायची आणि मग ती पटकथेत बांधायची हे साधंसुधं काम नाही. आणि इथे 'जोगवा'त संजय पाटील यांनी दोन लेखकांच्या तीन भिन्न साहित्यकृती घेऊन एक सर्वसमावेशक कथा आकाराला आणली आणि त्याची तितकीच दमदार, अतिशय प्रवाही पटकथा तयार केली. मुख्य म्हणजे, त्यांनी यातलं कारुण्य ज्या ताकदीनं हेरलं आणि पटकथेत आणलं त्याला तोड नाही. ते आणताना एका सहजतेनं आणि त्याहीपेक्षा तरलपणे आणणं हे त्यांचं कसब विशेष वाखाणण्याजोगं आहे. यमन्याची (किशोर कदम) व्यक्तिरेखा प्रचंड अस्वस्थ करते. जोगत्यांचं भागधेय त्यांच्या तोंडून अतिशय मोजक्या शब्दात प्रभावीपणे व्यक्त केलंय. यमन्या जेव्हा जोगत्या म्हणून झालेली आपली आयुष्यभराची परवड तायप्पाला सांगतो तेव्हा अखेरीस अतिशय उद्विग्नपणे म्हणतो,

''तायप्पा, पुरुषपालखीचे भोई रं आपन...''

आणि हे 'कित्ती छान डायलॉग' म्हणून येत नाही तर एका फार मोठ्या भीषण सामाजिक वास्तवाचा भाग म्हणून येतं. आणि त्याचबरोबर यमन्याचं हे वाक्य कथाशय गहिरा करत जातं, तायप्पाला, जो प्रमुख व्यक्तिरेखा आहे त्याला त्याच्या मनात चाललेल्या घुसमटीतून बाहेर काढण्याची प्रेरणा देत जातं. परिणामी, कथा प्रवाही होत जाते, अतिशय सहजपणे, तितक्याच तरलपणे.

हेच घडतं सुलीच्या बाबतीत, जेव्हा फुला गळफास लावून घेते. तिच्याशी संबंध ठेवणारा गावातला तरुण जेव्हा कबूल करूनदेखील फुलाशी झुलवा लावण्याचं (जोगतिणीशी लग्न करणं) नाकारतो तेव्हा फुलाला दुसरा मार्गच राहत नाही. याप्रकारानं सुली अंतर्मुख होते. बळजबरीनं लादलेल्या जोगतिणीच्या जगण्याविषयीचा मनात एका कोपऱ्यात कायम राहिलेला नकार फुलाची शोकांतिका पाहून मान वर काढतो आणि सुली बंडखोरीची वाट पत्करते. हे सारं एका ओघात आणणं, इतर व्यक्तिरेखांच्या क्रिया-प्रतिक्रियांतून मूळ व्यक्तिरेखेला पर्यायानं बळ देणं, आणि कथनातलं प्रवाहीपण अबाधित ठेवणं हे पटकथाकाराचं मुख्य कसब असतं. त्याचा प्रत्यय जागोजाग येतो. आणि ही अशी उत्तम पटकथा लिहून घेणाऱ्या दिग्दर्शकाचं भाष्य, संकल्पना याचीही छाप तिच्यावर स्पष्टपणे दिसून येते. दोघांचे ही सूर छान जुळून आलेत. वर म्हटल्याप्रमाणे दिग्दर्शक राजीव पाटील पटकथेबरहुकूम चित्रित करत जात नाहीत तर त्यापलीकडे जाऊन ती इंटरप्रिट करण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच त्यांच्या चित्रचौकटी अर्थपूर्ण होतात. समोर जे घडतंय ते पाहताना सुली आणि तायप्पाचं व्याकुळ होत जाणं, कातर होत जाणं प्रभावीपणे दिसतं. त्यासाठी निवडलेले अँगल्स, कॉम्पोझिशन्स कमालीच्या बोलक्या होऊन जातात. कुठलाही माणूस हा संदर्भांशिवाय असूच शकत नाही. त्याचं त्याच्या

भोवतालासकट असणं हे देखील दिग्दर्शक अतिशय जाणीवपूर्वक आणि जाणतेपणानं दाखवतो. प्रत्येक लहानमोठ्या प्रसंगात त्या त्या व्यक्तिरेखांचा वावर दाखवताना घर, घरातला अंतर्भाग, रस्ते, गाव, परिसर, माळरान हे सारं, माणूस आणि त्याचा भोवताल हे कसं एकमेकाला पूरक आहे या पध्दतीनं दाखवलं आहे. दिग्दर्शकाला याकामी छायाचित्रकार संजय जाधव यांची फार हुकुमी साथ लाभलेली आहे. या दोघांचं आणखी एका गोष्टीसाठी खास कौतुक करावसं वाटतं ते म्हणजे त्यांनी केलेला जिमी झीम या चित्रिकरणातील यंत्रसामुग्रीचा अतिशय सर्जनशील वापर! फार क्वचित घडणारी ही गोष्ट आहे. कुठल्याही दिशेनं हवी तशी फिरवता येऊ शकेल अशा या एकप्रकारच्या क्रेनचा-जिमी झीमचा वापर या साऱ्या अस्वस्थ करणाऱ्या कथेतील विविध रूपांतलं अवकाश चित्रित करण्यासाठी कल्पकतेनं केला आहे.



मुक्ता बर्वे

कथाशय अस्वस्थ करणारा, प्रसंगी हादरवून टाकणारा आणि तरीही कुणीही हे सामाजिक वास्तव नजरेआड करू नये, अंतर्मुख व्हावं या अपेक्षेनं केलेल्या या चित्रपटाची मांडणी आवश्यक तेवढी रंजकही करण्याचा प्रयत्न आहे आणि त्यात काहीही वावगं नाही. परंतु या प्रक्रियेत कथाशय पातळ होणार नाही याचीही नेमकी काळजी दिग्दर्शक राजीव पाटील यांनी घेतली आहे. चित्रपटात चार गाणी आहेत. पैकी आरंभी उल्लेख केलेलं 'मन रानात गेलं ग, पानापानात गेलं गं' हे नायिकेच्या आणि एकूणच जगणातल्या निरागसतेला व्यक्त करतं.' ह्यो लल्लाटी भंडार दूर लोटून दे अंधार' हे जोगतिणीच्या मेळ्यातलं नाचाचं गाणं आहे. ते छान जमलंय, 'रिकामी सांजची घागर, हरिणीच्या दारात वाघारं' हे गाणं सुली आणि तायप्पा यांच्या अवघ्या जगण्याला वेधून राहिलेल्या कारुण्याचं आहे. आणि इथून पुढे जेव्हा सुली आणि तायबा प्रेमात पडतात तेव्हा येतं, 'जीव दंगला, गुंगला, रंगला असा' हे प्रेमगीत! ही सारी गाणी लिहिली आहेत संजय पाटील यांनी. त्यांच्यातला कवी या गाण्यातून डोकावतो परंतु या गाण्यांवर स्वार होत नाही. त्यामुळे चित्रपटातली गाणी म्हणून जे एक मूल्य आहे आणि जे अंतिमतः कथेतील एखादा कंगोरा अधोरेखित करण्यासाठी, एकूणच कथा पुढे नेण्यासाठी वापरलं जातं, त्या जातकुळीतील ही गाणी आहेत. आजचे आघाडीचे संगीतकार अजय-अतुल यांनी ती केवळ सुश्राव्य चालीतच बांधली नाहीत तर चित्रपटाच्या एकूण प्रकृतीत मिसळून जातील याप्रकारे स्वरबध्द केली आहेत. गाण्याचं चित्रिकरण हे एकूणच भारतीय चित्रपटाचं खास चर्चिलं गेलेलं प्रकरण आहे. 'जोगवा' त्या कसोटीवर नक्कीच उतरलेला आहे.

'जोगवा'ची आणखी बरीच वैशिष्ट्यं सांगण्यासारखी आहेत. एका वाक्यात सांगायचं तर हा चित्रपट खऱ्या अर्थानं दिग्दर्शक म्हणून राजीव पाटील यांचा आहे. चित्रपट हे दिग्दर्शकाचं माध्यम आहे याची उत्तम प्रचिती देणारा हा चित्रपट आहे. दिग्दर्शक म्हणून राजीव पाटील यांची समज चित्रपटागणिक वाढताना दिसते आहे. आशय आणि आविष्कार यांची अतिशय प्रभावी सांगड घालणं त्यांना छान जमलं आहे. टीममधील एकूणएका घटकाकडून आपल्या संकल्पनेतला चित्रपट साकारून घेणं हे त्यांना उत्तम साधलं आहे.

**- अशोक राणे**
ए/१०१, सहनिवास,
सी.डी. देशमुख उद्यानामागे,
मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१
इ-मेल : ashma52@yahoo.com

(पान ३४ वरून)

*ठरवलं आहे. या कामाचं नेमकं स्वरूप कसं असेल?*

नुकतंच आम्ही ''ठाणेदार फाउंडेशन'' सुरू केलं आहे. त्याद्वारे महाराष्ट्रासाठी काम करणाऱ्या अभ्यासकांना दरवर्षी पाच लाख रुपयांपर्यंतची अभ्यासवृत्ती आम्ही देणार आहोत. इतरही काही उपक्रम सुरू होतील.

*तुमच्या डोळ्यांपुढची आदर्श व्यक्ती कोण?*

सॅम पित्रोडा. नव्या भारताच्या उभारणीसाठी त्यांनी नॉलेज कमिशनसारखे जे भव्य उपक्रम सुरू केले आहेत ते मला फार महत्त्वाचे वाटतात. मला स्वतःला महाराष्ट्रासाठी त्यांच्यासारखं काम करता आलं तर धन्य वाटेल.

*तुमची आवडती आत्मचरित्रं कोणती?*

जनरल इलेक्ट्रिक कंपनीचे जॅक वेल्च यांचं आत्मचरित्र मला आवडलेलं आहे. सुनीताबाई देशपांडे यांचं 'आहे मनोहर तरी' हेही आवडतं आहे.

*मुंबईमधला मराठी माणूस इथल्या इतर समाजांपासून बाजूला पडल्यासारखा झाला आहे. दुसरीकडे महाराष्ट्राच्या इतर भागांमधल्या सर्वांची धाव मुंबई-पुण्याच्या पलीकडे सहसा जात नाही. असं का होत असावं?*

मला असं वाटतं, की मराठी माणसामध्ये काहीही आपल्यापुरतं पाहण्याची वृत्ती आहे, अल्पसंतुष्टता आहे आणि सुखासीनताही आहे. तो मोठी स्वप्नं रंगवत नाही आणि साकार करण्यासाठी झुंजत नाही. उंच झेप घेत नाही. खरं म्हणजे आयुष्यात स्ट्रगल कायम राहायला हवी. ती स्ट्रगल जाईल तेव्हा माझा आनंदच संपेल. आय वुईल नेव्हर 'अराईव्ह'. निवृत्त आयुष्य मी जगू शकणार नाही. मला सतत नवी आव्हानं हवीत. ही वृत्ती माझ्या यशानं मारली जाऊ नये याची काळजी मी घेतो. मराठी माणसानंही ही वृत्ती सोडू नये. त्यानं सुखासीन होऊ नये. अर्थात, आता नव्या पिढीची कर्तबगारी चांगली आहे. ते नवनवीन क्षेत्रांमध्ये दमदार वाटचाल करताहेत. त्या दृष्टीनं त्यांच्यामध्ये जुनं मराठीपण राहिलेलं नाही. त्यांना मला असं सुचवावसं वाटतं की, ''तुम्ही प्रत्येक यश अवश्य सेलिब्रेट करा, पण दुसऱ्या दिवशी डोळ्यांसमोर नवीन आव्हान ठेवा!''

**– सुनील कर्णिक**
smkarnik06@gmail.com

ग्रंथालीचे ताजे प्रकाशन

# टकिला टकाटक

## संपादन : **डॉ. भूषण केळकर**





''जगभर पसरलेल्या, काही परतून भारतात आलेल्या या मराठी सुजनांचं, मराठी व इंग्रजीतूनही जीवनानुभव, विचार वाचताना त्यांचं भौगोलिकच नव्हे तर अनुभवांचंपण वैविध्य आणि व्याप्ती जाणवत राहिली.

अमेरिका, कॅनडा, सिंगापूर याबरोबर मंगोलिया, सौदी अरेबिया, चिले, आईसलँड, उझबेकिस्तान अशाही देशांतून, उण्यापुऱ्या चाळीस देशांतील लेख वाचताना मराठी कर्तृत्वानं मन भरून आलं आणि वाटलंसुद्धा, की हे लेखन, हे जीवनानुभव महाराष्ट्रातील जगानं आणि जगातल्या महाराष्ट्रानं वाचायला हवेत. त्यातही विशेषत: तरुणवर्गानं!''

**– अविनाश धर्माधिकारी**

मूल्य ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये



# मराठी थिएटर

**- राजीव जोशी**

आजच्या रंगभूमीकडे वळण्याआधी, मुळात आपली रंगभूमी समृद्ध होती, उज्ज्वल परंपरेची पार्श्वभूमी होती हे 'सत्य' नजरेआड करता येणार नाही. संगीत रंगभूमीचा सुवर्णकाळ- जो समर्थ नाटककार राम गणेश गडकरी, देवल, खाडिलकर, किर्लोस्कर यांचा काळ होता. अनेक गायक-नटांनी-नाट्यपदांनी 'संगीत नाटकं' लोकप्रिय केली. संस्कृतप्रचुर मराठी, पौराणिक, सामाजिक विषय, नाट्यपदांची खैरात आणि भरजरी पोशाख, पडद्यांचे नेपथ्य या गोष्टींनी सजलेलं संगीत नाटक. वेळेचे बंधन नाही, वन्समोअरचा उत्साह, नटांची अमाप लोकप्रियता अशा घटकांमुळे कालचं नाटक बराच काळ प्रेक्षकवर्गावर मोहिनी टाकून होतं. मामा वरेरकर, देवल आणि खाडिलकरांच्या नाटकांतून ताजे विषय, सामाजिक समस्यांचं चित्रण होऊ लागलं. तेव्हा खऱ्या अर्थानं आपली पारंपरिक, करमणूकप्रधान संगीत नाटकं चाकोरीतून बाहेर पडली. कृष्ण-रुक्मिणी अशा पौराणिक पात्रांच्या, ऐकीव कथांमध्ये रमलेल्या प्रेक्षकाला हे 'नवं वळण' वेगळं वाटलं. ब्रिटिश आमदानीच्या विरोधात कीचकवध, रणदुंदुभीचे प्रयोग रंगले. महायुद्धांचे पडसाद आणि चित्रपटांच्या उगमामुळे नाट्य प्रेक्षकांच्या अभिरुचीवर भलाबुरा परिणाम होण्यास तेव्हाच सुरुवात झाली. समाजातील स्थित्यंतरं, कौटुंबिक पातळीवर होणारे बदल व राजकीय संक्रमणं अशा अनेक कारणांनी नाटकांवर परिणाम होऊ लागला. पाच अंकी, सहा-सात ताशी प्रयोग एकेकाळी रंगायचे, तेव्हा प्रेक्षकांना निवांत वेळ असायचा, फुरसतच फुरसत असायची. नवीन पिढीच्या प्रेक्षकांना नाट्यपदांच्या आतषबाजीपेक्षा, जुन्या पारंपरिक विषयांपेक्षा आपल्या वास्तव जीवनाला जवळचं कथानक आवडू लागलं आणि इथेच गद्य रंगभूमीचं दालन खुलं झालं.

गद्य नाटकाचं युग सुरू करण्याचं व ते पुढे चालू ठेवण्याचं कार्य गडकरी व अत्रे या दोन खंद्या नाटककारांनी केलं. संगीत नाटकांच्या प्रभावातून मुक्त होत, भाषेच्या सौंदर्याची, भरदार साहित्यिक संवादाची, कणखर विविधरंगी व्यक्तिरेखांची आणि नाट्यपूर्णतेची सांगड घालून गडकरी शैलीतील नाटकं उभी राहिली. 'एकच प्याला' आणि 'भावबंधन' ही दोन उदाहरणं नाटकाच्या अजरामरतेला कारणीभूत झालेली आहेत. गडकरीमास्तरांना गुरुस्थानी मानून आचार्य अत्रे यांनी नाट्यसृष्टीत आपला ठसा उमटवला. नाट्यरचनेत विदेशी नाटकांचा आदर्श ठेवत, विषयांच्या बाबतीत आपल्या समाजातील समस्या आणि व्यगांवर नेमकं बोट ठेवत त्यांनी वेगवेगळी नाटकं लिहिली. पत्रकार, शिक्षक

म्हणून त्यांनी जनमानसाची नाडी अचूक हेरली. 'चार्लीज आन्ट'वर आधारित 'मोरूची मावशी' या नाटकानं तर कहरच केला. प्रथम, पदार्पणात गाजलं आणि नंतर फार वर्षांनी सुयोगसारख्या संस्थेनं पुनरुज्जीवन केलं. तेही लोकांनी, बदललेल्या नव्या प्रेक्षक पिढीनं डोक्यावर घेतलं. पहिल्या वेळी खरं तर पुरुष नटानं स्त्री भूमिका साकारणं हे तितकंसं नवलाचं नव्हतं. कारण संगीत रंगभूमीनं कित्येक मातब्बर पुरुष कलावंतांच्या स्त्री भूमिका पाहिल्या होत्या, डोक्यावर घेतल्या होत्या. मी मंत्री झालो, उद्याचा संसार, भ्रमाचा भोपळा, साष्टांग नमस्कार, डॉक्टर ही अत्रे शैलीतील नाटकंही गाजली.

कानेटकरांच्या नाटकानं गद्य नाट्यरसिकांचा एक प्रेक्षकवर्ग तयार झाला. पाचअंकी संगीत नाटक पाहण्यापेक्षा तीन अंकी नाटक पाहणं हे प्रेक्षकांना वेळेच्या दृष्टीनं सोयीचं झालं. त्यामुळे संगीत रंगभूमीवरचं 'गंधर्वयुग' मावळलं, परंतु ते संपलं नाही. भालचंद्र पेंढारकर, शिलेदार दांपत्य, विद्याधर गोखले ह्यांनी व्यक्तीश: तर ललितकलादर्श, साहित्य संघ, महाराष्ट्र रंगभूमी, नाट्यसंपदा, गोवा हिंदू असोसिएशन-सारख्या नामांकित संस्थांनी संगीत नाटकाची परंपरा सकसपणे चालू ठेवली. गोखलेअण्णांनी नवे विषय घेऊन मंदारमाला, स्वरसम्राज्ञीसारखी नाटकं लिहिली. पुरुषोत्तम दारव्हेकरांच्या 'कट्यार काळजात घुसली'नं तर इतिहास घडवला. दुरितांचे तिमिर जावो, जय जय गौरीशंकर, मंदारमाला, मत्स्यगंधा, लावणी भुलली अभंगाला ही संगीत नाटकं वेगळ्या बाजामुळे प्रेक्षकप्रिय झाली. संगीत रंगभूमीचा प्रवाह चालू ठेवण्याचं काम अशा अनेक मंडळींनी केलं.

गडकरी-चिं.वि.जोशी यांनी तत्कालीन मध्यम-वर्गीयांच्या वागण्या-जगण्यातील विसंगतीवर नेमकं बोट ठेवलं होतं. तेच सूत्र पुढे गडकरी, अत्रे ह्यांनी वापरलं. पु.लं.देशपांडेंनी आपल्या लेखनात ह्याच मध्यमवर्गीयांच्या जगण्यावर टिप्पणी केली. बाळ कोल्हटकरांची वाहतो ही दुर्वांची जुडीसारख्या नाटकातून मध्यमवर्गीयांची संस्कारमूल्यं, भावनात्मक संघर्षह्यासंदर्भातले विषय हाताळले. कानेटकरांनी आर्थिक स्तर सुधारलेली कुटुंबं...प्राध्यापक, डॉक्टर अशा घटकांचे वैचारिक संघर्ष, मानसिक गुंतागुंतीवर भाष्य केलं. भेंडे-प्रभु दुक्कलीनं विदेशातील फार्स-निखळ विनोदाचा बाज घेतला. जयवंत दळवी ते प्रशांत दळवी या नाटकारांनी उच्च मध्यम वर्गाच्या, बदललेल्या समाजाचा वास्तवरीतीनं वेध घेतला. त्या पाठोपाठ कालेलकर, कलगुटकर या नाटककारांची प्रापंचिक नाटकं (दिवा जळू दे, सारी रात, कन्या ही सासुरासी जाय इ.) अपराध मीच केला वरील सत्यघटनेवरील नाटक. तात्यासाहेब शिरवाडकरांची- नटसम्राट, जयवंत दळवींची- संध्याछाया, बॅरिस्टर, कानेटकरांची- हिमालयाची सावली, प्रेमा तुझा रंग कसा? वेड्याचे घर उन्हात, अखेरचा सवाल, रायगडाला जेव्हा जाग येते, ही काही ठळक वैशिष्ट्यं असलेली नाटकं. मराठी नाटक हे एकेकाळी 'ताईभाऊ' छाप होतं, तो छाप पुसला गेला. सत्तर-ऐंशीच्या दशकात वृध्दत्व, बलात्कार, स्वार्थी वृत्ती, व्यक्तिप्रधान, महत्त्वाकांक्षा, करिअर, स्त्रियांचे बदलते भावविश्व, पौगंडावस्था, पालकत्व, चरित्रात्मक, आत्मचरित्रात्मक-अशी बहुरंगी नाटकं आली. सामाजिक-कौटुंबिक नाटकांच्या बरोबरीनं हिट अ‍ॅण्ड हॉट, फार्स, विनोदी, तमाशा प्रधान, रहस्यमय, दुर्बोध नाटकं आली. एकांकिका व स्पर्धामुळे नाटक भौगोलिक दृष्टीनं विस्तारलं गेलं व विदेशी कलाकृतींवर आधारित नाटकंदेखील आली. 'नाटक' नाटककाराहातून दिग्दर्शकांच्या हाती गेलं. इतर तंत्राला-सादरीकरणाला महत्त्व आलं.

### विजय तेंडुलकरांनी समृद्ध केली रंगभूमी

कानेटकरांच्या व्यावसायिक नाटकांतून वेगळे विषय, वेगळे प्रयोग चालू असताना विजय तेंडुलकरांची नाटकं येत राहिली. 'रंगायन'च्या कालखंडात त्यांनी रेडिओसाठी श्रुतिका, छोटी नाटकं लिहिली. त्यातूनच ते एकांकिका व पुढे पूर्ण नाटकांकडे वळले. नेहमीच्या विषयांकडे, व्यावसायिक ठोकताळ्यांचा आधार न घेता आपल्याला जे सांगायचं आहे, जे प्रश्न समोर दिसताहेत त्यांचं नाट्यरूप सादर करणं, तेही शद्बबंबाळ स्वरूपात नव्हे तर अल्प शब्दांत. तेंडुलकरांच्या आधीही अनेक नाटककार होऊन गेले, परंतु मोजके शब्द, व्हीजुअल्सचा वापर आणि दोन वाक्यांमधील गर्भितार्थाचा इतका समर्थ व समर्पक वापर. त्यांच्या श्रीमंत, माणूस नावाचे बेट, एक हट्टी मुलगी अशा अनेक नाटकांमध्ये ठसठशीतपणे प्रत्ययाला येतं. 'अशी पाखरे येती'मधल्या

शकूचा निरागसपणा, 'कन्यादान' नाटकातील जातीय व्यवस्थेचं दिसलेले परखड चित्रण, 'कमला'द्वारे स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन, 'गिधाडे'मधील कुटुंब, ऱ्हासाकडे जात असलेली कुटुंबव्यवस्था, हे सगळं व्यावसायिक असलं तरी त्यात कुठेही प्रेक्षकांचा अनुनय करण्यासाठी तडजोडी नाहीत. आपलं स्वत्व जपत त्यांनी आपले विचार प्रेक्षकांपर्यंत, समाजापर्यंत पोचवले.

त्यांच्या 'शांतता कोर्ट चालू आहे' या नाटकानं तर देशाच्या रंगभूमीच्या इतिहासात नवा विक्रम घडवला. खऱ्या अर्थानं 'आंतरराष्ट्रीय' म्हणता येईल असं हे नाटक.

'घाशीराम कोतवाल' नाटकानं रंगभूमीची परिभाषा बदलली. ऐतिहासिक व्यक्तिरेखेतील वास्तवता शोधून ती दृश्यपातळीवर समर्थपणे उभी राहिली. आपल्या प्रत्येक कलाकृतीमध्ये आशयानुरूप तंत्रबदल करणारे, दिग्दर्शकांसाठी तपशीलवार रंग सूचना लिहिणारे नाटककार म्हणून तेंडुलकरांचा उल्लेख करावा लागेल. मानवी स्वभावातील क्रौर्य, हिंसेचा शोध घेत असताना त्यांनी प्रेक्षकांना विचार करायला लावला. अंतर्मुख व्हायला लावलं. दिग्दर्शक, कलाकार आणि तंत्रज्ञानांना त्यांच्या संहितांनी खूप काही दिलं आहे एवढं मात्र नक्की!

कानेटकर युग चालू असताना जयवंत दळवी, शं.ना.नवरे असे साहित्यिक नाटकांकडे वळले. दळवींच्या कादंबऱ्यांवर आधारित नाटकांपाठोपाठ स्वतंत्र नाटकंही आली. त्यांच्या नाटकांनी सामाजिक प्रश्नांना हात घातला व पूर्वीच्या गद्य नाटकांपेक्षा वास्तववादी शैलीचा प्रभावी वापर केला. तो प्रेक्षकांना आवडला. विक्रम गोखले, नाना पाटेकर, निळू फुले, विजया मेहता, रीमा लागू, नीना कुळकर्णी अशा कलावंतांना दळवींच्या सशक्त व्यक्तिरेखांनी मोठं केलं. रत्नाकर मतकरी हे प्रायोगिक व बाल रंगभूमीशी जोडलं गेलेलं नाव. पण त्यांनीही व्यावसायिक रंगभूमीवर अनेक दमदार व लोकप्रिय नाटकं लिहिली व स्वत:ही दिग्दर्शित केली. दुभंग, चंपा गोवेकर, अश्वमेध, घर तिघांचं हवं आणि आजदेखील जादू तेरी नजर, चार दिवस प्रेमाचे ही तुफान यशस्वी नाटकं लिहिली आहेत.

'काचेचा चंद्र' नाटकापासून प्रकाशझोतात आलेले नाटककार सुरेख खरे त्यांचं कुणीतरी आहे तिथे? नाटक



बालगंधर्व





'नटसम्राट'मध्ये श्रीराम लागू आणि सुहास जोशी

'बॅरिस्टर'मध्ये सुहास जोशी, प्रदीप वेलणकर आणि विजया मेहता



*With Best Compliments From*




**Trupti Patil**

9822966366

Khaira Phatak - Near TIMA Hosp., Boisar, 401501,
Tal - Palghar, Dist - Thane

**Res.:** 15 B, Pratibha, Co-op Society,
Khairaphatak - Boisar

**24 HOUR SERVICE M.: 9823445296 I Ph.: 275090**

गाजलं. प्र.ल. मयेकर हे स्पर्धा गाजवणारे नाटककार. पण त्यांनी प्रभावी संवाद लेखनानं व्यावसायिक रंगभूमी गाजवली. अग्निपंख, पांडगो इलो रे इलो, रातराणी, दीपस्तंभ अशी दर्जेदार, विविध विषयांची नाटकं त्यांनी लिहिली.

कालच्या नाटककारांमध्ये फार्सिकल व रहस्य नाटकांचा वेध घेणारे सुरेश जयराम पिप्रोडिया (लफडा सदन, षडयंत्र, राहू-केतू, डब्बल गेम), प्रदीप दळवी (वासूची सासू, मी नथुराम गोडसे बोलतोय), शेखर ताम्हाणे (तू फक्त हो म्हण, सविता दामोदर परांजपे), दिलीप परदेशी (निष्पाप), संजय पावर (कोण म्हणतो टक्का दिला?) अनिल सोनार (मालकीण मालकीण दार उघड!) ह्यांची नाटकं गाजली.

नाटककारांमध्ये महेश एलकुंचवार हे एकताकदीचे नाटककार वाडा चिरेबंदी आणि अनेक नाटके, दीर्घांक, एकांकिका त्यांनी लिहिल्या. आई रिटायर होते, ज्वालामुखी अशी गाजलेली नाटकं लिहिणारे, विनोदी व समस्याप्रधान नाटक ताकदीनं हाताळणारे नाटककार-अशोक पाटोळे. 'श्यामची मम्मी'सारखं आजच्या शिक्षण पद्धतीवरचं उपहासात्मक नाटक लिहीत आहेत. अजित दळवी, प्रशांत दळवी या नाटककार बंधूंनी प्रायोगिक व व्यावसायिक रंगभूमीवर वेगळे विषय, लेखनातही वेगळ्या पद्धतीनं आणलेले आहेत. प्रा. अजित दळवींचं 'गांधी विरुद्ध गांधी' आणि प्रशांत दळवींची- ध्यानीमनी, चारचौघी, सेलीब्रेशन ही 'लॅण्डमार्क' ठरलेली नाटकं म्हणता येतील. प्रायोगिक रंगभूमीवरील प्रेमानंद गज्वींनी तनमाजोरी व किरवंतयांसारखी नाटकं व्यावसायिक रंगभूमीवर केली आणि व्यावसायिक नाटकांच्या चाकोरीला 'छेद' दिला. आभिराम भडकमकरांचं- ज्याचा त्याचा प्रश्न हे नाटक त्यांच्यातील सशक्त नाटककाराची साक्ष देतं. सतीश आळेकर, शफाअतखान या प्रायोगिक रंगभूमीशी संबंधित असलेल्या नाट्यप्रशिक्षक नाटककारांची- दुसरा सामना आणि शोभायात्रा, राहिलं दूर घर माझे ही नाटकं व्यावसायिक रंगभूमीवर वेगळेपणानं उठून दिसली.

**प्रायोगिक रंगभूमीचं योगदान**

मराठी रंगभूमी ही सतत प्रयोगशील, विकसनशील राहिलेली आहे. अनंत काणेकर, माधव मनोहर, शं.ना. नवरे अशा नाटककारांनी पाश्चात्य रंगभूमीवरील कलाकृती मराठीत आणल्या. तेथील प्रायोगिक चळवळींचे पडसाद आपल्याकडे उमटू लागले. भवन्सच्या स्पर्धा, रंगायन या टप्प्यांवर त्याकाळचे प्रायोगिकवाले एकत्र आले आणि त्यांनी नवनाट्य, प्रायोगिक नाटकांचा शोध घ्यायला सुरुवात केली. आधी विदेश संहिता, मग आपल्या लेखकांच्या नवीन संहिता स्टेज होऊ लागल्या. विजय तेंडुलकर, रत्नाकर मतकरी, दामू केंकरे, विजया मेहता, आत्माराम भेंडे अशा नाटकवेड्या मंडळींनी वेगळ्या रंगभूमीचा ध्यास घेतला. कारण व्यावसायिक रंगभूमीवर जी काही ठरावीक छापाची नाटकं चालू होती त्यापेक्षा वेगळं करण्याचा प्रयत्न या रंगायनकर्मींचा होता.

कालांतरानं रंगायनची टीम विभागली गेली. 'आविष्कारा'ची स्थापना अरविंद देशपांडे, अरुण काकडे व विजय तेंडुलकर ह्यांनी केली. विजया मेहतांनी अजब न्याय वर्तुळाचा, तर अरविंद देशपांडेंनी 'तुघलक' ही नाटकं केली. अमोल पालेकरांनी अच्युत वझेंचं 'चल रे भोपळ्या' केले. रत्नाकर मतकरींनी बालनाट्याच्या बरोबरीनं प्रेमकहाणी, आरण्यक अशी प्रायोगिक नाटकं सादर केली. दुसऱ्या बाजूनं निनाद, अमृत नाट्य भारती, गॉसीप ग्रुप (विजय बोंद्रेंचा), रेखा सबनीस, पंडित सत्यदेव दुबे, अमरीश पुरी, ह्यांचं हिंदी थिएटर, पुण्यात आधी पीडीए नंतर थिएटर अॅकॅडमी, कोल्हापुरात देवल गायन समाज, डॉ. शरद भुथाडिया यांची प्रत्यय संस्था, कणकवलीतील आचरेकर प्रतिष्ठान, नाशिकमधील प्रभाकर पाटणकर, मनोहर शहाणेंची नाटकं, सांगलीमधील संस्था व नाटककार दिलीप परदेशी, वाईचे प्रतीक थिएटर व नाटककार दिलीप जगताप, ठाण्यामध्ये अशोक साठे व कलासरगमचा ग्रुप तसेच मुंबईत अरुण होर्णेकर, दिलीप खांडेकर, अच्युत देशिंगकर, सुरेश वैद्य, उदय म्हैसकर, रवींद्र दिवेकर, रमेश चौधरी, राम मुंगी, बापू लिमये असे असंख्य रंगकर्मी झपाटल्याप्रमाणे प्रायोगिक तसेच राज्य नाट्यस्पर्धेतील नाटकं करत असत.

मुंबईमधील बँकांमध्ये कार्यरत असलेल्या कलावंतांसाठी मराठी व अन्य भाषेत एकांकिका स्पर्धा घेतल्या जायच्या. मुळातले कर्मचारी, तसेच पुढे 'कलाकार' म्हणून भरती केलेल्या कलावंतांनी ही स्पर्धा तर गाजवली, पण त्याबरोबरीनं प्रायोगिक चळवळ चालू ठेवण्यास हातभार लावला. डॉ. लागूंच्या रुपवेध संस्थेचं उद्ध्वस्त धर्मशाळा, तर पालेकरांचं अवध्य, वासनाकांड ही नाटकं गाजली.

आविष्कारने तेंडुलकरांची– पाहिजे जातीचे, शांतता कोर्ट चालू आहे अशी देशी, अस्सल या मातीतली नाटकं तर चांगुणासारखं विदेशी नाटक, डॉ. शंकर शेषांची पोस्टर्स अशी विविध शैली व समस्यांची नाटकं केली. मुळात छबिलदास थिएटर आजवरच्या परंपरागत नाट्यगृहांच्या व्यावसायिक रंग मंदिरांपेक्षा आटोपशीर, छोटं इंटीमेट थिएटर उभं राहिल्यानं अनेक प्रायोगिकवाल्यांना जणू हक्काचं घरच मिळालं. दादरची बहुरूप संस्थेतर्फे अमोल पालेकरांनी बादल सरकारचं 'जुलूस' नाटक केलं. पुण्याच्या डॉ. जब्बार पटेलांनी 'घाशीराम कोतवाल'मध्ये मानवी भिंत वापरल्यानंही समूहनाट्याची परंपरा सुरू झाली. ती अनेकांना संधी देणारी म्हणून पोषकच ठरली. पुढे कवायतींचा अतिरेक हा टिंगलीचा विषय ठरला ही गोष्ट वेगळी. पार्ल्यातील लोकमान्य सेवा संघ, पुढे गॉसिप ग्रुपतर्फे विजय बोंद्रेंनी 'मेन विदाउट शॅडोज' 'डेथऑफसे सेल्समन'सारखी विदेशी नवनाट्यं अनुवादित करून सादर केली. 'गोची' हे नाटक प्रा. सदानंद रेगे यांनी लिहिलं होतं. वसंत कामत, लक्ष्मण जोशी, रमेश रांगणेकर, राजा पारगावकर त्या काळातील प्रायोगिक नाटककार. शं.ना. नवरेंनी पाचोळा जळत नाहीये, ग्रॅण्ड रिडक्शन सेल अशी वेगळी रचना व आशय व्यक्त करणारी नाटकं, वृंदावन दंडवते, जया दडकर, चिं.त्र्यं. खानोलकर, अशोकजी परांजपे (अनुक्रमे कुलवृत्तांत, काय वाट्टेल ते, एक शून्य बाजीराव व अभक दुभक तिभक) अशी नाटकं आणली.

अन्य भारतीय भाषांतील नाटककारांमध्ये मोहन राकेश, बादल सरकार, आद्यरंगाचार्य कारंथ, गिरीश कर्नाड ह्यांची नाटके मराठी रंगमंचावर सादर झाली.


विजय तेंडुलकरांच्या पाठोपाठ गो.पु. देशपांडे, सतीश आळेकर, महेश अलकुंचवार, अच्युत वझे या प्रायोगिक नाटककारांनी आपल्या मातीतील समस्यांद्वारे आपल्यातील व्यक्तिरेखा निर्माण करून प्रायोगिक नाटकांचा प्रेक्षकवर्ग तयार केला.

प्रायोगिक चळवळीमध्ये परदेशी नाटककारांपैकी टेनेसी विल्यम्स, नील सायमन, हॅरॉल्ड पिन्टर, विल्यम सारोयान, सॅम्युअल बेकेट अशा अनेक आंतरराष्ट्रीय प्रायोगिक ढंगाच्या नाटककारांच्या कलाकृती सादर झाल्या.

मधल्या काळात ॲडगुरू भरत दाभोळकरांनी इंग्लिश–



'तो मी नव्हेच'मध्ये
प्रभाकर पणशीकर





'आगंतुक'मध्ये
आत्माराम भेंडे, कमलाकर सारंग आणि लालन सारंग



'गिधाडे'मध्ये विनय आपटे आणि अरुंधती राव

हिंग्लिश नाटकांचे प्रयोग केले. आता तर इंग्रजी मीडीयम मधून शालेय शिक्षण घेतलेल्यांची पिढी वाढलेली आहे. उद्याच्या नाटकाचा विचार करता अजून तरी आपण हिंग्लिश किंवा इंग्लिश (मराठी इंग्लिश) नाटकांच्या पर्यायांचा विचार केलेला नाही. अलीकडे पुण्याच्या ललित कला व मुंबईच्या थिएटर आर्ट्‌समधील नवे रंगकर्मी नव्या थिएटरचा शोध घेत आहेत. सचिन कुंडलकर, सतीश मनवरसारखे जरी सिनेमात गेले असले, तरीही त्यांची जनरेशन प्रॉमिसिंग आहे.

**प्रायोगिक व्यावसायिकांची प्रयोगशाळा व राज्यस्पर्धेचे महत्त्व**

मुंबई, पुणे आणि अन्य ठिकाणी प्रायोगिक नाटकं होऊ लागली खरी, पण करणार कुठे हा प्रश्न होता? मुंबईवाल्यांसाठी छबीलदास उभं राहिलं. साहित्यसंघाची गुरुवार योजना आली. पण बाहेरगावी अशी कुठे सोय होती? मुळात व्यावसायिक नाटकांच्यासाठी नाट्यगृह नाही, तिथे प्रायोगिकवाल्यांसाठी कोण नाट्यगृह देणार? शाळांचे रंगमंच, लग्नाचे हॉल, संस्थांचे हॉल असे पर्याय तितक्या सहजपणे उपलब्ध होण्यासारखे नव्हते. त्यामुळे खरं तर प्रायोगिक चळवळ फोफावू शकलीच नसती. राज्यनाट्यस्पर्धा महाराष्ट्र शासनातर्फे १९६० पासून घेतल्या जाणाऱ्या हौशी नाट्यस्पर्धेमुळे प्रायोगिक रंगभूमीवर काही करू पाहणाऱ्या संस्था व ऑफिसेससाठी राज्य स्पर्धेसाठी नाटक करणं ही एक सुसंधी झाली. कारण नाटक करायचं, तर नेमकं कुठे? त्याकरता किमान रंगमंच, प्रकाशयोजना ह्याची गरज, त्यासाठी लागणारा खर्च कुठून आणायचा? आधीच नाटक करण्यासाठी पैशांची चणचण असायची. अशावेळी राज्यस्पर्धेतील प्राथमिक फेरीसाठी किमानपक्षी शहरांमध्ये व्यावसायिक नाटकं जिथे होतात, अशा नाट्यगृहात 'प्रथम प्रयोग' करण्याची संधी तरी मिळाली. इतक्या चांगल्या ठिकाणी प्रयोग आणि स्पर्धेच्या सातत्यामुळे हमखास येणारा प्रेक्षक असा 'दुहेरी लाभ' ही प्रायोगिकवाल्यांसाठी पर्वणीच ठरली.

प्रायोगिकवाल्यांना संधी देणारं व्यासपीठ-रंगपीठ महाराष्ट्र सरकारच्या राज्य नाट्य स्पर्धेमुळे उपलब्ध झालं हा एक मोठा फायदा म्हणायला हवा. म्हणूनच राज्य स्पर्धेशिवाय प्रायोगिक चळवळीची आपण कल्पनाच करू शकत नाही. आपण १९७० ते १९८० मधल्या दशकाकडे वळून बघीतलं तरी याबाबत खात्री पटू शकते.

शांतता कोर्ट चालू आहे, महानिर्वाण, घाशीराम, चांगुणा, महापूर अशी अनेक नाटकं महाराष्ट्र राज्य हौशी नाट्यस्पर्धेतच सादर झाली होती. तिथे काही नाटकांवर अन्यायही झाला, निर्णय वादग्रस्त लागले, तरीही जी नाटकं गुणात्मक मूल्यांची व वेगळी होती ती पारितोषिकं न पटकावताही टिकली. इतकंच नव्हे तर प्रायोगिक रंगभूमी, एकूण भारतीय रंगभूमीसंदर्भात त्यातल्या अनेक नाटकांनी इतिहास निर्माण केला. त्याकाळी राज्य नाट्यस्पर्धा, प्राथमिक फेरी पाहण ही प्रेक्षकांसाठी एक कलात्मक, सृजनशील मेजवानी होती.

आंतरकॉलेज स्पर्धांमध्ये एकांकिका करणाऱ्यांना राज्यस्पर्धेतील नाटके ही मॉडेलप्रमाणे पाहायला मिळत होती. इन फॅक्ट, काही कॉलेज कलाकार आविष्कार, बहुरूपी, गॉसिप ग्रुप आणि उन्मेष या संस्थांच्या राज्य स्पर्धेच्या नाटकांतून भाग घेत राहिले. स्पर्धेतल्या नव्या नाटकाचा अनुभव घेण्याची सोय, ही किती मोलाची, शिकवणारी होती. (आज अशी संधी कमी आणि घेणारेही कमी झाले आहेत. कारण या स्टेपपेक्षा, थेट सिरीयल/सिनेमात जाणे सोपं झालंय!)

आंतरकॉलेज ते राज्यनाट्यस्पर्धा, नंतर राज्य स्पर्धेतून प्रायोगिक नाटक आणि मग व्यावसायिकची दारं उघडली जायची. कलाकार घडवणारी आणि प्रायोगिक, व्यावसायिक कलावंत-तंत्रज्ञ-लेखकांचा पुरवठा करणारी ही प्रोसेसच महत्त्वाची होती. 'बघणं, शिकणं, स्वत: करून अनुभवणं, पुढे जाणं' हा त्या पिढीला रंगमंचीय कलेत वाढण्याचा, विकसित होण्याचा मार्ग होता. तिथे शॉर्टकटला वाव नव्हता. हे करणं देखील आर्थिक दृष्टीनं, कौटुंबिक करिअर पातळीवर अवघड होते. या धडपडीला अर्थ होता, समाधान होतं. ती धावपळ केवळ व्यावसायिकतेकडे, सिनेमाकडे जाण्याची नव्हती. (टेलिव्हिजनचा तर प्रश्नच नव्हता, त्यामुळे रेडिओवरची संधीदेखील मोठी वाटायची!) व्यावसायिक नाटकांचे प्रयोग भरपूर होत होते, पण नाइटचं पाकीट साधारणच असायचं. त्यामुळे पैशांसाठी व्यावसायिक नाटक करणं दूरचंच होते. नोकरी मिळवून किंवा टिकवून आपली आवड (की खाज?) भागवण्यासाठी वेगळे प्रयत्न करणारी

*With Best Compliments From*

# WIDC ★ KIDC

## INDUSTRIAL LAND DEVELOPRS

# Kashinath Patil

Ex. President

Z. P. Thane

Avinash Apartment, Chandansar - Virar Road,
Chandansar, Talula - Vasai, Dist. Thane.

Tel.: 0250 - 2528880

पिढी होती. कदाचित म्हणूनच त्यांना नवे प्रयोग, नवे शोध घेण्याची ऊर्जा मिळाली असावी. भारंभार स्पर्धा ही नव्हत्या. राज्य स्पर्धेत मुंबईकरांच्या, भारत पेट्रोलियम, बीपीटी, बँका, सचिवालय जिमखाना, एअर इंडिया, बीएमसी अशा ऑफिसेसच्या कर्मचाऱ्यांची नाटकं, तसंच हौशी संस्थांपैकी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, लोकमान्य सेवा संघ, ब्राह्मण सभा, अमरहिंद मंडळ, क्षत्रिय समाज, सीकेपी समाज अशा हौशी संस्था आणि नव्या-जुन्या प्रायोगिक संस्था यांमध्ये नवनव्या प्रयोगांची चुरस असे. मग आणखी एखादा प्रयोग आळतेकर, कोल्हटकरांसारख्या नाट्यस्पर्धांमध्ये करणं हा एक बोनस असे. अधिक प्रयोग करायला छबिलदास उपलब्ध होतेच. अलवरा डाकू, पाहिजे जातीचे, जुलूस व अनेक नवीन नाटकांचे बऱ्यापैकी प्रयोग होऊ शकले. पुढे काही वर्षांनी व्यावसायिक रंगभूमी बदलू लागली. सुरुवातीला तर प्रायोगिकवाद्यांचा उपहास करणं, टीका करणं हा व्यावसायिक मंडळींचा 'छंद' होता. कमी प्रेक्षक किंवा प्रेक्षकांसाठी नाटक न करणारे! अशी संभावना केली जायची. मात्र त्यांच्यातील सातत्यानं, वेगळ्या प्रयोगांनी व गुणवत्तेनं त्यांची दखल घ्यावीच लागली. किती काळ प्रेक्षकांना एका छापाची नाटकं देत राहणार? प्रेक्षकांनी प्रायोगिक चळवळीकडे उदार मनाने बघितली. मुळात त्या काळात सामाजिक-राजकीय व साहित्यिक स्थित्यंतरं घडत होती. त्याचा परिणाम थिएटरवरही झाला. दामू केंकरे, विजया मेहता, दिलीप कोल्हटकरांकडे व्यावसायिक नाटकांचं दिग्दर्शन सोपवण्याची 'रिस्क' घेणारे गोवा हिंदू, कलावैभव या मातब्बर संस्थांची निर्माते म्हणून तर जास्वंदी, राव जोगदेव, अवध्यसारखी नाटकं कमर्शियलवर येऊ शकली! सुदैवानं, समीक्षक, वर्तमानपत्रं ह्यांनी नव प्रायोगिक चळवळीला प्रोत्साहन दिल्यानं, तिथली मंडळी मुख्य प्रवाहात सामील होण्याचं प्रमाण वाढलं व संकर सुकर होत गेलां.

पुढच्या काळात अनेक प्रायोगिक कलाकार व्यावसायिक रंगमंच, सिनेमा अशा महामार्गावर कार्यरत झाले. तिथे नाना, नीनासारखे यशस्वी आणि लोकप्रियही झाले.

**पुढचं वळण उताराचं!**

नंतर मात्र छबीलदास चळवळ भरकटली. तोच-तोपणा आला. 'स्टेपिंग स्टोन' म्हणून वापर होऊ लागला. प्रायोगिकच्या नावाखाली काहीतरी होऊ लागलं. मूळचे प्रायोगिक व्यावसायिकवर सेटल झाले. तरीदेखील अमोल पालेकर, डॉ. लागू, 'दिवाकरांच्या नाट्यछटा',' आत्मकथा', 'एक झुंज वाऱ्याशी', 'पगला घोडा'सारखे प्रयोग करत होते.

माणसांचं जीवन वेगवान होत होतं. मुंबईसारख्या ठिकाणी पूर्वीचं दादर-गिरगाव ओस पडून, लोक डोंबिवली, बदलापूर, अंबरनाथ आणि वसई-विरार अशा दूरदूरच्या ठिकाणी 'शिफ्ट' होत होते. पूर्वी कॉलेज व नोकरीला लागल्यावर हौसेनं प्रायोगिक करणारे आता संसारात/करिअरमध्ये अडकल्यानं आणि प्रायोगिकमध्ये करिअर नसल्यानं दूर गेले. ज्यांना हौस होती, करिअर होईल असं वाटलं ते तिथे व पुढे व्यावसायिक नाटकांत शिरले.

कॉलेज स्पर्धांचा जोर आणि जोम मात्र वर्षानुवर्षं तसाच राहिला. गेल्या दोन-तीन दशकांमध्ये त्यातलं चैतन्य, जादू वाढतच राहिली. 'उन्मेष'नं वीस-बावीस वर्षं उत्साहानं स्पर्धा चालवली. अनेक छोट्या संस्था उभ्या राहिल्या. मुंबई विद्यापीठाच्या 'युथ फेस्टिवल'नं कोकण-ठाणे जिल्हा पातळीवर आपली कार्यकक्षा नेली. पुण्याची पुरुषोत्तम करंडक आणि मुंबईची आयएनटी या खंद्या स्पर्धा मात्र काळाच्या प्रवाहात टिकून राहिल्या. आज प्रोफेशनलची शिडी आणि कॉलेजसह स्वत:ला चमकण्याची संधी म्हणून जरी बघितलं गेलं, तरीदेखील युवा पिढी ताजं, नवीन करते आहे. ह्यातूनच उद्याचं थिएटर, भावी प्रेक्षकपिढी घडणार आहे. मीडियात जाण्यासाठी का होईना ते आज थिएटर, एकांकिका करताहेत हेच महत्त्वाचं आहे. मार्क, ॲडमिशन, सीईटी/कॅट अशा रॅटरेसच्या जीवघेण्या सापळ्यात अडकण्याआधी क्रिएटीव्हीटीचे काही क्षण ऐंजॉय केले, तर ती पुंजी त्यांच्या पुढील वाटचालीत नक्कीच पूरक ठरेल. निदान प्रेक्षक तरी तयार होतील! नाहीतरी करिअरवाले, प्रोफेशनल्स प्रेझेंटेशन करतात हे सगळं स्किल आपलं थिएटर शिकवतंच की!

**आजची स्थिती!**

वर्तमानकाळातली रंगभूमीची स्थिती गंभीर आहे. वर्तमानपत्रांतून कितीही जाहिराती चमकल्या (खरं तर, जाहिरातदरही न परवडण्याजोगे झाले आहेत!) तरीही नवीन नाटकं येण्याची प्रोसेस ठप्प झालेली आहे. येत्या एप्रिल-

मे च्या मोसमात अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकी देखील नवी नाटकं आली नाहीत. आता गणपतीच्या सिझनसाठी काही प्रॉडक्शन्स झाली तर झाली! शासनानं नाट्यनिर्मात्यांना अनुदान दिल्यानं नाटके होताहेत, त्यातही काही फक्त अनुदानापुरते नाटक करताहेत. अनुदानानं काही निर्मात्यांना मदत मिळेल, पण मुळात नाट्यनिर्मितीचा खर्च, प्रत्येक प्रयोगाचा फिक्स्ड खर्च आणि जाहिरात खर्च हा डोईजड झालेला आहे. प्रेक्षकांनी पाठ फिरवलेली आहे. नाटकं चांगली येत नाहीत हे काही एकमेव कारण नाही. त्यामागे बदलतं समाजजीवन, करिअरचं टेन्शन, प्रवासाचा ताण, कौटुंबिक स्तरावर एकत्रित कुटुंब पद्धती नामशेष होत गेल्यानं मर्यादित कुटुंबांतील घटकांची वाढती जबाबदारी, मुलांचं प्रश्न, पती-पत्नीमधील ताण-तणाव, ठरावीक गोष्टींशिवाय जगू शकत नाही, या सगळ्या जगण्याच्या धडपडीत 'नाटक' ही आता 'मस्ट प्रायोरिटी' राहिलेली नाही.

अर्धा तास टीव्ही पुढे बसणं हीच एक परवडणारी, वेळेत जमणारी चैन झालेली आहे. तसं पाहिले तर दहा-पंधरा वर्षांपूर्वी टीव्ही प्रेक्षकांमध्ये कार्यक्रमांबाबत, कलावंतांबाबत जी आत्मीयता होती तीही तितकी उरलेली नाही. मराठी चॅनेल्स वाढले आहेत, त्यामुळे वेगळे ऑप्शन निर्माण झाले आहेत. प्रौढांचा ओढा मराठी कार्यक्रमांकडे, तर घरातील छोट्यांकडे 'रिमोट' गेलेला असल्यानं त्यांची हिंदीची किंवा एमटीव्हीधर्तीचे चॅनेल बघण्याची आवड. तरीही सारेगमप, असंभव, खवय्या अशा काही मोजक्या कार्यक्रमांत आजची पिढी इंटरेस्ट घेतं आहे. पन्नास वर्षांपूर्वीचं 'एका तळ्यात होते'सारखं सुरेख भावगीत कानावर पडून 'गोड' वाटतं आहे. त्यामुळे तरी आपल्या गाण्याची, कलेची व संस्कृतीची गोडी टिकेल.

**नाटकवाल्यांचा जमा-खर्च**

खर्च वाढलाय, लाइट परवडत नाही, जाहिरातीची बिले भारी पडताहेत, सेटलाईट साधा लावून चालत नाही, ट्रॉन्सपोर्ट कॉस्ट वाढलीय, नट मिळत नाहीत ही नाट्यनिर्मात्यांची कारणं जस्टीफाईंग असतात. पण प्रश्न जेव्हा नवेपणाचा, क्रिएटीव्हीटीचा येतो तेव्हा अनेकजण मुळमुळीत बोलतात. प्रेक्षकांना विनोदी नाटकच आवडतात! असं स्टँडर्ड वाक्य फेकून मोकळे होतात. नाववाले नट येत नाहीत, नाववाल्या नटांना बुकिंग नाही, एकदम नवखे घेतले तर बुकिंगची गॅरेंटी काय? असे प्रश्न-उपप्रश्न विचारले जातात. निर्मात्याची आवड, त्याचे ठोकताळे किंवा जबरदस्त हिट झालेल्या फॉर्म्युल्यावर बेतलेल्या नाटकाचाच आग्रह धरला जातो. प्रेक्षक बदललाय, त्यातील घटक बदलले आहेत. त्यांच्या आवडी-निवडी बदललेल्या आहेत हे लक्षात घेतले जात नाही. काहीजण घेतात, पण त्यानुसार बदलण्याची तयारी, कुवतही नसते. आपल्याला तरुणांसाठी-प्रौढांसाठी की सिनीयर सिटीझनसाठी 'नाटक' करायचे आहे असा काही निश्चित विचार किंवा धोरण नसतं. नाटक धंद्याचं हवं, बुकिंगचं हवं हा एकच हट्ट कम आग्रह असतो. हटके काही देण्याचा विचार सुरुवातीलाच मोडीत निघतो. बरं अनेकजण दुसऱ्या-तिसऱ्याचाच पैसा वापरत असतात. काळ्याचा 'पांढरा' करत असतात. तसे करताना पैसे हडप करणं, फायनान्सरला पूर्णपणे धुणं चालु असतं योग्य ठिकाणी, योग्य जागी खर्च केला जातोच असं नाही. नेमकं काय आवडेल? ह्याबाबत तसा रिसर्च होत नाही. मिथकची यंग टीम रिसर्च करतेय, पण त्यात किती निर्माते इंटरेस्ट घेणार? शेवटी एक महत्त्वाचं, नाटकाच्या नशिबात जे असतं, तेच होणार! असं म्हणणाऱ्यांपुढे कसला रिसर्च आणि कसला ॲनेलिसीस?

प्रेक्षकांना वेळ नाही, घरबसल्या खूप व्हरायटीबाज एंटरटेंमेंट होतं. असं असलं तरीही प्रेक्षक- कोणत्याही वेळी, आडवारी दुपारीसुद्धा 'मराठी बाणा'साठी दोनदा थिएटरवर चकरा मारतात. सही रे सही व त्याआधी ऑल द बेस्टनं घडवलेला इतिहास काही फार पूर्वीचा नाही. एकच किंवा मोजके प्रयोग लावल्यावरसुद्धा पंधरा-वीस वर्षांपूर्वीची महानिर्वाण बेगमबर्वे 'हाउसफुल' होतात. आताच्या तरुणांना नाटक कळत नाही, आमच्या वेळचे सॉलीड असायचे असं म्हणणाऱ्यांना ही आजच्या तरुणांची 'महापूर'सदृश गर्दी दिसत नाही का? जे अस्सल आहे, वेगळं आहे, ते बघण्याची ऊर्मी असलेले प्रेक्षक आहेत. ते संपलेले नाहीत. ह्याच भांडवलावर 'मराठी नाटक' आज-उद्या उभं राहील!

मराठी कलावंत मराठी व हिंदीत कामं करतात. सिरीअल व सिनेमासाठी भरपूर वेळ लागतो. डेट्स 'ॲडजस्ट' करणं

त्यांच्या हाती नसतं. नाटकासाठी वेळ 'कमिट' करणं शक्य होत नाही. या चक्रात बहुसंख्य कलाकार अडकतात. शिवाय नाटकांच्या जाहिरातींचा खर्च वाढतोच आहे. तो परवडत नाही, पण केल्याशिवाय पर्याय नाही. कारण लाखो वाचकांपर्यंत पोचायचं तर किमान पेपर ॲड हवीच. टीव्हीवरची ॲडतर आणखी कॉस्टली. (चॅनेलवाले 'हाउसफुल'सारख्या कार्यक्रमाद्वारे अशी माहिती देतात.) तरीही पेपर ॲड पर्याय नाही. तसेच नाटकाची प्रॉडक्शन कॉस्ट वाढलेली आहे. स्वस्त सेट, सामान्य दर्जाचं सादरीकरण केल्यावर ते प्रेक्षकांना कसं आवडेल? नाटकांची तुलना मराठी-हिंदी टीव्ही प्रोग्रॅमशी आणि सतत कुठे ना कुठे होणाऱ्या इव्हेंट्सशी होते, त्या तुलनेत नाटक 'चकाचक' दिसलं नाही, तर बघणार कोण?

नाटकात मोठे, नाववाले कलाकार हवेत- असं कांही नाही. मुळात नाटकात दम असावा, वेगळेपणा असावा. अनेकदा तेच-तेच सादर केले जाते. फायनल ड्राफ्ट, माकडाच्या हाती शॅम्पेन किंवा आदीपश्य अशा वेगळ्या निर्मितीला प्रतिसाद मिळतोच की!

सिनेमाच्या बाबतीत छोट्या-मल्टिप्लेक्सचा पर्याय खर्च वाचवायला सुटसुटीत वाटतो. तसे काही मार्ग काढता येतील का? मोठ्या नाट्यगृहांचा खर्च न परवडण्याजोगा, मग तिथेच 'नाटक' करण्याचा आग्रह का? मान्य आहे की सगळीच नाटके छोट्या थिएटरात करण्यासारखी नसतात. पण अगदीच तोट्यात जाऊन बंद करण्यापेक्षा छोट्या ठिकाणी पाच-दहा प्रयोग करायला काय हरकत आहे? 'फायनल ड्राफ्ट'नं आधी प्रायोगिकचा ऑप्शन स्वीकारला, मग व्यावसायिक स्तरावर-मोठ्या थिएटरात प्रयोग करण्याचं ठरवलं. असा लवचीकपणा बजेटवर मात करण्यासाठी शोधायला हवा.

सुरेश खरे, आनंद म्हसवेकर अशा नाटककार-दिग्दर्शकांनी छोट्या नाटकांचा-रंगमंचांविरहित, कमी नेपथ्य, प्रकाशयोजना नाही- अशा पद्धतीनं 'बजेट नाटक' करण्याचा प्रयोग केला. तो छानपैकी स्वीकारला जातोय. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आणि अमेरिकेच्या छोट्या शहरांत करण्याजोगं 'नाटक' ही आता गरज आहे. एकेकाळी जेव्हा वाहतूक सोयीसुविधा नव्हत्या, थिएटर ठीक नव्हती त्या काळात नाटक नेलं. तिथल्या प्रेक्षकांची 'नाटक-भूक' भागवली, हे कार्य किती महत्त्वाचं होतं. बदलत्या काळात-ट्रान्स्पोर्ट, कम्युनिकेशन स्मूथ झालंय, पण लोकांचा वेळ? लाईफ बिझी झालंय. आणि पूर्वी नाटकासारख्या जिवंत कलांची ओढ होती ती आता टीव्ही माध्यमानं करपून टाकली आहे. नाटक आता आपल्या आवडीचा, परंतु खर्चाचा घटक म्हणून उरलंय का? तरीही नाटक टिकायला हवं...सिरीयल, सिनेमा कलावंत, तंत्रज्ञ देण्याचं मोठं काम हौशी-प्रायोगिक व व्यावसायिकता नाटक करते आहे. ही सृजनात्मक शृंखला तुटायला, खंडित व्हायला नको.

खेळ, प्रेक्षक सहभाग व धंदा हे कॉम्बिनेशन क्रिकेटमध्ये झालेलं आहे, ते स्वीकारलं गेलं आहे. तसा आता दोन अंकी नाटकाला-दोन सशक्त-भिन्न बाजाच्या एकांकिकांचा ऑप्शन ट्राय आउट करायला काय हरकत आहे? दिलीप प्रभावळकरांची 'पोर्ट्रेट' किंवा विक्रम गोखलेंची 'नरिक्षीर' बघायला कोणाला आवडणार नाही? पण असे उपक्रम सुरू झाले तरच प्रतिसादाचं कळेल ना? गुजराथी-हिंदी आणि इंग्रजी रंगभूमी आता वीकएंड थिएटरपुरती उरलेली आहे. आपलं मराठी थिएटर अस्वस्थ असलं तरी टिकून आहे. मुंबई विद्यापीठ, थिएटर आर्ट्स व ललितकला केंद्र पुणे-ह्यांनी विविध महोत्सवांचं आयोजन करणं, आविष्कार, रवींद्र नाट्य मंदिरातील पु.ल.अकादमी,जिगीषाची उपनगर नाट्यचळवळ अशा अनेक प्रयत्नांनी तिला टिकवण्याचे प्रयत्न चालू आहेत. वैयक्तिक अभिनय, नाट्यछटा, एकांकिका व बालनाट्य- या घटकांनी रंगभूमीसंदर्भात सतत काहीतरी घडत आहे, घडत राहणारच. नव्यांना जुनं नको आहे म्हणता-म्हणता बाल-तरुण पिढी जुनी गाणी ताकदीनं म्हणते आहे. तसं काहीसं नाटकाचं होईल अशी आशा आहे. भविष्यकाळात गडकरी, अत्रे, शिरवाडकर-कानेटकरांचं नाटक नसेल कारण ते पेलणार...परवडणार नाही! परंतु आजच्या व उद्याच्या काळाला हवं असलेलं 'नाटक' टिकेल-एवढं नक्की!

---

**- राजीव जोशी**
rmjoshi52@yahoo.co.in

# मराठी संगीत सर्वाधिक समृद्ध

❖ अरुण दाते

शब्दांकन : ममता क्षेमकल्याणी


अभिजात शास्त्रीय संगीताचा स्पर्श मराठी संगीतावर ठायी ठायी जाणवतो. मराठी संगीत म्हणजे अभिजात शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, भावगीत, गझल , भक्तिगीत आणि लोकसंगीत, की ज्यामध्ये अभंग, भजन यांच्यापासून पोवाडा आणि लावणीपर्यंतच्या विविध प्रकारांचा समावेश होतो. संगीताचा इतका समृद्ध पट इतर भाषा आणि प्रांतात पाहायला मिळेल, असे काही वाटत नाही. संगीतक्षेत्रातली ही विविधता अगदी सुरुवातीपासूनची. ती आजही टिकून आहे. त्यामुळेच मराठी संगीत हे सर्वाधिक समृद्ध आहे, असे आणि असेच म्हणावे लागेल.

काही कला किंवा काही क्षेत्रे अशी असतात की त्यांच्या विकासामध्ये, समृद्धीमध्ये त्याला पूरक अशा कला आणि क्षेत्रांचा मोठा वाटा असतो. मराठी संगीताचा आपण विचार करतो त्यावेळी केवळ वाद्य, वाद्यवृंद, संगीतकार आणि गायक किंवा गायिका इतका मर्यादित विचार करून चालणार नाही. मराठी संगीताच्या एकूण जडणघडणीत त्या त्या काळातल्या सामाजिक आणि इतर परिस्थितीचा जो परिणाम झाला आहे तो आपल्यापर्यंत पोचवणारे माध्यम म्हणजे गीत, कविता, शब्द.

मराठी संगीताच्या जडणघडणीत या गीत आणि कवितांनी इतकी महत्त्वाची भूमिका बजावली आहे की, त्यामुळे मराठी संगीत अधिक परिपूर्ण झाले आहे. मराठी साहित्यक्षेत्राची, काव्यलेखन, गीतलेखनाची मराठी संगीताला जी साथ मिळाली आहे, तिला तोड नाही. अर्थपूर्ण आशयघन शब्द हे मराठी कवितेचे, गीताचे खास वैशिष्ट्य. त्याच्या आधाराने मराठी संगीताने खूप मोठी मजल मारली आहे. आपल्याकडच्या संगीतकारांनी आणि गायकांनीही मराठी भाषेतल्या शब्दांची, गीतांची ताकद ओळखून त्यांना संगीत दिले आहे. त्यामुळेच दर्जेदार संगीत असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा उत्कृष्ट शब्द, साजेसा संगीतसाज आणि स्वच्छ वाणीचा सूर असे समीकरण आपल्याला अपेक्षित असतं. या त्रिसूत्रीचं रसायन जुळून आले तर अशा संगीताकडे श्रोते आपोआप आकर्षित होतात, त्याकडे ओढले जातात आणि नेमकी हीच गोष्ट मराठी संगीताच्या बाबतीत झाली आहे.

आशयघन कविता लिहिणारे दिग्गज आपल्या महाराष्ट्रात आहेत आणि होते की ज्यांच्यामुळे 'गीतरामायणा'-सारख्या कलाकृती निर्माण झाल्या. प्रस्थापितांबरोबरच नवे गीतकार, संगीतकार आणि गायक पुढे आले आणि त्यांनी श्रोत्यांना खूप चांगले संगीत ऐकवले. ग.दि.माडगूळकर, शांताबाई शेळके, मंगेश पाडगावकर, ना.धों.महानोर, विठ्ठल वाघ अशा कितीतरी गीतकारांची नावे घेता येतील. यांपैकी कवी मंगेश पाडगावकरांची अनेक गीते मी गायली याचा मला नेहमीच आनंद वाटतो. ते मी माझे भाग्य समजतो. दर्जेदार काव्यलेखनाची मोठी परंपरा महाराष्ट्राला आहे. संत साहित्य आणि लोककला यांच्याशी कविता, गीते यांची नाळ आजही जोडलेली आहे.

कोणत्याही संगीतरचनेमध्ये 'संगीत' हा घटक शब्दां-इतकाच महत्त्वाचा असतो. मात्र नेमक्या कोणत्या शब्दांची









निवड आपल्या संगीतासाठी करावी याची जाण संगीतकाराला असेल तरच ते संगीत कालातीत होते. मराठीतल्या संगीतकारांचा विचार केला तर ते संगीताइतकेच शब्दप्रेमीही आहेत, हे आपल्या लक्षात येते. सुधीर फडके, यशवंत देव, श्रीनिवास खळे, हृदयनाथ मंगेशकर अशी कवितेची जाण असलेल्या संगीतकारांची खूप मोठी यादी आपल्याला सांगता येईल. मराठीमध्ये जे जे संगीतकार आणि गायक यशस्वी झाले त्याचे निरीक्षण केले तर चांगल्या शब्दांची, उत्तम कवितेची जाण हे त्यांच्यातले महत्त्वाचे वैशिष्ट्य पाहायला मिळते. आपण निवडलेल्या शब्दांना साजेसा संगीतसाज चढवून ते श्रोत्यांपर्यंत पोचवण्याचे काम संगीतकारांनी केले. अनेक उत्तम कविता चित्रपटांमध्ये वापरल्या गेल्या आणि त्यांनाही श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. गजाननराव वाटवे, सुधीर फडके, हृदयनाथ मंगेशकर, लता मंगेशकर, आशा भोसले या गायकांनी आपला वेगळा ठसा मराठी संगीतावर उमटवला. आशा खाडिलकर, अनुराधा मराठे, उत्तरा केळकर, सुरेश वाडकर, श्रीधर फडके यांनीही रसिकांना भुरळ घातली. नाट्यसंगीताचा विचार केला तर पंडित जितेंद्र अभिषेकी, वसंतराव देशपांडे, जयमाला आणि कीर्ती शिलेदार या मंडळींच्या योगदानाला तोड नाही.

यांपैकी अनेकांनी तर त्या त्या काळातल्या संगीताला दिशा देण्याचेच काम केले आहे. गजाननराव वाटवे यांचा उल्लेख 'भावगीताचे जनक' असा केला जातो. मराठीतला भावगीत हा असा संगीतप्रकार आहे की, अनेक दिग्गज गायक संगीतकारांना त्याने भुरळ घातली आहे. कुमार-गंधर्वांसारख्या प्रख्यात शास्त्रीय गायकालाही भावगीतांचा मोह आवरता आलेला नाही. 'मी निरांजनातील वात' असे म्हणत गजाननराव वाटवे यांनी भावगीताला खऱ्या अर्थाने प्रकाशदिशा दाखवली. उत्तम कवितांची निवड हे वैशिष्ट्य गजाननरावांनाही लागू पडते. चांगल्या कवींच्या रचना घेऊन त्यांना संगीतबद्ध करायचे आणि स्वत:च त्या गायच्या अशी गजाननरावांची खासियत होती. त्यांनी गायलेल्या सगळ्या भावगीतांचा विचार केला तर त्यांपैकी काही निवडकच अशी भावगीते आहेत की ज्यांना इतर संगीतकारांनी संगीतबद्ध केलेले आहे. भावगीतांचे हजारो कार्यक्रम गजाननरावांनी केले आणि भावगीतांचे युग निर्माण केले.

कोणताही कलाकार आपल्या कार्याद्वारे समकालीन कलाकारांवर परिणाम घडवून आणत असतो. गजाननरावांच्या बाबतीतही नेमके हेच झाले. केवळ श्रोत्यांनाच नव्हे तर त्या काळातल्या इतर गायकांना 'भावगीत' या संगीतप्रकाराकडे अप्रत्यक्षपणे वळवण्याचे काम गजाननरावांनी केले. त्यांच्यामुळेच महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात भावगीते गायली जाऊ लागली.

ज्या मराठी संगीताचा गेल्या पन्नास वर्षातला आढावा आपण घेत आहोत त्यामध्ये लोकसंगीताचा मोठा प्रभाव आपल्याला दिसून येतो. भजन, अभंग, पोवाडे, लावणी अशा कितीतरी संगीतप्रकारांचा 'लोकसंगीत' या संकल्पनेमध्ये समावेश होतो. मराठी चित्रपट आणि अल्बम यांच्या माध्यमातून लोकसंगीताचा अंतर्भाव आजही आपल्याला बऱ्याच प्रमाणात होताना दिसून येतो.

महाराष्ट्राच्या निर्मितीचा विचार केला तर त्याकाळात उत्तम पोवाडे रचले गेले. करमणुकीबरोबर प्रबोधनाचे महत्त्वपूर्ण काम पोवाड्यांनी केले. अनेक शाहीर या काळात तयार झाले. पोवाडे, भजन, अभंग, लावणी यांचा श्रोतृवर्ग प्रामुख्याने ग्रामीण भागात आढळून येतो. चित्रपटांमधल्या लावण्यांनी मात्र गावाची सीमा पार करून शहरी भागातही बस्तान बसवले. लता मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर, सुरेश वाडकर, अजित कडकडे यांनी अभंगांची गोडी निर्माण केली.

मराठी संगीतावर इतर भाषांमधील संगीताचा परिणाम झालेला दिसून येतो. प्रामुख्याने हिंदी आणि उर्दू या भाषांनी मराठी संगीतावर आपला प्रभाव टाकला. यांपैकी हिंदी भाषेतल्या गीतांचा प्रभाव मराठी चित्रपटांमधून बऱ्याचदा दिसून आला. पण अशा गीतांना श्रोत्यांचा क्वचितच प्रतिसाद मिळाला. उर्दू संगीताचा प्रभाव असे आपण म्हणतो तेव्हा आपल्या डोळ्यांसमोर येते ती गझल.

मराठीतली गझल म्हटली की आपल्याला आठवतात ते कवी सुरेश भट, मंगेश पाडगांवकर आणि अलिकडच्या पिढीतले चंद्रशेखर सानेकर. गझल हा पूर्णपणे वेगळा असा साहित्यप्रकार असून उर्दू भाषेकडून आपण तो आयात केला आहे. असे असले तरी मराठी गझलमध्ये जो भाव आहे तो अस्सल मराठीच आहे. मी, आशा भोसले, भीमराव पांचाळे यांनी मराठी गझल गाऊन त्याचा वेगळा आनंद श्रोत्यांना दिला.







वर उल्लेख केलेले विविध संगीतप्रकार हे प्रामुख्याने तीन माध्यमांद्वारे श्रोत्यांपर्यंत पोचले. त्यांपैकी एक म्हणजे चित्रपट, दुसरे म्हणजे ध्वनिमुद्रिका किंवा ज्याला अलिकडे 'अल्बम' असे म्हणतात आणि तिसरे म्हणजे आकाशवाणी. पूर्वी खास आकाशवाणीसाठी काही गीते ध्वनिमुद्रित केली जात असत म्हणून त्याचा विशेष उल्लेख केला आहे.

मराठी चित्रपटांमधल्या संगीताचा विचार केला तर चित्रपटांचे विषय आणि आशय जसे बदलत गेले तसे त्यातले संगीतही बदलत गेले. अर्थातच महाराष्ट्रातल्या बदलत्या आर्थिक-सामाजिक रचनेचे प्रतिबिंब त्या त्या काळातल्या मराठी चित्रपटांमधून उमटत होते. याचा परिणाम चित्रपटांमधल्या संगीतावरही झाला. मध्यंतरीच्या काळात, म्हणजे विनोदी चित्रपटांची लाट मराठीत आली होती त्यावेळी मराठी चित्रपटातली गीते श्रोत्यांपासून दूर गेली. या चित्रपटांमधल्या गाण्यांमध्ये शब्द, संगीतनियोजन आणि सूर या सगळ्यांबद्दलच बऱ्याच प्रमाणात नाराजी व्यक्त होऊ

श्री. विकास बावधनकर, अमेरिकेत न्यू जर्सी येथे राहणारे गृहस्थ.

- साहित्याशी असलेली त्यांची जवळीक वाखाणण्याजोगी. दूरदेशी राहूनही त्यांनी जोपासलेले विचार आणि त्या चिंतनातून सर्वदूर राहणाऱ्या मराठी बांधवांच्या अडचणींचा त्यांनी केलेल्या अभ्यासातूनच इंटरनेटचा वापर साहित्यप्रसारात करून घेतला तर? हा प्रश्न पडला. याच प्रश्नाच्या उत्तरातून अस्तित्वात असलेल्या, साहित्याला वाहिलेल्या दोन वेबसाईट्स निर्माण झाल्या.
- **मायईमॅगझिन्स डॉट कॉम** (www.myemagazines.com) या वेबसाईटवर महाराष्ट्रातून प्रसिद्ध होणारी आणि विविध विषयांनी वाहिलेली वीसहून अधिक मासिके दर महिन्याला प्रकाशित होत असतात. आपल्या दिवाळीचा आनंद द्विगुणित करणारे दिवाळी अंक या वेबसाईटवर वाचण्यात उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. बरीचशी मासिके येऊ घातली आहेत. या वेबसाईटवर पहिला एक महिना मासिके मोफत वाचण्यासाठी उपलब्ध आहेत. तद्नंतर शुल्क आकारण्यात येणार आहे. श्री. बावधनकरांच्या बोलण्यातून एक खंत जाणवते ती म्हणजे, एक महिना पूर्ण झाल्यानंतर सभासदांकडून वर्गणी न येणे. आम्हाला असे वाटते की प्रत्येक कार्यात अपार मेहनतीबरोबर अपार खर्चही असतो आणि या कामाला निश्चितच पैसा तो याच्याशी आपण सहमत व्हाल. तेव्हा या वेबसाईटचे सभासदत्व स्वीकारून या कार्यास आपण मोलाचे सहकार्य करावे ही विनंती.
- **साहित्यभारती डॉट कॉम** (www.sahityabharati.com) या वेबसाईटवर महाराष्ट्रातील प्रत्येक प्रकाशक आणि त्यांनी प्रकाशित केलेले साहित्य तीन प्रकारात उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. प्रकाशित पुस्तक, पुस्तकरूपात, ईस्वरूपात सीडीवर विक्रीसाठी आणि वेबसाईटवर ऑनलाईन वाचनासाठी उपलब्ध होईल. सध्या पुस्तकांची अद्ययावत माहिती गोळा करून, प्रती उपलब्ध असलेल्या पुस्तकांची विक्री करण्यात येत आहे.
- अशा प्रयत्नांना सहृदयी, समविचारी लोकांचे सर्वतोपरी (तन, मन आणि धन) सहकार्य मिळाल्यास हेच कार्य थोड्याच कालावधीत मराठी साहित्याला मोठ्या प्रमाणात लोकापर्यंत पोचवेल आणि त्यामुळे वाचकांची संख्या वाढेल. वाचक वाढल्यामुळे प्रकाशक सुखावतील, ते सुखावले की लेखक आनंदी होतील, लेखक आनंदी झाले की चांगले साहित्य जन्मास येईल, चांगले साहित्य निर्माण झाले की वाचक वाढतील... मराठी साहित्याला नवा हुरूप येईल.
- नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून साहित्या जगभरातील मराठी जनतेपर्यंत पोचवण्याच्या त्यांच्या या कार्यास 'ग्रंथाली'ची मदत आहे. आपल्याही सहकार्याची अपेक्षा आहे. यातून मराठी साहित्य इंटरनेट माध्यमातून सर्वदूर पोचावे हीच सदिच्छा.

लागली. याच काळातल्या चित्रपटेतर संगीताचा म्हणजे ध्वनिमुद्रिकांचा विचार केला तर चित्रपटांच्या तुलनेत या 'अल्बम'ना मिळणारा प्रतिसाद चांगला होता. याच दरम्यानच्या काही चित्रपटांमधली गाणी साचेबद्ध स्वरूपाची होती. मात्र 'मुक्ता', 'सुर्वंता' यांसारख्या चित्रपटांमधून ना.धों.महानोर, विठ्ठल वाघ, प्रकाश होळकर, सौमित्र यांच्या लेखणीतून उतरलेली आणि श्रीधर फडके, कौशल इनामदार, आनंद मोडक यांच्या संगीताने नटलेली गीते श्रोत्यांना आनंद देऊन गेली. पद्मजा फेणाणी जोगळेकर यांनी अवघड कवितांना चाली लावून नवनवीन प्रयोग केले. शास्त्रीय संगीताचा बाज असलेल्या गीतांनाही चित्रपटांमधून स्थान मिळाले आणि श्रोत्यांनीही त्याला मन:पूर्वक दाद दिली.

चित्रपटातल्या संगीताचा प्रवास स्वाभाविकपणे चित्रपटांबरोबरच झाला. आज नव्या पिढीला भुरळ घालण्याचे काम अवधूत गुप्ते, सलील कुलकर्णी, मिलिंद इंगळे, वैशाली सामंत, बेला शेंडे अशी अनेक मंडळी करत आहेत. मराठी संगीताच्या या सगळ्या प्रवासात 'संगीतकार' म्हणून काम करणाऱ्या महिलांची संख्या मात्र नगण्य आहे, याचा खरोखर खेद वाटतो. ही उणीव नवीन पिढीतल्या संगीतप्रिय स्त्रियांनी, मुलींनी भरून काढायला हवी.

गेल्या पन्नास वर्षांतल्या मराठी संगीताचा आढावा घेताना, गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रात गाजत असलेल्या स्पर्धांना विसरून कसे चालेल? हिंदी वाहिन्यांबरोबर मराठी वाहिन्यांनीही अशा स्पर्धा भरवण्यास सुरुवात केली आहे. शहर आणि गावपातळीवर होणाऱ्या संगीतविषयक स्पर्धांपेक्षा यांचा आवाका बराच मोठा असतो. शिवाय, या स्पर्धांना उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या स्पर्धांबद्दल काही प्रमाणात ओरड होते तर काही प्रमाणात त्याचे महत्त्वही ओळखले गेले आहे. अशा स्पर्धांमधून फार काही साध्य होत नाही, या वाहिन्यांच्या टीआरपीचा तो एक भाग आहे असेही म्हटले जाते, पण मला असे वाटते की त्याच त्या रडक्या मालिका मुलांसह सगळ्या कुटुंबाने पाहण्यापेक्षा उत्तम मराठी गाणी घरबसल्या ऐकायला मिळत असतील तर त्याला विरोध का करायचा? या स्पर्धा आयोजित करत असताना वाहिन्या आपल्या फायद्याचा विचार करणारच. त्यात गैर काही नाही पण अशा स्पर्धांमधून गायकांना संपूर्ण महाराष्ट्रासमोर येण्यासाठी व्यासपीठ मिळत असेल तर त्याला विरोध करता कामा नये. स्पर्धेतल्या विजयावरूनच त्या गायकाची किंवा गायिकेची पात्रता किंवा श्रेष्ठत्व ठरत नसते. 'सारेगम'च्या 'लिटिल चॅम्प'ची खूप चर्चा महाराष्ट्रात झाली. टीव्हीवरचा कार्यक्रम पाहण्यासाठी आतुरलेले लोक अनेक वर्षांनंतर या कार्यक्रमाच्या निमित्ताने पाहायला मिळाले. या स्पर्धेतला प्रथमेश लघाटे हा छोटा गायक अंतिम विजेता ठरला नाही. मात्र या स्पर्धेमुळे रत्नागिरीतला हा हिरा हजारो नाही तर लाखो लोकांसमोर आला. त्याच्या गाण्याची वैशिष्ट्ये लोकांनी वाखाणली, त्याची खूप तारीफ केली. ही स्पर्धाच झाली नसती तर प्रथमेश लघाटेसारखा गुणी गायक आपल्यापर्यंत आला असता का? संपूर्ण महाराष्ट्रात पोचायला त्याला आणखी कितीतरी वर्षे खर्च करावी लागली असती. पण या स्पर्धेच्या जोरावर लहान वयात त्याने हा टप्पा गाठला आहे.

या स्पर्धा नव्या पिढीसाठी पोषक आहेत तशी आजच्या काळात उपलब्ध झालेल्या सुविधाही नव्या पिढीला वरदान ठरणाऱ्या आहेत. आज घरबसल्या जगातल्या कोणत्याही गायकाचे, संगीतकाराचे गाणे ऐकण्याची संधी नव्या पिढीला मिळाली आहे. संगीतासारख्या कलेबाबत पालकही मोठ्या प्रमाणावर जागरूक झाले आहेत हीदेखील आशादायक बाब आहे. मात्र मुलांना केवळ 'स्पर्धक' न बनवता त्यांना गायक किंवा संगीतकार बनवायचे आहे, याचे भान पालकांनी ठेवायला हवे. तसे झाले तर मराठी संगीत अधिकाधिक समृद्ध होईल. अभिजात शास्त्रीय संगीताचा स्पर्श मराठी संगीतावर ठायी ठायी जाणवतो. मराठी संगीत म्हणजे अभिजात शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, भावगीत, गझल, भक्तिगीत आणि लोकसंगीत, की ज्यामध्ये अभंग, भजन यांच्यापासून पोवाडा आणि लावणीपर्यंतच्या विविध प्रकारांचा समावेश होतो. संगीताचा इतका समृद्ध पट इतर भाषा आणि प्रांतात पाहायला मिळेल, असे काही वाटत नाही. संगीतक्षेत्रातली ही विविधता अगदी सुरुवातीपासूनची. ती आजही टिकून आहे. त्यामुळेच मराठी संगीत हे सर्वाधिक समृद्ध आहे, असे आणि असेच म्हणावे लागेल.

---

**– ममता क्षेमकल्याणी**
mamata_kshem@yhaoo.co.in




# कथा माझ्या पहिल्या चित्रपटाची...

२२ सप्टेंबर २००८.

'कथा तिच्या लग्नाची' या मी दिग्दर्शित करत असलेल्या माझ्या पहिल्या चित्रपटाच्या चित्रीकरणाचा पहिला दिवस. लोकेशन, पुणे येथील जैन हॉस्टेल. पहिला शॉट. लाँग शॉट. आवारातल्या रस्त्याच्या अलिकडे कॅमेरा, रस्त्याच्या पलिकडे चार-सहा खोल्यांची बैठी चाळ. तिचं आम्ही आमच्या कथेतलं स्वाधार महिला पुनर्वसन केंद्र केलेलं. माधव वाशीकरच्या भूमिकेतील सुबोध भावे बाईकवरून कॅमेऱ्याच्या उजवीकडून फ्रेममधे येतो. घाईघाईत बाईक पार्क करतो आणि धावतच स्वाधारच्या व्हरांड्यातून जातो. त्याचवेळी मीरा झालेली दीपा परब फ्रेमच्या डावीकडून एका रूममधून बाहेर येते. दोघं एकमेकांना क्रॉस होतात. हा एवढाच शॉट. सगळी तयारी झाली. प्रत्येकानं आपापली पोझिशन घेतली. मी मॉनिटरवर ब्लॉक (फ्रेम) पाहिला. ओकेची खूण केली आणि ऑर्डर दिली.

''रोल साऊंड''

नागरावरचा (हे शूटिंगच्या वेळचे संवाद रेकॉर्ड करणारं मशीन) साऊंड रेकॉर्डिस्ट मोठ्यानं ओरडला.

''रोलिंग''

कॅमेरा सुरू झाला. मग पुन्हा माझी ऑर्डर,

''ॲक्शन''

सुबोध आला. त्यानं घाईघाईत बाईक पार्क केली. तो व्हरांड्यात धावतच सुटला. पलीकडून दीपा आली. दोघं क्रॉस झाले आणि मी पुन्हा ऑर्डर दिली.

''कट.''

दिग्दर्शक म्हणून मी माझा पहिला शॉट घेतला. खरंच वाटलं नाही की हे घडलंय अशी सर्वसाधारणपणे प्रथमच दिग्दर्शन करणाऱ्याची प्रतिक्रिया असते. माझी अगदी उलट होती. मला ते अजिबात स्वप्नवत वाटलं नाही. त्यामुळे ते खरोखरच घडलय असंच मला वाटलं. कारण साधं होतं. हे घडून येण्यासाठी मी खूप वाट पाहिली होती. त्यासाठी खूप काही सोसलं होतं. खूप प्रयत्न केले होते. आणि इतकं सगळं केल्यानंतर ते घडणारच होतं. घडलं! मग मनातल्या मनात तरी अविश्वास का? त्यामुळे मी एरवीसारखा भावानाविवश झालो नाही. कारण हे सारं मी पुरेशी किंमत मोजून माझ्या आयुष्यात घडवून आणलं होतं. आयुष्यभर जे शब्द उच्चारण्यासाठी मी अधीर झालो होतो ते एकदाचे उच्चारले याची एक विलक्षण तृप्ती मनोमन जाणवत होती.

दिग्दर्शक म्हणून मी नुकताच जन्माला येत होतो. जसं एखाद्या आईच्या बाबतीत तिचं प्रत्यक्षातलं वय आणि तेवढा आयुष्याचा अनुभव तिच्या आई असण्याच्या कोवळेपणाला थोडाफार उपयोगी येऊ शकतो तसाच तो माझ्याही बाबतीत मदतीला आला. माझं आजवरचं पाहणं, वाचणं, लिहिणं, बोलणं, ऐकणं या सर्वांतून मी जे काही चित्रपटाविषयी शिकलो त्यातलं बऱ्यापैकी माझ्या उपयोगी पडलंच. कसं ते सांगतो.

'कथा तिच्या लग्नाची' या चित्रपटाची कथा पूर्णपणे आकाराला येण्याआधी मला सुचली वनलाईन! म्हणजेच कथेचं बीज किंवा व्यापक अर्थानं म्हणायचं तर संकल्पना! वनलाईन अशी- एक अशी आई जिचं स्वत:चं लग्न झालेलं नाही आणि ती आपल्या मुलीच्या लग्नाचं स्वप्न पाहते आहे. मग गोष्ट आकाराला येऊ लागली. लग्न न झालेली

परंतु मूल असलेली बाई यासाठी माझ्याकडे तीन पर्याय होते - वेश्या, कुमारी माता आणि तमासगिरीण! मला वेश्यांचं जगणं दाखवायचं नव्हतं. कारण मराठी प्रेक्षकातल्या एका फार मोठ्या प्रेक्षकवर्गाला हे पाहायला आवडत नाही. माझा पहिला चित्रपट असल्यामुळे मला व्यावहारिक भान ठेवणं आवश्यक होतं. कुमारी मातेवर आजवर बरेच सिनेमे येऊन गेलेत. म्हणून मी तिसरा पर्याय निवडला, तमासगिरीणीचा! कारण यानिमित्तानं मला मराठी चित्रपटातून क्वचित दिसलेलं तमासगिरांचं जगणं सर्वांगानं दाखवता येईल आणि गोष्ट रंजक करण्यासाठी लावणीचा वापर करता येईल. विनय कुवळेकरांनी लिहिलेल्या दोन लावण्यांना आनंद मोडक यांनी अप्रतिम संगीत देऊन माझा उद्देश सफल केला. प्रशांत मोरे या तरुण कवीची कविता 'ओल्या काळजाची हाक आली येशीत दुरुन, राघू चंद्रकोर आना मैना देते आवताण' मी दहा-बारा वर्षांपूर्वी त्याच्याकडूनच ऐकली होती. त्यात माझ्या नायिकेची सारी कातर अवस्था नेमकी व्यक्त होत होती. मी ती तेव्हाच चित्रपटातलं गाणं म्हणून पटकथेत लिहून टाकली होती. मी त्याचा थीम साँगसारखाच प्रयोग केला. पटकथेत तीन ठिकाणी त्याचा वापर केला. अजय-अतुलमधल्या अजय गोगावलेनं हे गाणं अतिशय सुरेख गायलं.



दीपा परब, सुबोध भावे आणि मधू कांबीकर

राधा कोरेगावकर ही तमासगिरीण आपल्या मुलीला-मीराला तमाशाच्या जगापासून दूर ठेवते. तिला शिकवते.

'एशेशीपातुर शिकवायचं, नर्स नाय तर साळा मास्तरनीची नोकरी लाऊन द्यायची आणि मंग तिचं लगीन लाऊन द्यायचं' असा ध्यास ती घेते. मीरा शिकते. शिकतच जाते. थेट सोशल सायन्समधे मास्टर्स करते. आता एवढ्या शिकलेल्या पोरीला नवरा कुठून आणायचा असा तिला पेच पडलेला असताना मीराच परस्पर लग्न ठरवून मोकळी होते. गावकुसाबाहेर जन्मलेली मीरा उच्च शिक्षणामुळे थेट मध्यमवर्गाशी येऊन पोचते आणि मध्यमवर्गातल्या माधव वाशीकर या तरुणाशी लग्न करते. आपल्या वाट्याला आलं नाही ते लग्न, संसार मुलीच्या वाट्याला आल्याचं पाहून राधा सुखावते. मुलीचा संसार पाहायला मुंबईला मुलीकडेच येऊन राहते. तिनं पाहिलेलं स्वप्न तिला पूर्णत्वाला गेलेलं पाहायला मिळतं का..?

माझी गोष्ट तयार झाली. अगदी सुरुवात-मध्य-शेवटासह! आता प्रत्यक्ष पटकथा लिहायला घ्यायची होती. माझ्या आजवरच्या अभ्यासातून या काही महत्त्वाच्या गोष्टी शिकलोय त्यांपैकी एक म्हणजे पटकथा कधीच एका व्यक्तीनं लिहू नये. दोन-तीन किंवा अगदी चारही लेखक मिळून पटकथा लिहितात तेव्हा मूळ गोष्टीतले अनेक कंगोरे लक्षात येतात आणि चित्रपट अधिक चांगला आणि परिणामकारक बनू शकतो. म्हणून मग मी, 'सावल्या ', 'आनंदी गोपाळ', 'कालचक्र', 'चिडी का गुलाम' आदी मालिकांच्या पटकथा/संवादलेखिका, गीतकार आणि ज्येष्ठ चित्रपट समीक्षक रेखा देशपांडे यांना सहपटकथालेखक म्हणून सोबत घेतलं. माझ्या कथेला असलेलं सामाजिक पर्यावरण पटकथेत मुख्यत: मी आणलं, तर रेखा देशपांडे यांनी त्यातली भावनिक गुंतागुंत नेमकी हेरली. आपापलं दी बेस्ट देताना एकमेकांच्या टेरीटरीत घुसून आम्ही तिथलीही दृश्यं, संवाद लिहिले. संपूर्ण पटकथा-संवाद आम्ही जवळपास चार-पाच वेळा लिहिले. आमचं दोघांचं काम झाल्यादंतर मी ते सारं दिग्दर्शक म्हणून माझ्या दृश्य संकल्पेनुसार लिहून काढलं.

पात्रांची निवड करताना योग्य कलाकार निवडणं महत्त्वाचं आणि तिथे सर्वप्रथम दिग्दर्शकाची कसोटी लागते. गोष्टीची वनलाईन सुचल्यापासूनच राधा कोरेगावकर म्हणून माझ्या डोळ्यांसमोर मधु कांबीकर होत्या. मीरासाठी मला

प्रथम नंदिता दास सुचली. तिला मराठीवर काम करावं लागलं असतं. दुसरा पर्याय होता मधुरा वेलणकर, पण तिचा ब्राम्हणी लूक आड आला. म्हणून मग बहुजन समाजाचा लूक असलेल्या दीपा परबची मी निवड केली. तिला भेटलेल्या मध्यमवर्गीय नायकासाठी सुबोध भावे आणि ढोलकीवाल्या नानबासाठी मिलिंद शिंदे या दोघांची निवड केली. मध्यमवर्ग आणि नवशिक्षित वर्ग यांतला संघर्ष नेमका समजून घेणाऱ्या ताईंसाठी सुलभा देशपांडेच सर्वार्थानं योग्य होत्या. तमाशातील आणखी एका नाचीसाठी उषा जाधवला तर तिच्या आईच्या भूमिकेसाठी नवख्या प्रतिभा भगतला घेतलं. एखादी मोठी आणि महत्त्वाची भूमिका नवख्या कलाकराला देणं हे नवख्या दिग्दर्शकाच्या दृष्टीनं तसं धाडसाचं होतं. मी ते केलं आणि प्रतिभानं खूप मेहनत घेतली.

जगभरचे चित्रपट पाहून, या अप्रत्यक्ष शाळेतून जे सारं शिकलो ते वेळोवेळी कामाला आलं. मला तीन ठिकाणी डिझॉल्व्ह हा डिव्हाइस वापरायचा होता. एका प्रतिमेतून दुसरी प्रतिमा उमटते या प्रक्रियेला डिझॉल्व्ह म्हणतात. अशा पध्दतीनं एका दृश्यातून दुसऱ्या दृश्यात जाताना सहज तसंच तरलपणे टाइम अँड स्पेस (काळ आणि अवकाश) पार करता येते. पटकथा लिहिताना आम्ही तीन दृश्यांच्या खाली डिझॉल्व्ह असं लिहिलं होतं. परंतु मग प्रश्न आला जेटचा! डिझॉल्व्ह हे तसं खर्चिक प्रकरण आहे. मग मी या तिन्ही ठिकाणी वेगवेगळे प्रकार वापरले.

छोटी मीरा शाळेत इतर मुलींबरोबर परीक्षेचा पेपर सोडवते आहे आणि मग त्या दृश्यातून मोठी मीरा आणि इतर मोठ्या मुली यांचं दृश्य उमटतं असा डिझॉल्व्ह होता. शूट करताना मी छोटी मीरा आणि इतर मुलींना पेपर सोडवायला बसवलं. त्यांच्या समोरच्या भिंतीजवळ ट्रॉलीवर कॅमेरा ठेवला. शिक्षक झालेल्या नटाला बेंचच्या एका रांगेतून पुढून मागे आणि दुसरीतून मागून पुढे यायला सांगितलं. फ्रेमच्या उजवीकडून त्यानं चालायला सुरुवात केल्यानंतर ट्रॉलीवरून कॅमेरा लेफ्ट टू राईट निघाला. शिक्षक दुसऱ्या रांगेतून पुढे येईपर्यंत पुढच्या बेंचवर बसलेली छोटी मीरा अधिकाधिक जवळून दिसत राहिली. ती पूर्णपणे फ्रेममधे आली, दिसली आणि शिक्षक पुढे आला आणि त्यानं तिला झाकलं. दृश्य कट केलं. कॅमेरा तिथेच राहिला. छोट्या मुलींच्या जागी मोठ्या मुलींना बसवलं. छोट्या मीराच्या जागी मोठी मीरा बसली. दुसऱ्या शिक्षकाला कॅमेऱ्यासमोर आणून मीराला झाकलं. मी अॅक्शन म्हणताच, शिक्षक पुढे निघाला आणि मोठी मीरा दिसली. हे दोन शॉट घ्यायला काही वेळ गेला. परंतु एडिट केल्यानंतर दिसलं असं की परीक्षेचा पेपर लिहिता लिहिता छोट्या मीराची मोठी मीरा झाली!

दुसरं एक दृश्य डिझॉल्व्हचं -

मीराला वडिलांची माया देणारा नानबा गेला त्या रात्री दुःखी मीरा बेडरूममधे बसली आहे. शेजारी माधव आहे. ती नानबाच्या आठवणी काढते आहे. म्हणते, ''मला खूप नाचावसं वाटायचं पण आई नाचू द्यायची नाही. मग नानबा आडोशाला घेऊन जायचा. एरवी कधी आईबरोबर ढोलकी वाजवायचा नाही. पण माझ्यासाठी समरसून वाजवायचा...'' मी इथे पुन्हा ट्रॉली वापरली. बाल्कनीत ट्रॉली लावली. मीरा बोलायला सुरुवात करते तेव्हा ट्रॉलीवरचा कॅमेरा हळुहळू लेफ्ट टू राईट नेला. मीरा अधिकाधिक जवळून आणि तिच्या डाव्या हाताला माधव असं दिसत असताना एका क्षणी फक्त तीच फ्रेममधे राहिली. तिचं एका बिंदूपर्यंतचं आठवणीतलं बोलणं संपलं. शॉट कट केला. आता दुसरा शॉट रिव्हर्समधे. राईट टू लेफ्ट. या दोन शॉटमधे तिनं सांगितलेल्या आठवणीचं जे दृश्य योजलं होतं त्यातलं शेवटचं वाक्य आता ती बोलते आणि पुन्हा बोलणं सुरू करते. ते मधलं दृश्य. यात नानबा आणि छोटी मीरा आहे ते नंतर कधी तरी चित्रित केलं. एडिट करताना, ''...पण माझ्यासाठी समरसून वाजवायचा..'' इथून ढोलकीचा आवाज सुरू केला आणि कटचा वापर करून ते आठवणीतलं दृश्य मधे जोडलं आणि मग मीराचं वाक्य...'' ''त्याचं ते मोठ्ठ शिक्रेट त्याच्याबरोबरच गेलं...'' या दृश्याच्या शेवटावर ऐकवत पुन्हा कटनं मीरा आणि माधववर आणलं. दृश्य पातळीवर जे फेडइन-फेडाऊट बजेटमुळे करता आलं नसतं ते एकही पैसा अधिक खर्च न करता साऊंडचा फेडइन-फेडाऊट वापर करून साधलं. असाच प्रयोग आणखी एका ठिकाणी केला. कटचा वापर करून तरलपणे काळ आणि अवकाश बदलण्याचा प्रयोग मला यशस्वीपणे करता आला आणि हे साध्य झालं ते मला माझ्या अभ्यासामुळे!

दिग्दर्शकाला एकाचवेळी अनेक गोष्टींचं भान असावं

लागतं. अनेक ताण-तणावांतून जावं लागतं. आपल्याला जे मुळापासून सांगायचं आहे ते कुठल्याही परिस्थितीत सांगताच आलं पाहिजे याची काळजी घ्यावी लागते. कधी कधी काही कारणांनी थोडीफार तडजोडदेखील करावी लागते.

एका दृश्यात, आधीच्याच ताणलेल्या प्रसंगातून मीरा -माधवमधे खटका उडतो. खरं तर, घडल्याप्रकाराबद्दल सॉरी म्हणत माधव मीराशी नॉर्मल राहू पाहतो. परंतु ती तिचा नेहमीचा आक्रमकपणा (माधव पुढे तिच्या या आक्रमकपणाला आक्रस्ताळेपणा म्हणतो) सोडत नाही आणि खटका उडतोच. चिडलेला माधव मग तिला सुनावतो,

''शेवटी जातीवरच गेलीस... होय तेच बोलतोय मी जे तू ऐकलंयस... जातीवरच गेलीस. तमासगिरणीची पोर गं तू. तुला काय कळणार घर आणि घरासारखं राहणं...''

यावर मीरा उसळून म्हणते,

''वाह, माधव वाशीकर. मला राग नाही आला. दुसऱ्याची जात काढणारा स्वत:चीच जात दाखवतो, नाही का?''

मी हे लिहिलं तेव्हा एक-दोन मित्रांना या संवादासकट संपूर्ण दृश्य मी वाचून दाखवलं होतं. सर्वांना खूप आवडलं होतं. चित्रितही तसंच झालं. परंतु एक दिवस अचानक माझ्या ध्यानी आलं की जात शब्दाला सेंसॉर आक्षेप घेईल. एरवी मी माझ्या संवादावर ठाम राहिलो असतो. सेंसॉरशी भांडलो असतो. खरं तर सेंसोरचा हा सारा मूर्खपणाच आहे. सेंसोर अनेकप्रकारे ते करतं. पण मी तडजोड केली. कारण माझा पहिला चित्रपट होता. निर्मात्याचा पहिला चित्रपट होता. आणि सेंसोरच्या कचाट्यात सापडणं त्याला परवडणारं नव्हतं. सुबोध भावेचं डबिंग झालेलं होतं. त्याच्या कमालीच्या बिझी शेड्युलमधून मी त्याला दहा मिनिटांसाठी बोलावलं आणि 'जातीवरच गेलीस'च्या जागी 'लायकीवरच गेलीस' असं डब करून घेतलं. 'जाती'च्या जागी 'लायकी' हा शब्द बसवताना लीप सिंकच्या वेळी थोडा त्रास झाला, पण कसंबसं जमवलं.

शूटिंगच्या पहिल्याच दिवशी स्वाधार महिला केंद्रातली माधव-मीराची पहिली भेट चित्रित केल्यानंतर कॅमेऱ्याची पोझिशन बदलली. कॅमेरा व्हरांड्यात आणला. सुबोध कॅमेऱ्याकडे पाठ करून पुढे जातो आणि त्याचवेळी दीपा कॅमेऱ्याच्या दिशेनं येते. दोघं क्रॉस होतात. कॅमेरामन मला म्हणाला,



**मधू कांबीकर यांच्याबरोबर चर्चा करताना दिग्दर्शक अशोक राणे**

''सर, हा शॉट मी हाय स्पीडो (म्हणजे स्लो मोशन) घेतो.''

मी 'नको' म्हटलं. पण तो आग्रह सोडेना. त्याच्या म्हणण्याप्रमाणे हिरो- हिरोईनची पहिली भेट आहे. मी आणखी एकदाच समजावलं. मग म्हणालो,

''तुला हवा तसा हाय स्पीडचा घे आणि नॉर्मलही घे. मग ठरवू.''

त्यानं पहिला अर्थातच त्याला हवा तसा शॉट घेतला. शॉट होताच सुबोध माझ्याकडे आला आणि मला म्हणाला,

''अशोकजी, तुमच्या सिनेमात टिपिकल हिरो-हिरोईन कसे असू शकतात. त्या वेगळ्या व्यक्तिरेखा आहेत.''

मी म्हटलं, ''हेच मी कॅमेरामनला समजावलं. तरीही त्यानं आग्रह धरला. म्हणून मी त्याला त्याचा आणि माझाही शॉट घ्यायला सांगितलय. आता तुला, मला हवाय तो शॉट होईल. थोडी फिल्म वाया जाईल. परंतु मला आज ते करणं भाग आहे. हा कॅमेरामन माझ्यासाठी नवीन आहे. त्याला पहिल्या दिवशी हे कन्सेशन द्यायला हवं. म्हणजे पुढे मला मला हवं तेच त्याच्याकडून करवून घेता येईल.''

दिग्दर्शक त्याच्या चित्रपटाचा एकूणात विचार करतो. बहुतेक कलावंत किंवा तंत्रज्ञ सटासटा विचार करतात. काही कलावंत आणि तंत्रज्ञ तर गोष्ट नेमकी काय आहे, तिची प्रकृती काय आहे याचाच विचार करत नाही. विचार करू शकत नाही. दिग्दर्शकाला मात्र कायम याचं भान ठेवावं लागतं. आपल्या भूमिकेवर ठाम राहावं लागतं. मी तो प्रयत्न सातत्यानं केला. याचा अर्थ सारं छान पध्दतीनं

*With Best Compliments From*

# Mehta Group

Bhavesh C. Mehta

Paresh C. Mehta

Off.: 1 & 2, 'GOKUL',
Opp. Petrol Pump,
Agashi Road,
Below UTI Bank Ltd., Virar (W).

Tel.: 95250 - 2502471 / 95250 - 2502931
Site : 3201109

पार पडलं असं नाही. खूप त्रास झाला. सुबोध भावे, मिलिंद शिंदे आणि सुलभा देशपांडे या तीन कलावंतांनी मला खूप सांभाळलं. कलावंत, कलावंत म्हणून जितका चांगला असावा लागतो तितकाच तो माणूस म्हणूनही चांगला असावा लागतो. या तिघांच्या बाबतीत मात्र हे शंभर टक्के खरं आहे. पुण्यातल्या एका कॉलेजच्या प्रवेशद्वाराशी एक लाँग शॉट घेत होतो. सुलभाताई बाहेर पडत असतात. दीपा पाठून धावत येत त्यांच्याशी बोलायला येते. सायलंट शॉट होता. मी दूर मॉनिटरजवळ बसलेला. ऑर्डर देणार इतक्यात माझं लक्ष गेलं. सुलभाताई चालत पुढे निघाल्या होत्या. पुढे दोन-तीन पायऱ्या होत्या. त्यांना पायऱ्या उतरताना, चढताना त्रास होतो हे मला माहीत होतं. मी धावतच त्यांच्याकडे गेलो तर त्या चिडल्याच माझ्यावर,

''तुम्ही कशाला आलात इथे? मी येत होते तुम्हाला विचारायला...''

''अहो, पण तुम्ही..''

''ते काही नाही. तुम्ही दिग्दर्शक आहात. मीच तुमच्याकडे यायला पाहिजे. आता ठीक आहे. पुन्हा असं कधी करू नका.''

सुलभाताई साध्या साध्या दृश्यातही बारकावे आणत असे काही रंग भरतात की केवळ त्यांची व्यक्तिरेखाच नव्हे तर एकूणच तो प्रसंग अतिशय उठावदार होऊन जातो. सुबोध भावे आणि मिलिंद शिंदे हे देखील याचप्रकारे चित्रपटात काँट्रिब्युट करतात. माधव सतत सॉरी म्हणतो याचा आम्ही पटकथेत खूपच चांगला आणि परिणामकारक वापर केला आहे. त्याच्या या सॉरी बोलण्याच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत नाना तऱ्हा आहेत आणि त्यातून त्याच्या व्यक्तिरेखेतलं तसंच त्या-त्या प्रसंगातलं नाट्य गहिरं केलं आहे. प्रवाही ठेवलं आहे. सुबोधनं शूटिंगला येण्यापूर्वी पटकथेचं इतकं छान आकलन करून घेतलं होतं की त्याच्या व्यक्तिरेखेचा ग्राफ तर त्याचा त्यानं ठरवलाच परंतु त्याच्या व्यक्तिरेखेतलं हे सॉरी प्रकरण त्यानं छान जमवलं. मला लेखक-दिग्दर्शक म्हणून जसं अभिप्रेत होतं नेमकं तसं! मला त्याला काही सांगावं लागलं नाही. तीच गोष्ट मिलिंद शिंदेची. शूटला येताना तो सोबत नानबाला घेऊनच आला. चाळिशीचा नानबा साठीच्या पलीकडे जातो हा वयाचा प्रवास आम्ही मुख्यत: त्याच्या खोकल्यातून दाखवला होता. पटकथेतलं हे डिटेलिंग त्यानं नेमकं हेरलं आणि आपल्या अतिशय तरल अभिनयशैलीतून दाखवलं. तो तर संवादांच्या इतक्या प्रेमात पडला की तोच म्हणू लागला की सिनेमातले संवाद नाटकासारखे पुन्हा पुन्हा आठवत नाहीत. इथे मात्र मला प्रत्येक संवाद नाटकासारखा स्मरणात राहिला आहे. अधूनमधून मी स्वत:शीच ते बोलत राहतो.

पंचवीस दिवसात शूटिंग संपलं. पुढच्या तीन महिन्यांत फिल्म तयार झाली. पंधरा वर्षं जी कथा सतत माझ्या ध्यानीमनी होती ती पहिल्या ट्रायलला पडद्यावर पाहून मी एका पातळीवर तृप्तही झालो. एकदाचा मी चित्रपट दिग्दर्शित केला याची ती तृप्ती होती. परंतु याचवेळी एक खंत मनाला वेढून राहिली. खूप अडचणी आल्या. सोबतच्या काही लोकांनी अनपेक्षितपणे खूप त्रास दिला. तरीही मनाची शांती ढळू न देता हवं ते साध्य करण्याचा आटोकाट प्रयत्न मी केला. त्यातून साकारलेल्या या पहिल्याच चित्रपटात कळूनसवरून सुध्दा काही गोष्टी अन्य कारणांनी करता आल्या नाहीत याची खंत माझ्या मनाशी राहिली.

चित्रपट ज्यांनी ज्यांनी पाहिला त्यांना खूप आवडला. माझ्या पहिल्या प्रयत्नाचं कौतुक झालं. तमाशाच्या जगातून थेट मध्यमवर्गाशी येऊन पोचणारी गोष्ट हा प्रवास अनेकांनी विशेषत्वानं नोंदला. नवशिक्षित बहुजन समाज आणि पारंपरिक मध्यमवर्ग हा गाभ्याशी असलेला संघर्ष हे समकालीन सामाजिक वास्तव अनेकांनी नेमकं हेरलं. कुमार केतकर तर असं म्हणाले की चित्रपटातून ते आणणं तसं अवघड आहे, परंतु इथे ते फार छान साधलं आहे. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे चित्रपटाचा अगदी वेगळा आणि अनपेक्षित शेवट सर्वच प्रेक्षकांनी मनापासून स्वीकारला आणि दाद दिली. खूप कौतुक झालं. अजूनही होतंय.

मी मात्र तूर्तास माझ्या नव्या चित्रपटाकडे वळलो आहे.

**- अशोक राणे**
ए/१०१, सहनिवास,
सी.डी. देशमुख उद्यानामागे,
मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१
इ-मेल : ashma52@yahoo.com

# ‘जनसंवाद’ कशासाठी? —— ❖ सु.गो. तपस्वी

प्रत्येक राजकीय पक्षात वा धार्मिक गटात लोकशाही मूल्ये जतन करणाऱ्या, सामाजिक वृत्ती जपणाऱ्या व्यक्ती असतात, परंतु राजकारणाच्या वा इतर दबावांमुळे त्यांचे प्रयत्न तोकडे पडतात. सुशिक्षित आणि सधन वर्गातसुद्धा सामाजिक बांधीलकी मानणारे अनेक असतात. भारतात मात्र ही सत्शक्ती, अशा व्यक्ती एकाकी पडलेल्या नजरेस येतात.

विचारमंथनातून ध्यानात येते, की निवडलेली लोकशाही राज्यव्यवस्था राबवून घेण्यात भारतीय समाज कमी पडतो. लोकांच्या सामाजिक वर्तणुकीचा, कायदा पाळण्यात अभिमान बाळगण्याच्या वृत्तीच्या उणिवेचा अभ्यास केल्यावर हे सुद्‌धा लक्षात येते की राष्ट्रभावना, नागरिकत्वाची मूल्ये समाजात रुजलेली नाहीत; कारणे अनेक असतील वा आहेत.

विकसित राष्ट्र ठरण्याकरता मानवविकास महत्त्वाचा असतो. एकीकडे राजकारणी निवडणुकांकरता समाजातील विभाजनवृत्तीला खतपाणी घालत असतात तर दुसरीकडे निवडणुकांदरम्यान त्यांनी दिलेली आश्वासने, दाखवलेली प्रलोभने प्रत्यक्षात अंमलात आणण्यात ते कमी पडतात. मात्र ह्या साऱ्यांचा परिणाम म्हणजे जनतेच्या आशाआकांक्षा उंचावतात!

अभ्यासातून हे लक्षात येते की, ‘स्वतःचा विकास स्वतः’ करायचा असतो, हे तत्त्व बहुजन विसरतात; ‘नेतेगिरी’ जोपासल्यामुळे समाज परावलंबी होतो. स्व-विकासासाठी कायम आपण शासन-प्रशासनाला जबाबदार धरतो आणि सामाजिक नेतृत्वाकडे झालेल्या दुर्लक्षामुळे त्यांचा राजकारणावर अंकुश राहत नाही.

एकेकाळी माध्यमे समाजात मूल्यवर्धन साधण्याचा प्रयत्न करायची; आज ती वाचकांच्या तालावर नाचत असल्याचे नजरेस येते. अशी टीका करत असताना भांडवलशाही व्यवस्थेत माध्यमांच्या अर्थकारणाचे भान अशा टीकाकारांना नसते.

सत्शक्तीने एकत्र येऊन एखादे धर्म व पक्षनिरपेक्ष व्यासपीठ निर्माण करावे, संघटन साधून सामाजिक नेतृत्वाची पोकळी काही प्रमाणात भरून काढावी म्हणून ‘जनसंवाद’ ही चळवळ सुरू झाली आहे. दोन व तीन मे २००९ रोजी पुण्यात महाराष्ट्रातील ठिकठिकाणचे अनेक विचारवंत एकत्र जमले व ह्या चळवळीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. समाजात स्व-विकास, नागरिकत्व, राष्ट्रभावना व सामाजिक बांधीलकी आणि लोकशाहीची मूल्ये रुजवून लोकशाहीला लायक असा सक्षम समाज निर्माण करण्याकरता पहिले पाऊल टाकण्यासाठी ही चळवळ सुरू झाली आहे.

देशातील परिस्थितीचे, वास्तवाचे भान ठेवून ही चळवळ एक दूरगामी लक्ष्य मानून हळूहळू वाटचाल करणार आहे. योग्य जनजागृती हा त्या मार्गावरील पहिला टप्पा आहे. हे सर्व लक्षात घेऊनच ‘जनसंवाद’चे धोरण व कार्यक्रम ठरवण्यात येतील. त्या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील वाचकवर्गात चर्चेसाठी, विचारांच्या प्रचारासाठी, सामाजिक मूल्यांच्या जाणिवेतून समाजाने आत्मपरीक्षण करण्यासाठी दिवाळी विशेषांकांच्या माध्यमातून एक राज्यव्यापी स्पर्धा घेण्याची योजना जनसंवादाने आखली आहे. उद्देश असाही आहे की आर्थिक झळ न पोचवता माध्यमांना ह्या सामाजिक उपक्रमात सामील करून घेऊन एकाच वेळी संपूर्ण महाराष्ट्रात वैचारिक घुसळण साधावी.

**उपक्रम**

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व दिवाळी अंकात एकच कथा छापली जाईल. त्या कथेच्या आधारे वाचकांनी उपरोक्त मूल्यांवर एक निबंध लिहायचा आहे. निबंधाच्या विशिष्ट विषयाबाबतचे आकलन वाचकांना कथेद्वारेच करून दिले जाईल.

वाचकांनी त्यांचा प्रतिसाद कोणत्याही परंतु, एकाच प्रकाशनाकडे पाठवायचा आहे. त्या त्या प्रकाशनाकडे आलेल्या प्रतिसादातून प्रत्येक विशेषांक तीन विजयी स्पर्धक निवडेल. ही झाली स्थानिक पातळीवरील स्पर्धा. ह्या स्थानिक स्पर्धेतून विविध भौगोलिक विभागांचे प्रतिनिधित्व साधण्यासाठी तीस ते चाळीस प्रकाशने निवडली जातील. अंमलबजावणी व पारितोषिकांसाठी प्रत्येक प्रकाशनासाठी पाच ते सात हजार रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

प्रत्येक प्रकाशनातर्फे पहिले पारितोषिक मिळालेला विजेता राज्य पातळीवरील स्पर्धेसाठी पात्र ठरेल. म्हणजे, स्थानिक पातळीवर प्रथम क्रमांक प्राप्त झालेल्या प्रत्येक

विजयी स्पर्धकाचा निबंध राज्य पातळीवरील परीक्षक मंडळाकडे पाठवला जाईल. परीक्षक मंडळ राज्यव्यापी व विविध क्षेत्रांतील नामवंत सदस्यांचे असेल. या मंडळातील प्रत्येक सदस्याने प्रत्येक निबंधाचे स्वतंत्र मूल्यांकन केल्यानंतर त्यांनी दिलेल्या गुणांच्या बेरजेतून अंतिम विजयी तीन निबंध निवडले जातील. त्या तीन विजेत्यांना भरघोस पारितोषिके दिली जातील. पारितोषिक-वितरण सोहळा भव्य रीतीने सादर करून, यामागील विचारांना आवश्यक प्रसिद्धी लाभून प्रचार साधण्याचा चळवळीचा महत्त्वाचा प्रयत्न असेल.

उपक्रमासाठी लागणारा निधी जनसंवाद चळवळ उभा करणार आहे. आजच्या समाजाला एखाद्या चळवळीच्या उपक्रमात सहभागी होण्याकरता उद्युक्त करण्यासाठी जरूर असणाऱ्या भव्यतेचा अंदाज घेऊन किमान पाच-सात लाखाचा निधी उभा करणे आवश्यक आहे.

एखादा प्रायोजक निवडण्याऐवजी हा निधी लोक-सहभागातून उभा करण्याचे आव्हान जनसंवाद घेऊ इच्छिते. अशा जनसामान्यांच्या आधारातून निर्माण होऊ शकणारी सामाजिक जागृती जमेस धरून जनसंवादाचे सदस्य हा निधी लोकसंग्रह साधून वैयक्तिक व संस्थात्मक संपर्कातून 'मदत' म्हणून उभा करणार आहेत.

**– सु.गो.तपस्वी**
(अध्यक्ष, जनसंवाद)

ग्रंथाली ही संस्था जनसंवाद चळवळीशी जोडलेली आहे. ह्या चळवळीच्या निर्मितीत ग्रंथालीचा कृतिशील सहभाग आहे. म्हणूनच, हा निधी उभा करण्याकरता, त्यातील वाटा उचलण्याकरता, 'रुची'च्या वाचकांनी सढळ हाताने मदत करून ग्रंथालीला ही जबाबदारी पेलण्यासाठी सक्षम करावे असे आवाहन भारतीय व परदेशातील वाचकांना करण्यासाठी वरील संक्षिप्त निवेदन. अधिक माहितीसाठी संपर्क साधून 'ग्रंथाली – जनसंवाद'ह्या नावाने काढलेले धनादेश ग्रंथालीच्या पत्त्यावर पाठवावेत.

सांघिक प्रयत्नांतून सिद्ध करुया, की मराठी वाचकांची सामाजिक बांधीलकीची भावना अजून जिवंत आहे!

**– धनजंय गांगल**
(सचीव, ग्रंथाली)


ग्रंथाली



**स्वदेश**

संपादन : **भूषण केळकर**

मूल्य १६० रुपये
सवलतीत १०० रुपये

'ब्रेनड्रेन'ऐवजी 'ब्रेनगेन' सुरू झाला आहे. अनेक अनिवासी भारतीय भारतात परतू लागले आहेत. त्यात मराठी माणसे आलीच. अशा पंचवीस, घरट्यात परतलेल्या व्यक्तींनी आपल्या कहाण्या या पुस्तकात कथन केल्या आहेत.



**The Salmons of Narmada**

Edited by : Bhooshan Kelkar

मूल्य १९५ रुपये
सवलतीत १०० रुपये

'स्वदेश' या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद.

ग्रंथाली     पुरस्कारप्राप्त पुस्तके     ग्रंथाली




**निशाणी – डावा अंगठा**

**रमेश इंगळे–उत्रादकर**

**मूल्य ३०० रु.**

**सवलतीत १८० रु.**

''मुखवटा हाच आपला चेहरा, इतकं त्याचं मुखवट्याशी नातं जुळलं पाह्यजे. कसं आणि केव्हा झालं – कळलं नाही, पण आपलं असंच झालं. आता, सोंगच जगणं झालं. मंह–तुहं–त्याचं–तिचं. याहीचं–त्याहीचं. साऱ्याहीचं असंच झालं. सोंगच जगणं झालं...'' आपल्या सार्वजनिक जीवनातील एका फार्सची कादंबरी... विनोद, उपहास, उपरोध, विसंगती आणि अनेक गमतीजमती यांनी ओतप्रोत भरलेली.




**लोकोत्तर**

**गाडगेबाबा : जीवन आणि कार्य**


**द.ता. भोसले**

**मूल्य ३०० रु.**

**सवलतीत १८० रु.**

गाडगेबाबांचे वैयक्तिक स्वरूपाचे साधेसुधे परंतु कमालीचे चारित्र्यसंपन्न जीवन चित्रित करताना द.ता. भोसले यांनी थोरामोठ्यांची जी अनेक उदाहरणे दिलेली आहेत त्यामुळे या ग्रंथाला वाचनीयता प्राप्त झालेली आहे. प्राचीन आणि अर्वाचीन अशा थोर विभूतींच्या जीवनातील मार्मिक प्रसंग त्यांनी सांगितलेले असल्यामुळे वाचकांना आपोआप बहुश्रुतता प्राप्त होते.

---




मूल्य ३०० रुपये

सवलतीत १८० रुपये

ग्रंथाली

# आठवणींतले बाबासाहेब

## योगीराज बागूल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांच्या सहवासात आलेल्या
नऊ व्यक्तींनी सांगितलेल्या त्यांच्या आठवणी.
त्यांमधून बाबासाहेबांचे
एक आगळेवेगळे दर्शन होते.